# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०३/ २०१५** **दिनांक १२.०३.२०१५**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी ०३.३० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक १२.०३.२०१५ रोजी दुपारी ०३.३० वाजता साईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ५७०१/ २०१५, दिनांक ०९ मार्च, २०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दिनांक १२.०३.२०१५ रोजी दुपारी ०३.३० वाजता साईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री. विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक १८.०२.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.७३** दिनांक १८.०२.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक ०२.०३.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.७४** दिनांक ०२.०३.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१** **साईभक्तांच्या सोईसाठी मंदिर परिसरामध्ये कास्ट आयर्न गार्डन बेंचेस खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

श्री क्षेत्र येथे येथे श्री साईंच्या दर्शनासाठी देश-विदेशातून हजारो साईभक्त दररोज येत असतात. नेहमी असणा-या गर्दीचे प्रमाण पाहतां श्रींचे दर्शन रांगेची व्यवस्था बाहेरील बाजुने करणेत आलेली असून, साईभक्त समाधी मंदिरातून दर्शन घेवून बाहेर पडल्यानंतर काही वेळ मंदिर परिसरामध्ये बसत असतात.

मंदिर परिसरामध्ये बसविणेत आलेल्या शाहाबाद फरशीवर साईभक्तांना बसावे लागते. सदरचे फ्लोरींग उन्हांळयामध्ये गरम असते. त्यामुळे साईभक्त समाधि मंदिरातून बाहेर पडल्यानंतर दर्शन रांगेच्या (बाहेर पडण्याच्या) मार्गामध्ये व मंदिर परिसरामध्ये इतरत्र ठिकाणी फ्लोरींगवर बसतात. याबाबत मा. कार्यकारी अधिकारी यांनी साईभक्ता मंदिर परिसरामध्ये काही काळ विश्रांतीकरीता बसणेसाठी कास्ट आर्यनचे श्री सिटर बेंचेस खरेदी करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

याकामी २५ नग श्री सिटर कास्ट आय्रन बेंचेस खरेदी करुन मंदिर परिसरामध्ये बसवून घेणेस अंदाजे रु.३,७५,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. याकामी मा. त्रिसदस्य समितीचे दि.१५/०३/२०१४ रोजीचे सभेतील नि.क्र.१९५ अन्वये येणारे खर्चास व विहीत पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता देण्यात आलेली आहे. याकामी दि.१५/०१/२०१५ रोजीच्या दैनिक Mid day, Mumbai, या वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली असून दि.१६/०१/२०१५ ते २७/०१/२०१५ पर्यंतच्या सिलबंद निविदा विक्रीच्या कालावधीत खालील ठेकेदारांनी सिलबंद निविदा विकत घेतल्या होत्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री साई इंडस्ट्रीज, नाशिक | ४. | द्वारका कास्टींग ॲण्ड इंजिनिअरींग प्रा.लि., इंदोर |
| २. | मे. कल्पना एटरप्रायजेस, नाशिक | ५. | एक्सल फ्रायब्रोटेक प्रा.लि., नागपूर |
| ३. | एल के इक्युपमेंट, नागपूर | ६. | आर्या फायबर इंडस्ट्रीज, पुणे |

दि.२९/०१/२०१५ पर्यंत सिलबंद निविदा जमा करणेचे अंतिम मुदतीत खालील ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | तपशिल | आवक क्र./ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | श्री साई इंडस्ट्रीज, नाशिक | २०७८४/२९-०१-२०१५ |
| ०२ | व्दारका कास्टींग ॲण्ड इंजिनिरींग प्रा.लि., इंदोर | २०७०७/२८-०१-२०१५ |
| ०३ | एक्सल प्रायब्रोटेक प्रा.लि. नागपूर | २०७०८/२८-०१-२०१५ |
| ०४ | आर्या फायबर इंडस्ट्रीज, पुणे | २०८०८/२९-०१-२०१५ |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१ | आर्या फायबर इंडस्ट्रीज, पुणे | अपात्र |
| ०२ | व्दारका कास्टींग ॲण्ड इंजिनिरींग प्रा.लि., इंदोर | ४,००,०००/- |
| ०३ | एक्सल प्रायब्रोटेक प्रा.लि. नागपूर | **३,६०,०००/-** |
| ०४ | श्री साई इंडस्ट्रीज, नाशिक | ३,६९,७२५/- |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांच्या सोईसाठी मंदिर परिसरामध्ये २५ नग श्री सिटर कास्ट आयर्न गार्डन बेंचेस खरेदी करणेसाठी एक्सल प्रायब्रोटेक प्रा.लि. नागपूर यांचे एकत्रित रु.३,६०,०००/- मात्र दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०२ **१२ होल्ट डि.सी. बॅट-या खरेदी करणेकामी प्राप्त झालेले टेंडर उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक २०-११-२०१४ चे सभेतील विषय नं.९ निर्णय क्र.९९६ अन्वये १२ व्होल्ट डि.सी.बॅट-या खरेदी करणेकामी येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेकामी येणारे रक्कम रुपये १,७८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती.

त्यानुसार टेंडर विक्रीसाठी दि.२२-०१-२०१५ रोजी दैनिक पुढारी अहमदनगर या वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात देण्यात आलेली होती. टेंडर विक्रीची तारीख दि.२३-०१-२०१५ ते दि.०७-०२-२०१५ अखेर ठेवण्यात आलेली होती. व टेंडर जमा करण्याची शेवटची तारीख दि.११-०२-२०१५ अशी देण्यात आलेली होती. त्यानुसार ०६ टेंडरची विक्री झालेली असून सिलबंद टेंडर जमा करणेचे मुदतीत खालीलप्रमाणे पाच टेंडर प्राप्त झाले आहेत. जमा झालेल्या टेंडरचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | टेंडरधारकाचे नांव | प्रशासन आवक क्र / दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१) | मे.एक्साईड पॉवर पॉईंट, अहमदनगर | ०२१५०३ / १०-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०२) | मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲन्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद | ०२१५०४ / १०-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०३) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ०२१५५७ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०४) | मे.तेजस इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर | ०२१५९६ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट |
| ०५) | मे.अंबर इलेक्ट्रीकल्स् ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर, पिंपरी निर्मळ | ०२१५९८ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |

उपरोक्तप्रमाणे १२ व्होल्ट डि.सी.बॅट-या खरेदी करणेकामी प्राप्त झालेले ०५ टेंडर आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित टेंडरधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | टेंडरधारकाचे नाव | टेंडरमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१ | मे.एक्साईड पॉवर पॉईंट, अहमदनगर | १,८३,३४०/- |
| ०२ | मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲन्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद | १,७८,०००/- |
| ०३ | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | १,८६,९००/- |
| ०४ | मे.तेजस इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर | **१,७४,४४०/-** |
| ०५ | मे.अंबर इलेक्ट्रीकल्स् ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर, पिंपरी निर्मळ | १,७५,०००/- |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, १२ होल्ट डि.सी. बॅट-या खरेदी करणेकामी मे.तेजस इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर यांचे रु.१,७४,४४०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०३ **श्री साईभक्तांकरीता मार्गदर्शनासाठी Interactive Voice Responses System (IVRS) सुविधा सुरु करणेकामाचे प्राप्त झालेले टेंडर उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५/०३/२०१४ रोजी झालेल्या सभेत विषय क्र.४७ निर्णय क्र.२१७ अन्वये श्री साई भक्तांकरीता मार्गदर्शनासाठी Interactive Voice Response System (IVRS) सुविधा सुरु करणेबाबत विहीत पध्दतीने टेंडर मागवून करुन घेणेस व याकामी येणारे रक्कम रुपये ३,७५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती. त्यानुसार दि.२२/०१/२०१५ चे दैनिक पुढारी अहमदनगर या वर्तमानपत्रात व संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात देण्यात आलेली होती. टेंडर विक्रीची तारीख दि.२३/०१/२०१५ ते दि.०७/०२/२०१५ अखेर ठेवण्यात आलेली होती.व टेंडर जमा करण्याची शेवटची तारीख दि.११/०२/२०१५ अशी देण्यात आलेली होती.त्यानुसार ०६ टेंडरची विक्री झालेली असुन सिलबंद टेंडर जमा करणेचे मुदतीत ०६ टेंडर प्राप्त झाली आहे.प्राप्त झालेल्या टेंडरचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | टेंडरधारकाचे नांव | प्रशासन आवक नं.व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१). | मे.युनिव्हर्सल कम्युनिकेशन, नाशिक | ०२१५०७ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१ बंद ईएमडी पाकीट-०१ |
| ०२). | मे.स्कायनेट कार्पोरेशन, नाशिक | ०२१५५३ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१ बंद ईएमडी पाकीट-०१ |
| ०३). | मे.गिगाबीट कार्पोरेशन, नाशिक | ०२१५५६ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१ बंद ईएमडी पाकीट-०१ |
| ०४). | मे.अविष्कार टेक्नो सर्व्हिसेस, नाशिक | ०२१५५८ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१ बंद ईएमडी पाकीट-०१ |
| ०५). | मे.युनिफाय, औरंगाबाद | ०२१५८९ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१ बंद ईएमडी पाकीट-०१ |
| ०६). | मे.प्रकल्प इन्स्टुमेंटस, अहमदनगर | ०२१५९१ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१ बंद ईएमडी पाकीट-०१ |

उपरोक्तप्रमाणे श्री साईभक्तांकरीता मार्गदर्शनासाठी Interactive Voice Response System (IVRS) सुविधा सुरु करणेचे कामाबाबत प्राप्त झालेले ०६ टेंडर आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित टेंडरधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **टेंडरधारकाचे नाव** | **टेंडरमधील मुळ दर रु.** |
|---|---|---|
| ०१ | मे.युनिव्हर्सल कम्युनिकेशन, नाशिक | अपात्र |
| ०२ | मे.स्कायनेट कार्पोरेशन, नाशिक | ई.एम.डी. नसल्याने अपात्र |
| ०३ | मे.गिगाबीट कार्पोरेशन, नाशिक | **५,०७,४०८/-** |
| ०४ | मे.अविष्कार टेक्नो सर्व्हिसेस, नाशिक | ५,०७,८४८/- |
| ०५ | मे.युनिफाय, औरंगाबाद | ११,९३,१९०/- |
| ०६ | मे.प्रकल्प इन्स्टुमेंटस, अहमदनगर | ९,७०,०००/- |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईभक्तांकरीता मार्गदर्शनासाठी** Interactive Voice Responses System (IVRS) **सुविधा सुरु करणेकामी मे.गिगाबीट कार्पोरेशन, नाशिक यांचे रु.५,०७,४०८/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**०४ Flame Proof (आग प्रतिबंधक) इलेक्ट्रीकल मोटार पंपसेट खरेदी करणेकामी प्राप्त झालेले टेंडर उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक ११-०९-२०१४ चे सभेतील विषय नं.२१ निर्णय क्र.७६४ अन्वये Flame Proof (आग प्रतिबंधक) इलेक्ट्रीकल मोटार पंपसेट पुरविणेकामी येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेकामी येणारे रक्कम रुपये २,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती.

त्यानुसार टेंडर विक्रीसाठी दिनांक २२-०१-२०१५ रोजी दैनिक पुढारी अहमदनगर या वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात देण्यात आलेली होती. टेंडर विक्रीची तारीख दिनांक २३-०१-२०१५ ते दिनांक ०७-०२-२०१५ अखेर ठेवण्यात आलेली होती. व टेंडर जमा करण्याची शेवटची तारीख दि.११-०२-२०१५ अशी देण्यात आलेली होती. त्यानुसार सहा टेंडरची विक्री झालेली असून सिलबंद टेंडर जमा करणेचे मुदतीत खालीलप्रमाणे पाच टेंडर प्राप्त झाले आहेत. जमा झालेल्या टेंडरचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | टेंडरधारकाचे नांव | प्रशासन आवक क्र / दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१) | मे.दिघे इलेक्ट्रीकल्स्, कोल्हार | ०२१५१७ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०२) | मे.साई समर्थ इंजिनिअरींग कं.लि., अंबड, नाशिक | ०२१५५४ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०३) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ०२१५६१ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०४) | मे.साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ०२१५७१ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०५) | मे.प्रकल्प इन्स्ट्रयुमेंटस, अहमदनगर | ०२१५९० / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |

उपरोक्तप्रमाणे Flame Proof (आग प्रतिबंधक) इलेक्ट्रीकल मोटार पंपसेट खरेदी करणे कामाचे प्राप्त झालेले 05 टेंडर आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित टेंडरधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | टेंडरधारकाचे नाव | टेंडरमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१ | मे.दिघे इलेक्ट्रीकल्स्, कोल्हार | **१,७७,९९९/-** |
| ०२ | मे.साई समर्थ इंजिनिअरींग कं.लि., अंबड, नाशिक | २,२५,०००/- |
| ०३ | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | १,९१,२५०/- |
| ०४ | मे.साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | २,१३,७५०/- |
| ०५ | मे.प्रकल्प इन्स्ट्रयुमेंटस, अहमदनगर | २,४३,०००/- |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, Flame Proof (आग प्रतिबंधक) इलेक्ट्रीकल मोटार पंपसेट खरेदी करणेकामी मे.दिघे इलेक्ट्रीकल्स्, कोल्हार यांचे रु.१,७७,९९९/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**०५ शैक्षणिक संकुल परिसरात नवीन दुरध्वनी केबल टाकणेचे कामाबाबत प्राप्त झालेले टेंडर उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक दिनांक ११-०९-२०१४ चे सभेतील विषय नं.२२ निर्णय क्र.७६५ अन्वये शैक्षणिक संकुल परीसरात नविन दुरध्वनी केबल टाकणेचे कामाबाबत विहीत पध्दतीने टेंडर मागवून काम करुन घेणेसाठी व याकामी येणारे रक्कम रुपये २,६५,१७९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती. त्यानुसार दि.२२/०१/२०१५ चे दैनिक पुढारी अहमदनगर या वर्तमानपत्रात व संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात देण्यात आलेली होती. टेंडर विक्रीची तारीख दि.२३/०१/२०१५ ते दि.०७/०२/२०१५ अखेर ठेवण्यात आलेली होती.व टेंडर जमा करण्याची शेवटची तारीख दि.११/०२/२०१५ अशी देण्यात आलेली होती.त्यानुसार ०८ टेंडरची विक्री झालेली असुन सिलबंद टेंडर जमा करणेचे मुदतीत खालीलप्रमाणे ०७ टेंडर प्राप्त झाले आहेत. जमा झालेल्या टेंडरचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | टेंडरधारकाचे नांव | प्रशासन आवक नं.व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१). | मे. दिघे इलेक्ट्रीकल, कोल्हार | ०२१५२१ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१<br>बंद ईएमडी पाकीट-०१ |
| ०२). | मे. यशवंत इलेक्ट्रीकल ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर, अहमदनगर | ०२१५५१ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१<br>बंद ईएमडी पाकीट-०१ |
| ०३). | मे. आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ०२१५६३ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१<br>बंद ईएमडी पाकीट-०१ |
| ०४). | मे. श्री साई श्रध्दा इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ०२१५७० / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१<br>बंद ईएमडी पाकीट-०१ |
| ०५). | मे. एस.आर.ट्रेडर्स, नाशिक | ०२१५८५ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१<br>बंद ईएमडी पाकीट-०१ |
| ०६). | मे. युनिफाय, औरंगाबाद | ०२१५८८ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१<br>बंद ईएमडी पाकीट-०१ |
| ०७). | मे. प्रकल्प इन्स्ट्रुमेंटस, अहमदनगर | ०२१५९२ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१<br>बंद ईएमडी पाकीट-०१ |

उपरोक्त प्रमाणे शैक्षणिक संकुल (आयटीआय, इंग्लिश मिडीयम स्कुल, कन्या शाळा) परीसरात नविन दुरध्वनी केबल टाकणेचे कामाबाबत प्राप्त झालेले ०७ टेंडर आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित टेंडरधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | टेंडरधारकाचे नाव | टेंडरमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१ | मे. दिघे इलेक्ट्रीकल, कोल्हार | २,४७,२६७/- |
| ०२ | मे. यशवंत इलेक्ट्रीकल ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर, अहमदनगर | २,६५,१७९/- |
| ०३ | मे. आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक | इ.एम.डी. चा डी.डी. सोबत जोडलेला नसल्याने अपात्र |
| ०४ | मे. श्री साई श्रध्दा इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ३,०४,९५६/- |
| ०५ | मे. एस.आर.ट्रेडर्स, नाशिक | २,९३,९५६/- |
| ०६ | मे. युनिफाय, औरंगाबाद | २,९१,६९६/- |
| ०७ | मे. प्रकल्प इन्स्ट्रुमेंटस, अहमदनगर | **२,४६,६१६/-** |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकुल (आयटीआय, इंग्लिश मिडीयम स्कुल, कन्या शाळा) परीसरात नविन दुरध्वनी केबल टाकणेचे काम करुन घेणेसाठी मे. प्रकल्प इन्स्टुमेंटस, अहमदनगर यांचे रु.२,४६,६१६/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**०६ साईआश्रम भाग-०१ परीसरातील इमारतींच्या खोल्यांमधील टॉयलेट, बाथरुम, नाईट लॅम्प तसेच बेसीनवरील आरशावर बल्कहेडसहीत सी.एफ.एल. लॅम्प खरेदी करुन बसविणेकामी प्राप्त झालेले टेंडर उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.त्रीसदस्य समितीचे दि.०९-१०-२०१४ चे सभेतील विषय नं.२९ निर्णय क्र.९१४ अन्वये साईआश्रम भाग-०१ परीसरातील इमारतींच्या खोल्यांमधील टॉयलेट, बाथरुम, नाईट लॅम्प तसेच बेसीनवरील आरशावर बल्कहेडसहीत सी.एफ. एल.लॅम्प खरेदी करुन बसविणेकामी येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेकामी येणारे रक्कम रु.५,२२,१४४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती.

त्यानुसार टेंडर विक्रीसाठी दिनांक २२-०१-२०१५ रोजी दैनिक पुढारी अहमदनगर या वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात देण्यात आलेली होती. टेंडर विक्रीची तारीख दिनांक २३-०१-२०१५ ते दिनांक ०७-०२-२०१५ अखेर ठेवण्यात आलेली होती. व टेंडर जमा करण्याची शेवटची तारीख दि.११-०२-२०१५ अशी देण्यात आलेली होती. त्यानुसार अकरा टेंडरची विक्री झालेली असून सिलबंद टेंडर जमा करणेचे मुदतीत खालीलप्रमाणे नऊ टेंडर प्राप्त झाले आहेत. जमा झालेल्या टेंडरचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | टेंडरधारकाचे नांव | प्रशासन आवक क्र / दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१) | मे.जी.सोअर्स टेक्नॉलॉजिक्स (इं) प्रा.लि., नवी मुंबई | ०२१४२७ / ०९-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट |
| ०२) | मे.दिघे इलेक्ट्रीकल्स्, कोल्हार | ०२१५१८ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०३) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ०२१५५९ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०४) | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्,कोपरगांव | ०२१५६० / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०५) | मे.यशवंत इलेक्ट्रीकल्स् ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर, अहमदनगर | ०२१५६५ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०६) | मे.एकवीरा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ०२१५६६ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०७) | मे.श्रीसाईश्रध्दा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ०२१५६८ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०८) | मे.प्रकल्प इन्स्ट्रयुमेंटस, अहमदनगर | ०२१५९५ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०९) | मे.अंबर इलेक्ट्रीकल्स् ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर, पिंपरी-निर्मळ | ०२१५९७ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |

उपरोक्तप्रमाणे साईआश्रम भाग-०१ परीसरातील इमारतींच्या खोल्यांमधील टॉयलेट, बाथरुम, नाईट लॅम्प तसेच बेसीनवरील आरशावर बल्कहेडसहीत सी.एफ.एल.लॅम्प खरेदी करुन बसविणेकामी प्राप्त झालेले ०९ सिलबंद टेंडर्स आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित टेंडरधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **टेंडरधारकाचे नाव** | **टेंडरमधील मुळ दर रु.** |
|---|---|---|
| ०१ | मे.जी.सोअर्स टेक्नॉलॉजिक्स (इं) प्रा.लि., नवी मुंबई | ५,००,०००/- |
| ०२ | मे.दिघे इलेक्ट्रीकल्स्, कोल्हार | ४,८१,५९३/- |
| ०३ | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ६,००,४६५/- |
| ०४ | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स्, कोपरगांव | बंद पाकिटामध्ये टेंडर नव्हते |
| ०५ | मे.यशवंत इलेक्ट्रीकल्स् ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर, अहमदनगर | **४,४३,८२२/-** |
| ०६ | मे.एकवीरा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ८,३०,२०९/- |
| ०७ | मे.श्रीसाईश्रध्दा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ५,२२,१४४/- |
| ०८ | मे.प्रकल्प इन्स्ट्रयुमेंटस, अहमदनगर | ७,०४,८९४/- |
| ०९ | मे.अंबर इलेक्ट्रीकल्स् ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर, पिंपरी-निर्मळ | १२,१८,८१२/- |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भाग-०१ परीसरातील इमारतींच्या खोल्यांमधील टॉयलेट, बाथरुम, नाईट लॅम्प तसेच बेसीनवरील आरशावर बल्कहेडसहीत सी.एफ.एल. लॅम्प खरेदी करुन बसविणेकामी मे.यशवंत इलेक्ट्रीकल्स् ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर, अहमदनगर यांचे रु.४,४३,८२२/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०७ **श्री साई प्रसादालय एच.टी. कन्झयुमर नं.१६५१८९००६५४० करीता करंट ट्रान्सफॉर्मर खरेदी करुन बसविणेकामी प्राप्त झालेले टेंडर उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक ११-०९-२०१४ चे सभेतील विषय नं.१९ निर्णय क्र.७६२ अन्वये श्री साई प्रसादालय एच.टी.कन्झ्युमर नं.१६५१८९००६५४० करीता करंट ट्रान्सफॉर्मर खरेदी करुन बसविणेकामी येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेकामी येणारे रक्कम रुपये ६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती.

त्यानुसार टेंडर विक्रीसाठी दि.२२-०१-२०१५ रोजी दैनिक पुढारी अहमदनगर या वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात देण्यात आलेली होती. टेंडर विक्रीची तारीख दि.२३-०१-२०१५ ते दि.०७-०२-२०१५ अखेर ठेवण्यात आलेली होती. व टेंडर जमा करण्याची शेवटची तारीख दि.११-०२-२०१५ अशी देण्यात आलेली होती. त्यानुसार पाच टेंडरची विक्री झालेली असून सिलबंद टेंडर जमा करणेचे मुदतीत खालीलप्रमाणे पाच टेंडर प्राप्त झाले आहेत. जमा झालेल्या टेंडरचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | टेंडरधारकाचे नांव | प्रशासन आवक क्र / दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१) | मे.दिघे इलेक्ट्रीकल्स्, कोल्हार | ०२१५१९ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०२) | मे.साई समर्थ इंजिनिअरींग कं.लि., अंबड, नाशिक | ०२१५५५ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०३) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ०२१५६२ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०४) | मे.श्रीसाईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ०२१५६९ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०५) | मे.प्रकल्प इन्स्ट्रयुमेंटस, अहमदनगर | ०२१५९४ / ११-०२-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |

उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालय एच.टी.कन्झ्युमर नं.१६५१८९००६५४० करीता करंट ट्रान्सफॉर्मर खरेदी करुन बसविणेकामी प्राप्त झालेले ०५ टेंडर आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित टेंडरधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **टेंडरधारकाचे नाव** | **टेंडरमधील मुळ दर रु.** |
|---|---|---|
| ०१ | मे.दिघे इलेक्ट्रीकल्स्, कोल्हार | **५४,०५४/-** |
| ०२ | मे.साई समर्थ इंजिनिअरींग कं.लि., अंबड, नाशिक | ६०,५००/- |
| ०३ | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ५४,४५०/- |
| ०४ | मे.श्रीसाईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ६६,५५०/- |
| ०५ | मे.प्रकल्प इन्स्ट्रयुमेंटस, अहमदनगर | ५८,६८५/- |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय एच.टी. कन्झयुमर नं.१६५१८९००६५४० करीता करंट ट्रान्सफॉर्मर खरेदी करुन बसविणेकामी मे.दिघे इलेक्ट्रीकल्स्, कोल्हार यांचे रु.५४,०५४/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०८ **श्री साईप्रसादालयातील फुड लॅब, गॅस प्लँट व मेन गेट सिक्युरिटी केबीन येथे नविन अंडरग्राऊंड टेलीफोन केबल टाकणेचे कामाबाबत प्राप्त झालेले टेंडर उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ११/०९/२०१४ रोजी झालेल्या सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र.०८ निर्णय क्र.८०० अन्वये साई प्रसादालयातील फुड लॅब, गॅस प्लँट व मेन गेट सिक्युरीटी केबीन येथे नविन अंडरग्राऊड टेलीफोन केबल टाकणेचे कामाबाबत विहीत पध्दतीने टेंडर मागवून करुन घेणेस व याकामी येणारे रक्कम रुपये ३,१३,५११/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती. त्यानुसार दि.२२/०१/२०१५ चे दैनिक पुढारी अहमदनगर या वर्तमानपत्रात व संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात देण्यात आलेली होती.टेंडर विक्रीची तारीख दि.२३/०१/२०१५ ते दि.०७/०२/२०१५ अखेर ठेवण्यात आलेली होती व टेंडर जमा करण्याची शेवटची तारीख दि.११/०२/२०१५ अशी देण्यात आलेली होती. त्यानुसार ०९ टेंडरची विक्री झालेली असुन सिलबंद टेंडर जमा करणेचे मुदतीत ०८ टेंडर प्राप्त झाली आहे.प्राप्त झालेल्या टेंडरचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | टेंडरधारकाचे नांव | प्रशासन आवक नं.व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१). | मे. दिघे इलेक्ट्रीकल, कोल्हार | ०२१५२० / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१<br>बंद ईएमडी पाकीट-०१ |
| ०२). | मे. आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ०२१५५२ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१<br>बंद ईएमडी पाकीट-०१ |
| ०३). | मे. एकवीरा इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ०२१५६४ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१<br>बंद ईएमडी पाकीट-०१ |
| ०४). | मे. श्री साई श्रध्दा इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ०२१५६७ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१<br>बंद ईएमडी पाकीट-०१ |
| ०५). | मे. यशवंत इलेक्ट्रीकल अँड कॉन्ट्रॅक्टर, अहमदनगर | ०२१५७२ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१<br>बंद ईएमडी पाकीट-०१ |
| ०६). | मे. एस.आर.ट्रेडर्स, नाशिक | ०२१५८६ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१<br>बंद ईएमडी पाकीट-०१ |
| ०७). | मे. युनिफाय, औरंगाबाद | ०२१५८७ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१<br>बंद ईएमडी पाकीट-०१ |
| ०८). | मे. प्रकल्प इन्स्ट्रुमेंटस, अहमदनगर | ०२१५९३ / ११-०२-२०१५ | बंद टेंडर पाकीट-०१<br>बंद ईएमडी पाकीट-०१ |

उपरोक्तप्रमाणे साई प्रसादालयातील फुड लॅब, गॅस प्लँट व मेन गेट सिक्युरीटी केबीन येथे नविन अंडरग्राऊड टेलीफोन केबल टाकणेचे कामाबाबत प्राप्त झालेले ०८ टेंडर आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित टेंडरधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **टेंडरधारकाचे नाव** | **टेंडरमधील मुळ दर रु.** |
|---|---|---|
| ०१ | मे. दिघे इलेक्ट्रीकल, कोल्हार | २,९१,६९९/- |
| ०२ | मे. आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक | २,९७,८३५/- |
| ०३ | मे. एकवीरा इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ३,३२,३२१/- |
| ०४ | मे. श्री साई श्रध्दा इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ३,४४,८६२/- |
| ०५ | मे. यशवंत इलेक्ट्रीकल अँड कॉन्ट्रॅक्टर, अहमदनगर | ३,१३,५११/- |
| ०६ | मे. एस.आर.ट्रेडर्स, नाशिक | ३,४९,५३८/- |
| ०७ | मे. युनिफाय, औरंगाबाद | ३,५१,१३२/- |
| ०८ | मे. प्रकल्प इन्स्ट्रुमेंटस, अहमदनगर | **२,९१,५६५/-** |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील फुड लॅब, गॅस प्लँट व मेन गेट सिक्युरिटी केबीन येथे नविन अंडरग्राऊंड टेलीफोन केबल टाकणेकामी मे. प्रकल्प इन्स्ट्रुमेंटस, अहमदनगर यांचे रु.२,९१,५६५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**०९ आरोग्य विभागाकरीता स्वच्छता साहित्य खरेदीकामी प्राप्त तांत्रिक व मुळ निविदांचे लिफाफे उघडणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

आरोग्य विभागास स्वच्छता साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.९,६८,०००/- (अक्षरी रु. नऊ लाख, अडूसष्ट हजार) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समिती सभा दि.०९.१०.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८९९ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव दि.१३.११.२०१४ रोजी पुढील कार्यवाहीसाठी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

आरोग्य विभागाकरीता स्वच्छता साहित्य खरेदीची तातडीची आवश्यकता असल्याने सदरची खरेदी लवकरात लवकर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. साईटेक प्रकल्पातून निविदा प्रक्रिया होत नसल्यामुळे सदरची खरेदीही प्रचलित पद्धतीनेच दि. ३१.०१.२०१५ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा प्रक्रिया करण्यात आलेली आहे. सदरच्या निविदा विक्री करणेकामी अकरा निविदा तयार करण्यात आलेल्या होत्या. सर्व अकरा निविदांची विक्री झालेली आहे.

सदरच्या निविदांचे लिफाफे निविदा पेटीमध्ये स्विकारणेत आलेले आहेत. सदर निविदांची पेटी मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत उघडून प्रथम प्राप्त निविदेतील लिफाफा क्रमांक १ उघडून मागणी केलेल्या कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात येईल. कागदपत्रांची पुर्तता केलेल्या निविदाधारकांची निविदा पात्र ठरविता येईल. नंतर पात्र निविदाधारकांच्या मुळ निविदा उघडून योग्य निर्णय घेता येईल.

तरी प्रस्तावित केल्याप्रमाणे आरोग्य विभागाकरीता स्वच्छता साहित्य खरेदीकामी प्राप्त निविदांचे लिफाफे आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील पात्र निविदाधारकांच्या मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | **खराटे** (चांगल्या प्रतीचे)/ प्रत्येकी ५०० ग्रॅम वजनाचे खुंटी नसलेले लांब काडयाचे मजबूत व साळलेले/ ४,८०० नग/ दर प्रती नग/किलो (व्हॅटसह) रु. | **कुंचे** (चांगल्या प्रतीचे)/ प्रत्येकी ५०० ग्रॅम वजनाचे खुंटी नसलेले लांब काडयाचे मजबूत बांधणीचे/ ४,००० नग/ दर प्रती नग/किलो (व्हॅटसह) रु. | **फायबर/ प्लॅस्टिकच्या कंचरा कुडया** (८० लिटर क्षमता) निलकमल (ISI)/ फोल्डींग झाकण **GBVF** ०८/०१/ २०० नग/ दर प्रती नग/किलो (व्हॅटसह) रु. | **बिलचींग पावडर** (आय.एस. आय.मार्क)/ २५ किलोची बॅग/ १,२०० किलो/ दर प्रती नग/किलो (व्हॅटसह) रु. | **प्लॅस्टिक पिशवी** (काळया रंगाची)/ ३२"x३८"/ ४०० किलो/ दर प्रती नग/किलो (व्हॅटसह) रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे.गांधी केमिकल्स्, अहमदनगर | ४२/- | ९०/- | २७००/- | २३.२० | १६५/- |
| २ | मे. स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव | ३०/- | ७२/- | --- | **१८/-** | --- |
| ३ | निलकमल लिमिटेड, नाशिक | --- | --- | **१३९१/-** | --- | --- |
| ४ | विरभद्र ट्रेडर्स, सवंत्सर | **२७/-** | **६०/-** | --- | २७/- | --- |
| ५ | आर.के. एंटरप्रायझेस, सिन्नर | ३०/- | ८१/- | --- | २१/- | **१३०/-** |
| ६ | मे.मगनलाल देवशंकर, नाशिक | ३०.५० | ८५/- | --- | २४.६० | --- |
| ७ | महेश इजिनिअरींग,नाशिक | --- | --- | १७००/- | --- | --- |
| ८ | साई केमिकल्स, एंटरप्रायझेस,रामपूर | ३५/- | **६०/-** | --- | २७/- | --- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आरोग्य विभागाकरीता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे स्वच्छता साहित्य खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्तयातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच ज्या साहित्यासाठी समान निम्नतम दर आलेले असतील अशा साहित्याचा समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**१० साईआश्रम व साईधर्मशाळा येथील प्लंबींग साहित्य खरेदीकामी प्राप्त तांत्रिक व मुळ निविदांचे लिफाफे उघडणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

पाणी पुरवठा विभागास साईआश्रम व साईधर्मशाळा येथील प्लम्बींग साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. ७,५१,७७४/- मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समिती सभा दि.०७.०८.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६७१ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव दि.१९.०९.२०१४ रोजी पुढील कार्यवाहीसाठी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला होता.

पाणी पुरवठा विभागास साईआश्रम व साईधर्मशाळा येथील प्लम्बींग साहित्य खरेदीची तातडीची आवश्यकता असल्याने सदरची खरेदी लवकरात लवकर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. साईटेक प्रकल्पातून निविदा प्रक्रिया होत नसल्यामुळे सदरची खरेदीही प्रचलित पद्धतीनेच दि. ३०.०१.२०१५ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा प्रक्रिया करण्यात आलेली आहे. सदरच्या निविदा विक्री करणेकामी दहा निविदा तयार करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी तीन निविदांची विक्री झालेली आहे.

सदरच्या निविदांचे लिफाफे निविदा पेटीमध्ये स्विकारणेत आलेले आहेत. सदर निविदांची पेटी मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत उघडून प्रथम प्राप्त निविदेतील लिफाफा क्रमांक १ उघडून मागणी केलेल्या

कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात येईल. कागदपत्रांची पुर्तता केलेल्या निविदाधारकांची निविदा पात्र ठरविता येईल. नंतर पात्र निविदाधारकांच्या मुळ निविदा उघडून योग्य निर्णय घेता येईल.

तरी प्रस्तावित केल्याप्रमाणे पाणी पुरवठा विभागास साईआश्रम व साईधर्मशाळा येथील प्लम्बींग साहित्य खरेदीकामी प्राप्त निविदांचे लिफाफे आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील पात्र निविदाधारकांच्या मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.न. | साहित्याचा तपशील/<br>कंपनी/<br>मागणी | मे. स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव | मे. भक्ती मार्केटींग साकूरी | मे. अनुराधा अॅग्रो सर्व्हिस, लोणी |
|---|---|---|---|---|
| | | दर प्रती नग (व्हॅटसह) रु. | दर प्रती नग (व्हॅटसह) रु. | दर प्रती नग (व्हॅटसह) रु. |
| १ | जेट प्रे (विमान टाईप) हेवी ISI मार्क<br>८५५ नग | २१४/- | २५०/- | २८२/- |
| २ | कमोड शिट कव्हर (हेवी) आयव्हरी कलर<br>५३० नग | ४१६/- | २९०/- | ४४०/- |
| ३ | सी.पि.व्ही.सी.थ्रेडर १.१/४" (बाहेरील आटे)<br>फिनोलेक्स<br>१,६०० नग | ६२/- | ५८/- | २६.६० |
| ४ | पि.व्ही.सी. थ्रेडर १.१./४" (आतील आटे)<br>फिनोलेक्स<br>३,००० नग | १५/- | १०/- | १०.३५ |
| ५ | पि.व्ही.सी.टी.१.१/४"<br>फिनोलेक्स<br>१,६०० नग | २३/- | १५/- | १५.७० |
| ६ | पि.व्ही.सी. बंद प्लग १.१/४"<br>फिनोलेक्स<br>१,६०० नग | १२/- | ७/- | ७.२५ |
| ७ | पि.व्ही.सी. पाईप १.१/४"<br>फिनोलेक्स<br>३,००० फुट | १३/- | ९.५० | १०.६० |
| ८ | सी.पि.व्ही.सी. पाईप १.१/४"<br>फिनोलेक्स<br>२०० फुट | ५८/- | ४४/- | ५०.४० |
| ९ | टेफलॉन टेप (२० मिटर)<br>फिनोलेक्स<br>६०० नग | ३१/- | २५/- | --- |
| १० | पि.व्ही.सी. सोल्युशन<br>फिनोलेक्स<br>७ लिटर | ५४६/- | ३७५/- | --- |
| ११ | सी.पि.व्ही.सी. सोल्युशन<br>फिनोलेक्स<br>३ लिटर | ११४०/- | १२४०/- | --- |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम व साईधर्मशाळा येथील प्लंबींग साहित्य खरेदीसाठी एकाच कंपनीच्या साहित्याचे दर मागविण्यात आलेले आहेत, त्यामुळे पुरेशी स्पर्धा होऊ शकत नाही. याकरिता सदरहू खरेदीकामी वेगवेगळया ३ ते ४ नामांकित कंपनीच्या साहित्यांचे दर मागविण्यात यावेत, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**११ साईधर्मशाळा विभागास आवश्यक काथा बाथमॅट व प्लॅस्टिक बाथमॅट खरेदीकामी प्राप्त तांत्रिक व मुळ निविदांचे लिफाफे उघडणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुदः-** १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

साईधर्मशाळा विभागासाठी बाथरुम समोरील काथा बाथमॅट व प्लॅस्टिक हिरवे बाथमॅट (पायपुसणे) खरेदी करणेस व याकामी खर्च येणा-या रक्कम रु.१,५३,३००/-मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६.०६.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३५ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदरचा दि. ०४.१०.२०१४ रोजी खरेदी विभागास प्राप्त झालेला होता.

साईधर्मशाळा विभागास आवश्यक काथा बाथमॅट व प्लॅस्टिक बाथमॅटची तातडीची आवश्यकता असल्याने सदरची खरेदी लवकरात लवकर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. साईटेक प्रकल्पातून निविदा प्रक्रिया होत नसल्यामुळे सदरची खरेदीही प्रचलित पद्धतीनेच दि. ३१.०१.२०१५ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा प्रक्रिया करण्यात आलेली आहे. सदरच्या निविदा विक्री करणेकामी दहा निविदा तयार करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी तीन निविदांची विक्री झालेली आहे.

सदरच्या निविदांचे लिफाफे निविदा पेटीमध्ये स्विकारणेत आलेले आहेत. सदर निविदांची पेटी मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत उघडून प्रथम प्राप्त निविदेतील लिफाफा क्रमांक १ उघडून मागणी केलेल्या कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात येईल. कागदपत्रांची पुर्तता केलेल्या निविदाधारकांची निविदा पात्र ठरविता येईल. नंतर पात्र निविदाधारकांच्या मुळ निविदा उघडून योग्य निर्णय घेता येईल.

तरी प्रस्तावित केल्याप्रमाणे साईधर्मशाळा विभागास आवश्यक काथा बाथमॅट व प्लॅस्टिक बाथमॅट खरेदीकामी प्राप्त निविदांचे लिफाफे आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील पात्र निविदाधारकांच्या मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **साहित्याचा तपशील** | मे.गांधी केमिकल्स, अहमदनगर | मे.स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव | मे.साई प्रॉडक्टस, कोपरगाव |
|---|---|---|---|---|
| | | दर प्रती नग (व्हॅटसह) रु. | दर प्रती नग (व्हॅटसह) रु. | दर प्रती नग (व्हॅटसह) रु. |
| ०१ | काथा बाथमॅट ५x३ फुट, ५२ नग | **११५०/-** | १९२०/- | २१९०/- |
| ०२ | हिरवे प्लॅस्टिक बाथमॅट १०x२ फुट, ०६ नग | २१००/- | **१९९०/-** | २२००/- |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, साईधर्मशाळा विभागास आवश्यक काथ बाथमॅट व प्लॅस्टिक बाथमॅट खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**१२ साईआश्रम भक्तनिवास विभागास आवश्यक स्टेनलेस स्टील वॉल हॅंगर खरेदीकामी फेर निविदांचे तांत्रिक व मुळ निविदांचे लिफाफे उघडणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६० नुसार स्टेनलेस स्टील वॉल हॅंगर खरेदी करणेस व याकामी खर्च येणा-या रक्कम रु. १,४७,२५०/-मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.११.०९.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५४ नुसार स्टेनलेस स्टील वॉल हॅंगर खरेदी करणेस व याकामी खर्च येणा-या रक्कम रु.३,५२,६२५/- मात्रचे वाढीव खर्चास मान्यता मिळालेली आहे.

संदर्भ क्र.१ व २ या दोन्ही निर्णयानुसार ४,९९,८७५/- (पुर्वीची रक्कम रु.१,४७,२५०/- + वाढीव रक्कम रु. ३,५२,६२५/- = ४,९९,८७५/-) मात्रचे रकमेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव दि.०७.१०.२०१४ रोजी पुढील कार्यवाहीसाठी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

साईआश्रम भक्तनिवास विभागास स्टेनलेस स्टील वॉल हॅंगरची तातडीची आवश्यकता असल्याने सदरची खरेदी लवकरात लवकर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. साईटेक प्रकल्पातून निविदा प्रक्रिया होत नसल्यामुळे सदरची खरेदीही प्रचलित पद्धतीनेच प्रथम दि.३१.१०.२०१४ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा प्रक्रिया करण्यात आलेली होती. एकाही निविदेची विक्री न झाल्याने दि.१७.११.२०१४ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये फेरनिविदा प्रक्रिया करण्यात यावी असे ठरले. त्यानंतर दि.३०.१२.२०१४ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये दि.१४.०१.२०१५ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन फेरनिविदा प्रक्रिया करण्यात आलेली होती. सदरच्या निविदा विक्री करणेकामी दहा निविदा तयार करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी पाच निविदांची विक्री झालेली आहे.

सदरच्या निविदाचे लिफाफे निविदा पेटीमध्ये स्विकारणेत आलेले आहेत. सदर निविदांची पेटी मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत उघडून प्रथम प्राप्त निविदेतील लिफाफा क्रमांक १ उघडून मागणी केलेल्या कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात येईल. कागदपत्रांची पुर्तता केलेल्या निविदाधारकांची निविदा पात्र ठरविता येईल. नंतर पात्र निविदाधारकांच्या मुळ निविदा उघडून योग्य निर्णय घेता येईल.

तरी प्रस्तावित केल्याप्रमाणे साईआश्रम भक्तनिवास विभागास आवश्यक स्टेनलेस स्टील वॉल हॅंगर खरेदीकामी प्राप्त निविदांचे दोन्ही लिफाफे आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील पात्र निविदाधारकांच्या मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | तपशील |
| --- | --- | --- |
| | | स्टेनलेस स्टी वॉल हॅंगर सहा हूकचे<br>Hook base plat- ss202 grade- 16swg, Hook rod hangar- ss202 grade- 02mm thikness both side hook hangar, on front side (Up & Down)<br>१५५० नग |
| | | दर प्रती नग (व्हॅटसह) रु. |
| ०१ | मे.ॲडव्हाचेअर मॅट्रेसेस, अहमदनगर | **२९५/-** |
| ०२ | मे.आकाश फर्निशिंग, सावेडी | --- |
| ०३ | मे.साई एंटरप्रायझेस, नालेगाव | --- |
| ०४ | मे.कर्जतवाला इंजिनिअरींग, सावेडी | ४१५/- |
| ०५ | मे.सोहम एंटरप्रायझेस, अहमदनगर | ३६०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साईआश्रम भक्तनिवास विभागास आवश्यक असलेले १५५० नग स्टेनलेस स्टील वॉल हॅंगर खरेदीकामी मे.ॲडव्हाचेअर मॅट्रेसेस, अहमदनगर यांचे प्रती नग (व्हॅटसह) रु.२९५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**१३ व्दारावती भक्तनिवासस्थान विभागासाठी मेडिमिक्स साबण (१२ ग्रॅम वडी) खरेदीकामी फेर निविदांचे तांत्रिक व मुळ निविदांचे लिफाफे उघडणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** २१ (१) (ग) साईभक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यास सोई व सुविधा पुरविणे.

व्दारावती विभागाकरिता आवश्यक ७२,००० नग मेडीमिक्स साबण (१२ ग्रॅम वडी) खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.१,८५,०००/- पर्यंतच्या खर्चास मा.व्य.समितीच्या दि.२८,०८.२०१४ चे सभेतील निर्णय क्रमांक ६८८ नुसार मान्यता मिळालेली आहे. सदरचा प्रस्ताव दि.१३.०९.२०१४ रोजी इकडेस प्राप्त् झालेला आहे.

व्दारावती भक्तनिवास विभागास मेडीमिक्स् साबणांची तातडीची आवश्यकता असल्याने सदरची खरेदी लवकरात लवकर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. साईटेक प्रकल्पातून निविदा प्रक्रिया होत नसल्यामुळे सदरची खरेदीही प्रचलित पद्धतीनेच प्रथम दि.१७.१०.२०१४ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा प्रक्रिया करण्यात आलेली होती. एकाही निविदेची विक्री न झाल्याने दि.०५.११.२०१४ रोजीचे टिपणीअन्वये फेरनिविदा प्रक्रिया करण्यात यावी असे ठरले. त्यानंतर दि.३०.१२.२०१४ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये दि. १६.०१.२०१५ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन फेर निविदा प्रक्रिया करण्यात आलेली होती. सदरच्या निविदा विक्री करणेकामी दहा निविदा तयार करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी पाच निविदांची विक्री झालेली आहे.

सदरच्या निविदाचे लिफाफे निविदा पेटीमध्ये स्विकारणेत आलेले आहेत. सदर निविदांची पेटी मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत उघडून प्रथम प्राप्त निविदेतील लिफाफा क्रमांक १ उघडून मागणी केलेल्या कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात येईल. कागदपत्रांची पुर्तता केलेल्या निविदाधारकांची निविदा पात्र ठरविता येईल. नंतर पात्र निविदाधारकांच्या मुळ निविदा उघडून योग्य निर्णय घेता येईल.

प्रस्तावित केल्याप्रमाणे व्दारावती भक्तनिवास विभागास मेडीमिक्स साबण खरेदीकामी प्राप्त निविदांमधील तांत्रिक लिफाफा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आला असता, त्यामध्ये एकच निविदाधारक पात्र आढळून आले.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवासस्थान विभागासाठी मेडिमिक्स साबण (१२ ग्रॅम वडी) खरेदीकामी एकच निविदाधारक पात्र असल्यामुळे तुलनात्मक दर प्राप्त होऊ शकत नाही, याकरिता सदरहू खरेदीकामी दुबार निविदाप्रक्रिया राबविणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**१४ श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरीता प्रयोगशाळा साहित्य खरेदी करणेकामी प्राप्त झालेली एकमेव निविदा उघडून पुरवठा आदेश देणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समिती दि.१२.०६.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.५१४ नुसार खालील नमुद केलेप्रमाणे विज्ञान प्रयोगशाळा साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रु. १,५०,०००/- खर्चास मान्यता मिळालेली आहे.

A) Physics Laboratory Requirement

B) Chemistry Laboratory Requirements

C) Biology Laboratory Requirements

मा.व्यवस्थापन समिती दि.१२.०६.२०१४ चे सभेतील निर्णयानुसार श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील दि.०९/०८/२०१४ चा मंजूर प्रस्तावने प्रथम नगर, नाशिक येथील वृत्तपत्रात जनसंपर्क कार्यालयामार्फत वृत्तपत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर आय.टी.विभागामार्फत जाहिरात देणेत आली होती. सदर वेळी फक्त एकच निविदा प्राप्त झाली आहे.

वरील प्रमाणे विज्ञान प्रयोगशाळा साहित्य (लॅब मटेरियल) खरेदीकामी जनसंपर्क कार्यालयामार्फत पुन्हा दुस-यांदा पुणे, मुंबई वृत्तपत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर आय.टी.विभागामार्फत जाहिरात देवून एकही निविदा प्राप्त झाली नाही. लॅब मटेरियल खरेदीकामी एकच निविदा प्राप्त झाली आहे. त्यामुळे एकच निविदा प्राप्त झाल्याने संस्थानचे लेखापरिक्षणाच्या दृष्टीने कामीत कमी ३ निविदा असणे आवश्यक आहे.

श्री साईबाबा कनिष्ठ महाविदयालयाकडील दि.०३.१२.२०१४चे मंजूर प्रस्तावाने तिस-यांदा संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत दि.१४.०१.२०१५ रोजी पुण्यनगरी-पुणे व सामना-मुंबई या वृत्तपत्रात तसचे संस्थानचे वेबसाईटवर आय.टी.विभागामार्फत जाहिरात देणेत आली होती. सदरवेळी एकही निविदा प्राप्त झाली नाही.

विज्ञान प्रयोगशाळा साहित्य (लॅब मटेरियल) खरेदी करणेबाबत.निविदेतील अटी-शर्तीनुसार खालील प्राप्त एकच तांत्रिक निविदा (Technical Bid) नं.१ व दरपत्रक (Commercial Bid) नं.२ सिलबंद पाकिटे उघडून निर्णय घेणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | आवक नंबर/ तारिख | तांत्रिक निविदा (Technical Bid) नं.१ | दरपत्रक (Commercial Bid) नं.२ | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | राज सायनटिफिक्स, नागपुर | ११४६७/ १९/०९/२०१४ | ०१ | ०१ | २ बंद पाकिटे |

उपरोक्त निविदाधारकांचे तांत्रिक निविदा तांत्रिक निविदा (Technical Bid) नं.१ व दरपत्रक (Commercial Bid) नं.२ सिलबंद पाकिटे मा.उपसमितीचे सभेत उघडून, दरपत्रकातील दरानुसार निविदाधारकास विज्ञान प्रयोगशाळा साहित्य (लॅब मटेरियल) खरेदीचा पुरवठा आदेश देणेबाबत निर्णय अपेक्षित आहे.

तरी राज सायनटिफिक्स, नागपुर यांची प्राप्त एकच तांत्रिक निविदा (Technical Bid) नं.१ व दरपत्रक (Commercial Bid) नं.२ सिलबंद पाकिटे आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत आली.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरीता प्रयोगशाळा साहित्य खरेदी करणेकामी राज सायनटिफिक्स, नागपुर यांचा उघडणेत आलेल्या निविदेमधील मूळ दरांचा तक्ता तयार करणेत येऊन, तो अंतीम निर्णयास्तव उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**१५ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाकरीता फर्निचर खरेदी करणेकामी प्राप्त कमर्शियल निविदा उघडणेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाने विविध प्रकारच्या हॉस्पिटल/ कार्यालयीन फर्नीचरची मागणी केलेली आहे. रुग्णालयात रुग्णांची संख्या वाढल्यामुळे कॉटची संख्या देखील वाढत आहे, त्यामुळे तेथे नविन फर्नीचरची मागणी केलेली आहे तसेच बऱ्याच वॉर्ड/ विभागातील फर्नीचर हे वापरुन खराब झालेले आहे, त्यामुळे त्यांनी नविन फर्नीचर मिळणेबाबत मागणी केलेली आहे. विविध वॉर्ड/ विभागाने मागणी केलेल्या फर्नीचरचा तपशिल सोबतच्या तक्त्यात दर्शविण्यात आलेला आहे.

उपरोक्त फर्नीचर खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. 7,99,421/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.28/08/2014 रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र. 724 अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाकरिता फर्निचर खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.7,99,421/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्रि प्रेस जरनल-मुंबई, लाईफ 365 इंग्लिश-पुणे, दिव्य मराठी-नाशिक, पुण्यनगरी-औरंगाबाद या वर्तमानपत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण 72 उत्पादक कंपन्या/ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.10/11/2014 ते 22/11/2014 पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.25/11/2014 अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन येथील कार्यालयात 06 निविदा प्राप्त झालेल्या आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr. no. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Quali Surge Surgical Pvt Ltd., Pune | 22/11/2014 |
| 2 | M/s. Sanjivani Hospital Furniture, Pune | 24/11/2014 |
| 3 | M/s. Sai Enterprises, Shrirampur | 25/11/2014 |
| 4 | M/s. Austin Healthcare, Pune | 25/11/2014 |
| 5 | M/s. Axenic Labs Pvt Ltd., Nashik | 25/11/2014 |
| 6 | M/s. Janak Healthcare Pvt Ltd., Mumbai | 25/11/2014 |

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या 06 सिलबंद तांत्रिका निविदा दि.06/01/2015 रोजी मा. उप समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहे. सदर तांत्रिक बाबीच्या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून M/s. Sai Enterprises, Shrirampur यांचेकडे कंपनीचे Authorization letter नसल्यामुळे उर्वरित 05 निविदाधारकांच्या कमर्शियल निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sr. No. | Description of Item | M/s. Quali Surge Surgical Pvt Ltd., Pune | M/s. Sanjivani Hospital Furniture, Pune | M/s. Austin Healthcare, Pune | M/s. Axenic Labs Pvt Ltd., Nashik | M/s. Janak Healthcare Pvt Ltd., Mumbai |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **Rate Per in Rs.** | **Rate Per in Rs.** | **Rate Per in Rs.** | **Rate Per in Rs.** | **Rate Per in Rs.** |
| 1 | Personnel Locker Unit<br>6 Door With Lock (Base)<br>Size:380Wx457Dx1830H (mm)<br>5 Nos. | --- | 15525/- | 15735.38 | **15008/-** | --- |
| 2 | I.V. Stand with Castor (Heavy)<br>5 Nos. | 1890/-<br>2520/-<br>3510/- | 2228/- | 3441.38 | **1958/-** | 3305.65 |
| 3 | Slotted Angle Rack - Open Type<br>Overall Size - H- 96" X W-36" X D-24"<br>Angle - 40 x 40 x 2mm (4Nos.)<br>Shelves - 36" x 24" (7 nos. Shelves making 6 compartment of 22 swg.)<br>Corner Plate - 8 nos.<br>Nuts & Bolts - 72 nos.<br>Shoes - 4 nos<br>Finish - All Steel parts are finished in high quality powder Coated after 10 Tanks antirust Treatment.<br>Colour – Gray<br>1 Nos. | --- | **11025/-** | 12724.88 | 12398/- | --- |
| 4 | S S Cupboard 6 Feet - Cupboard Stainless Steel - Size: 1981mm x 914mm x 483mm. Gauge of Steel 18 with four compartments.<br>6 Nos. | --- | **64125/-** | 88997/- | 76669/- | --- |
| 5 | Revolving Chair half back rest with side arm with wheel<br>23 Nos. | --- | **3544/-** | 4839.75 | 6361/- | --- |
| 6 | Cardiac Ward care Overbed Table - Overall approx. size: 1120mmL x 450mm W x 965mmH. MS tubular framework mounted on four twin wheel, non rusting castors, 50mm dia. Top 760mmL x 450mm W made of laminated board. Pretreated and powder coated. Supplied in kdc.<br>14 Nos. | 2970/-<br>3870/- | 4078/- | 12272.63 | 3833/- | **2729.25** |
| 7 | Revolving Chair full back rest with side arm with wheel<br>19 Nos. | --- | 5316/- | **4989.38** | 6688/- | --- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 7 | महांकाळे विठठल काशिनाथ | पत्नी | कॅन्सर | डॉ. रेडडी | बॉम्बे हॉस्पिटल | 10516.00 | 10516.00 |
| 8 | शकिला सलीम शेख | पती | | डॉ. रामनाईक | प्रवरा रुरल हॉस्पिटल, लोणी | 14993.00 | 14993.00 |
| 9 | पठाण नसरुल्ला नुरखॉ | पत्नी | | डॉ. शर्मा | रुबी हॉल | 2060.00 | 2060.00 |
| 10 | छाया पोपट शेलार | स्वत: | | डॉ. रामनाईक | रुबी हॉल | 15180.00 | 15180.00 |
| 11 | मोहन बबन शिरसाठ | स्वत: | जनरल | डॉ. मेहरोत्रा | सहयाद्री हॉस्पिटल, नाशिक | 209373.00 | 203231.00 |
| | | | | | **एकूण** | **389707.00** | **383565.00** |
| | **क. संस्थानचे मान्य यादीत नसलेले परंतु रेफर न केलेले हॉस्पिटल** | | | | | | |
| 12 | रामचंद्र बाबू दर्गे | पत्नी / मुलगी | जनरल | डॉ. के जी राठोड | | 8880.00 | 7104.00 |
| 13 | चंद्रकांत जयवंत रणशूर | स्वत: | अपघात | | मॅक्स सुपर स्पेशा., औरंगाबाद | 128101.00 | 102481.00 |
| | | | | | **एकूण** | **136981.00** | **109585.00** |
| | | | | | **अ+ब+क = एकूण** | **536098.00** | **500244.00** |

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम ५,००,२४४/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन मा. उप समितीचे पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस सविनय सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, कर्मचा-यांनी बाहेरुन आणलेली औषधे संस्थान हॉस्पिटलच्या मेडीकल स्टोअरमध्ये उपलब्ध होती का किंवा हॉस्पिटलच्या मेडीकल स्टोअरमध्ये उपलब्ध असतानासुध्दा डॉक्टरांनी बाहेरील औषधे लिहून दिली आहेत, याबाबत सविस्तर अभ्यास करुन सदरहू बीलांची फेर तपासणी करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२६ **मंदिराचे दक्षिण बाजुकडील व्दारकामाई मंदिर रेलीग ते गुरुस्थान दक्षिणेकडील गेट येथे लावण्यात आलेल्या बॅरीकेडस् ऐवजी बारीक छिद्राची उंच जाळी बसविणेकामी प्राप्त् टेंडर उघडणेबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 30/01/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 2 (17) अन्वये मंदिराचे दक्षिण बाजुकडील व्दारकामाई मंदिर रेलीग ते गुरुस्थान दक्षिणेकडील गेट येथे लावण्यात आलेल्या बॅरीकेडस् ऐवजी बारीक छिद्राची उंच जाळी बसविणेकामी बाहेरील फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून विहीत पध्दतीने जाहीरात प्रसि¬ü करुन कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 2,75,110/- खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार टेंडर

विक्रीसाठी दिनांक 11/02/2015 रोजी दैनिक सार्वमत वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात आली होती. तसेच वेबसाईटवर टेंडर नोटीस अपलोड केली होती. टेंडरची विक्री दिनांक 11/02/2015 ते 19/02/2015 अशी होती. या कालावधीमध्ये टेंडर विकत घेणाऱ्याची यादी खालीलप्रमाणे:

| अ.नं. | कोटेशनधारकांचे नांव | अ.नं. | कोटेशनधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड् फर्निचर्स, साकुरी | 5. | शिवशक्ती फॅब्रिकेशन वर्क्स, श्रीरामपूर |
| 2. | सुपर ॲग्रो इंडस्ट्रीज, साकुरी | 6. | अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद |
| 3. | ऋषीकेश फॅब्रिकेशन, साकुरी | 7. | साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक |
| 4. | प्रेस-व्हॅक इंडस्ट्रीज, सिन्नर्, नाशिक | | |

वरीलप्रमाणे एकूण 7 फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून मुदतीत कोटेशन खरेदी केले होते. कोटेशन सबमिशन तारीख 23/02/2015 अशी होती. त्यानुसार मुदतीत खालीलप्रमाणे शिलबंद 5 कोटेशन प्राप्‍ झालेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनधारकांचे नांव | अ.नं. | कोटेशनधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड् फर्निचर्स, साकुरी | 4. | साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक |
| 2. | शिवशक्ती फॅब्रिकेशन, वर्क्स, श्रीरामपूर | 5. | अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद |
| 3. | सुपर ॲग्रो इंडस्ट्रीज, गणेशनगर | | |

उपरोक्‍ प्रमाणे मंदिराचे दक्षिण बाजुकडील व्दारकामाई मंदिर रेलीग ते गुरुस्थान दक्षिणेकडील गेट येथे लावण्यात आलेल्या बॅरीकेडस् ऐवजी बारीक छिद्राची उंच जाळी बसविणेकामी प्राप्‍ झालेली 5 कोटेशन्स आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकांचे नांव | कोटेशनमधील मूळ दर रु. |
|---|---|---|
| 1. | सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड् फर्निचर्स, साकुरी | २,८७,८०५/- |
| 2. | शिवशक्ती फॅब्रिकेशन, वर्क्स, श्रीरामपूर | **२,५१,७५४/-** |
| 3. | सुपर ॲग्रो इंडस्ट्रीज, गणेशनगर | २,८८,१८०/- |
| 4. | साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक | २,७५,३००/- |
| 5. | अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद | २,६०,१०५/- |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिराचे दक्षिण बाजुकडील व्दारकामाई मंदिर रेलीग ते गुरुस्थान दक्षिणेकडील गेट येथे लावण्यात आलेल्या बॅरीकेडस् ऐवजी बारीक छिद्राची उंच जाळी बसविणेकामी शिवशक्ती फॅब्रिकेशन वर्क्स, श्रीरामपूर यांचे रु.२,५१,७५४/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

२७ **श्री साई प्रसादालयातील वायुवीजन यंत्रणेचे सन 2015-2016 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेसाठी मान्यता मिळणेबाबत.**

श्री साई प्रसादालय येथील मुख्य् किचन, बुंदी किचन, लाडू किचन, पुरी किचन तसेच चपाती किचन येथील कर्मचाऱ्यांना उन्हाळ्यात त्याठिकाणी काम करणे सुसह्य व्हावे म्हणून तापमान सुस्थितीत ठेवणेसाठी बाहेरुन गार हवेचा झोत सोडून तापमान नियंत्रणात ठेवणे तसेच हवेतील आर्द्रता नियंत्रणात ठेवणे जेणेकरुन त्या-त्या किचनमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना श्वास घेण्यास त्रास होऊ नये. शिवाय किचनमधील जळालेले तेलाचे बाष्प् आणि इतर घाण एक्झॉस्टव्दारे बाहेर जावी याकरीता 8 नग डक्टेबल वायुविजन यंत्रणा व 10 नग सेंट्रीफ्युगल डक्टेबल एक्झॉस्ट् यंत्रणा डिसेंबर, 2008 पासून कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

सदरची वायुविजन यंत्रणा सतत कार्यान्वित असते. सततच्या वापरामुळे वायुविजन यंत्रणेत बिघाड झाल्यास तेथील किचनमध्ये तापमान वाढून आर्द्रता कमी होऊन काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना श्वसनाचा त्रास होऊ शकतो. प्रसंगी सदरचा कर्मचारी बेशुध्दसुध्दा पडू शकतो. त्याकरीता वायुविजन यंत्रणा तातडीने दुरुस्त् करुन चालू करणे गरजेचे असते. अशावेळेस वायुविजन यंत्रणा दुरुस्तीकरीता लागणारे स्पेअरपार्ट त्वरीत उपलब्ध् असणे गरजेचे आहे. जर स्पेअर्स उपलब्ध् नसतील तर वायुविजन यंत्रणेचे दुरुस्ती कामामध्ये अडचण निर्माण होते व कर्मचाऱ्यांच्या प्रकृतीला त्रास होऊन कामकाजात खंड पडू शकतो.

मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक 15/03/2014 रोजी झालेल्या सभेत निर्णय क्र. 174 (04) अन्वये श्री साई प्रसादालयातील वायुविजन यंत्रणेचे सन 2014-15 या एक वर्षाचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी मे. ओमकार इंजिनिअरींग वर्क्स प्रा. लि., पुणे यांना दिनांक 01/04/2014 ते 31/03/2015 या कालावधीकरीता कार्यादेश देण्यात आला आहे. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक 31/03/2015 रोजी संपत आहे.

आता, श्री साई प्रसादालयात वायुवीजन यंत्रणेचे सन 2015-2016 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) दिनांक 01/04/2015 ते 31/03/2016 या कालावधीसाठी देणेकामी येणाऱ्या अंदाजे अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे:

| Sr. No. | Description | Qty | Unit Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01) | AMC charges as per scope of activity mentioned in offer for the year 2015-2016 | 1 Job | 7,08,000/- | 7,08,000/- |

उपरोक्तप्रमाणे श्री साईप्रसादालय वायुवीजन यंत्रणेचे सन 2015-2016 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी अंदाजे रक्कम रुपये 7,08,000/- (अक्षरी रुपये सात लाख, आठ हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री साई प्रसादालयातील वायुविजन यंत्रणेचे सन 2015-2016 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) पुढील कालावधीसाठी येणाऱ्या 7,08,000/- अंदाजे अपेक्षित खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहीरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात अपलोड करुन निविदा बोलविणेसाठी सदर प्रस्ताव मा. उप-समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील वायुविजन यंत्रणेचे सन** 2015-2016 **या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट्** (CAMC) **देणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.७,०८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

२८ **श्री साई प्रसादालयाचे पूर्व बाजूकडील संरक्षण भिंतीची उंची वाढविणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्ता निधीचा विनियोग करणे, अशी तरतुद आहे.

**प्रस्तावः-** साईभक्तांना अल्प दरात प्रसाद भोजन उपलब्ध करुन देण्यासाठी मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थान मालकीचे गट नं.८०, ८५ मध्ये श्री साईप्रसादालय उभारणेत आलेले आहे. मा. कार्यकारी अधिकारी यांनी दि.१२/१०/२०१४ व दि.०८/११/२०१४ रोजी श्री साई प्रसादालय परिसराची पहाणी केली. सदर पहाणी दरम्यान श्री साई प्रसादालयाचे संरक्षण भिंतीची उंची कमी असल्याने सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सदर भिंतीची उंची वाढविणे आवश्यक असलेबाबत निर्देश दिले आहे. याबाबत दि.०८/११/२०१४ रोजी पत्रान्वये प्रसादालय विभागाने कळविले आहे.

प्रसादालयाचे सध्याचे कंम्पाउंड भिंतीची उंची सरासरी ४'.६'' असून तिच्यावर ३' उंचीची चेनलिंक जाळी बसविलेली आहे. सदर चेनलिंक जाळीचे वरुन सहजरित्या कोणीही प्रसादालय परिसरात प्रवेश करुन शकतो. त्यासाठी सदरहू भिंतीची २'.६'' इतकी उंची वाढविणे आवश्यक आहे. त्यावर सध्या बसविलेली चेनलिंक जाळी पुन्हा बसविता येईल. त्यानुसार प्रसादालयाच्या पूर्व बाजूकडील काही भागात कंम्पाउंड भिंतीची उंची वाढविणेकामी सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकानुसार रु.८,९४,६०२/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री साई प्रसादालयाचे पूर्व बाजूकडील काही भागात कंम्पाउंड भिंतीची उंची वाढविणेकामी येणा-या अपेक्षित खर्च रु.८,९४,६०२/- मात्रचे खर्चास व त्यासाठी विहीत पध्दतीने जाहिरातीद्वारे निविदा मागविणेकामी सदर प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाचे पूर्व बाजूकडील काही भागात कंम्पाउंड भिंतीची उंची वाढविणेकामी जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.८,९४,६०२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२९ **संस्थान परिसरातील नारळ फळे (शहाळे) विक्री करणे बाबत.**

बगीचा विभागामार्फत संस्थान परिसरामध्ये व साठवण तलावाचे चारही बाजुने व पश्चिमेला आंबा- नारळ बागेत, धर्मशाळा परिसर, साईनगर, नविन भक्त निवास परिसर, शैक्षणिक संकुल परिसरात नारळ झाडे लावण्यात आलेले आहे. सदर नारळ झाडांना नविन बहाराचे फळे येण्यास सुरवात झाली आहे.

मा. व्यवस्थापन समितीच्या दि. 8/12/2012 रोजीच्या सभेतील निर्णय क्र. 1002 अन्वये कोटेशन धारकांनी शहाळे विक्री करणेकामी संस्थान परिसरात जागा उपलब्ध करुन द्यावी अशी अट घातल्यामुळे सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला होता. परंतु नारळ झाडावरील फळ पक्व होऊन खोबरे होण्याची शक्यता असल्यामुळे दि.04/02/2013 च्या टिपणी अनवये विभागामार्फत कर्मचारी नेमुन नारळ विक्री करावी असे ठरले. परंतु विभागातील मनुष्यबळा अभावी संस्थान परिसरातील शहाळे फळ विक्रेते यांना विक्री करणेस दि. 26/02/2013 च्या कार्यालयीन टिपणी अन्वये दि. 08/02/2012 रोजीच्या सभेत वाटाघाटीत ठरलेल्या मंजुर दर रु.8/- प्रती नग याप्रमाणे नारळ विक्री करणेस मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानुसार एप्रिल-2013 ते जानेवारी-2015 अखेर संस्थानला 2,43,880/- (दोन लाख त्रेचाळीस हजार आठशे ऐंशी) मात्र उत्पन्न मिळालेले आहे.

नारळांच्या झाडांना नविन बहारचे फळे येण्यास सुरुवात झाल्यामुळे व नारळ फळांचा मार्केट मधील वाढता भाव पाहता शहाळे फळाची विक्री करणेकामी दि. 13/01/2015 रोजीच्या टिपणी अन्वये फलक लावणेस मान्यता घेण्यात आलेली होती. नारळ फळे (शहाळे) विक्री करणेबाबतचा कालावधी एक वर्षाचा ठेवण्यात आलेला असुन सदर नारळ (शहाळे) फळाची विक्री करणेकामी शिर्डी, कोपरगाव मार्केट यार्ड तसेच शिर्डी नगरपंचायत व राहाता नगरपरिषद

इ. ठिकाणी फलक लावून प्रसिध्दी करण्यात आली होती. दरपत्रके सादर करावयाची मुदत दि.30/01/2015 अखेर संपलेली असुन अद्याप एकही दरपत्रके प्राप्त झालेले नाही.

नारळ फळांची (शहाळे) विक्री करणेकामी दरपत्रके प्राप्त झालेली नसल्यामुळे झाडावरील नारळ फळे पक्व होऊन खोबरे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नारळ फळे विभागामार्फत विक्री करण्यासाठी नारळ झाडांवर चढुन नारळ फळे काढावी लागतात. सदर नारळ झाडांची ऊंची 25 फुटापेक्षा जास्त असल्याने नारळ शहाळे काढणेकामी कर्मचारी झाडावर चढत नाही. नारळ फळे विभागातील कर्मचाऱ्यांमार्फत काढले गेले तर कर्मचारी खाली पडुन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर नारळ फळे काढणेकामी 3 कामगारांची आवश्यकता असते. तसेच त्यांची विक्री करणेकामी 2 कामगारांची आवश्यकता असते. त्यामुळे नारळ फळाची वाहतुक करणे,विक्री करणे इ. कामे करणेसाठी येणारा खर्च कधी कधी विक्री पेक्षा ही जास्त वाटतो.

नारळांच्या झाडांना नविन बहारचे फळे येण्यास सुरुवात झालेली आहे. झाडावरुन नारळ काढणे त्यांची वाहतुक करणे हि कामे करावी लागतात. झाडावरील नारळ फळे हे मागील दराने रु.8/- प्रती नग याप्रमाणे विक्री चालु आहे. नारळ फळांचा मार्केटमध्ये भाव वाढलेला आहे. सदर बाबीचा विचार करता 11 महिने कालावधीसाठी व्यापाऱ्याकडुन दर मागवुन शहाळे विक्री करता येईल. संस्थानने शहाळे प्रती नग रु. 10/- कमीत कमी ठरवुन दरपत्रके मागवुन घेणेस व मान्यतेसाठी सादर

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरातील नारळ फळे (शहाळे) विक्री करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**३० प्रामा किचन इक्वीपमेंट, बडौदा यांचेकडील 02 टेक्निशियनची प्रसादभोजन, चहाची व निवासव्यवस्था विनामुल्य होणेबाबत.**

बेंगलोर येथील साईभक्त श्री शैलेष कुमार पटेल यांनी साईभक्तांना प्रसादभोजनामध्ये जास्तीत जास्त चपाती मिळावी याकरीता भक्तांच्या सेवेसाठी बरोडा येथील "प्रामा किचन इक्विपमेंट" या कंपनीचे तासी 3500 ते 4000 क्षमतेचे चपाती मशिन दि.26/02/2015 रोजी श्री साई प्रसादालय विभागास देणगी दिलेले आहे. सदर मशिनचा उदघाटन समारोह श्री साईबाबा संस्थान विश्वस्त समितीचे सदस्य मा.अनिल कवडे साहेब, तथा जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे शुभ हस्ते दुपारी 13.30 वाजता पार पडलेला असून मशिनद्वारे चपाती बनविणेचे कार्य सुरु करण्यात आले आहे.

सदरचे मशिन व्यवस्थित रित्या कार्यान्वित होईपावेतो अथवा मशिन नविन असलेकारणाने चालु स्थितीत काही तांत्रिक अडचणी निर्माण झालेस त्यांचे निरसन अथवा दुरुस्तीचे काम लगेचच तातडीने होणे आवश्यक आहे. तसेच श्री साई प्रसादालयातील चपाती मशिन ऑपरेटर यांनाही सदर मशिनची माहीती होणे गरजेचे आहे. श्री शैलेश पटेल, श्री चपाती मशिन देणगीदार यांनी चपाती मशिन पुरवठादार यांचेबरोबर त्यांचेकडील दोन कर्मचारी (ऑपरेटर्स) 12 महिने चपाती मशिनची विना मोबदला देखभाल करील फक्त त्यांचे ऑपरेटर्सची प्रसादभोजन,चहा व निवासव्यवस्था संस्थानमार्फत नि:शुल्क होणेबाबत तोंडी विनंती केलेली आहे.

त्यानूसार "प्रामा किचन इक्विपमेंट" या कंपनिचे 02 टेक्निशियन यांना अंदाजे 12 महिनेपर्यंत साई प्रसाद निवासस्थान येथे निवासाची व श्री साई प्रसादालयामार्फत प्रसादभोजन व चहाची व्यवस्था विनामुल्य करता येईल. त्यासाठी अंदाजे येणारा अंदाजे अपेक्षीत खर्च खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशील | अंदाजे अपेक्षीत खर्च |
|---|---|---|
| 1) | साई प्रसाद निवासस्थान येथे<br>1 रुम x 365 दिवस x रु.100/- प्रतिदिन प्रमाणे | रु.36,500/- |
| 2) | प्रसादभोजन खर्च<br>2 टेक्नीशियन x प्रती भोजन रु.10/- प्रमाणे x 365 दिवस x 2 वेळ | रु.14,600/- |
| 3) | दोन वेळ चहा खर्च<br>02 x प्रती चहा 2/- प्रमाणे x 365 दिवस x 2 वेळ | रु.2,920/- |
| | **एकूण रुपये =** | **रु.54,020/-** |

तरी प्रामा किचन इक्वीपमेंट, बडौदा यांचेकडील 02 टेक्नीशियन करीता एक रुम (12 महिने कालावधीसाठी) साईप्रसाद निवासस्थानकडून निवासासाठी, तसेच श्री साई प्रसादालयाकडून दोन वेळ चहा व प्रसादभोजनाची व्यवस्था निशु:ल्क करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.54,020/- चे खर्चास मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव मा.उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, प्रामा किचन इक्वीपमेंट, बडौदा यांचेकडील 02 टेक्निशियनची चहा, प्रसादभोजन व निवासाची १२ महिने कालावधीसाठी विनामुल्य व्यवस्था करणेस व याकामी येणा-या अदाजे रु.५४,०२०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय/ प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

**विषय नं.०३** **बांधकाम प्रगती अहवाल अ व ब तक्ता.**

संस्थानमध्ये चालू असलेल्या बांधकामाच्या प्रगतीचा अ तक्ता व काम पूर्ण झालेले असून अंतीम बीले अदा करणेबाबतचा ब तक्ता यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.७५** **उपरोक्त बांधकाम प्रगती अहवालाचा अ व अंतीम बीलांच्या ब तक्त्यावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**(१) अ तक्त्यामधील ज्या बांधकाम ठेकेदारांना वेळोवेळी मुदतवाढ देऊनही त्यांची कामे अपुर्ण आहेत अशा ठेकेदारांना चर्चेसाठी सभेसमोर बोलविणेत यावे. तसेच जे ठेकेदार काम करु शकत नाही, त्यांची अनामत रक्कम जप्त करणेत येऊन, त्यांचे नावाचा काळया यादीत समावेश करणेत यावा.**

**(२) कामे पूर्ण केलेल्या ब तक्त्यामधील बांधकाम ठेकेदारांची अंतीम बीले अदा करणेत यावीत.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०४** **जमाखर्च तक्ता माहे नोव्हेंबर, डिसेंबर- २०१४.**

माहे, नोव्हेंबर, डिसेंबर- २०१४ मधील जमा अनुक्रमे रु.३९,३५,२७,८४२/- व रु.४६,४१,९३,४०४/- तसेच खर्च रु.१३,५७,७८,७०७/- व रु.१५,११,३५,८६०/- मात्र तक्त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ७६** **माहे, नोव्हेंबर, डिसेंबर- २०१४ जमाखर्च तक्त्यावर सविस्तर चर्चा होऊन, त्याची नोंद घेण्यात आली व त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.०५** **दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ पासून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष सुरु होणार असल्याने शिर्डी व लगतच्या परिसराचे विकासाकरीता कृती आराखडा तयार करणेसाठी सल्लागार संस्था नेमणेकामी Tata Consulting Engineers Limited, Noida यांचे सादरीकरण पाहून प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष सन २०१७ -२०१८ मध्ये शिर्डी येथे येणा-या साईभक्तांसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने दिर्घकालीन गरजा विचारात घेऊन सर्व संबंधित विभागांचा एकत्रित कृती आराखडा तयार करुन त्यानुसार कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र/ राज्य शासन व संस्थान मार्फत आवश्यक निधी/ अनुदान उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने अंतिम कृती आराखडा तयार करणेसाठी महाराष्ट्र शासन, विधी विभाग निर्णय क्र.सासंवि-२०१३/प्र.क्र.१/का.१६, दि.२२/१०/२०१३ अन्वये सन्मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

याप्रमाणे हाती घ्यावयाच्या प्रकल्पाचे स्वरुप ठरविणेसाठी सर्वांगिण अभ्यास व सर्वेक्षण करुन सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report) तयार करणेसाठी सल्लागार संस्थेची नेमणूक करणे आवश्यक आहे.

याबाबतचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे दि.१३/१२/२०१३ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील नि.क्र.९४३ अन्वये याकामीया क्षेत्रातील नामांकीत,अनुभवी व मोठया स्वरुपाची कामे केलेल्या सल्लागार संस्थाना निमंत्रित करणेत यावे असे ठरले होते. त्यानुसार दि.१३/१०/२०१४ अखेर पर्यंत अंतीम मूदतीत खालील तीन सल्लागारांचे प्रस्ताव संस्थानकडे जमा झाले.

| अ.न. | सल्लागाराचे नाव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | Tata Consulting Engineers Limited, Noida | ११६८१ / दि.२२/०९/२०१४ |
| ०२. | Fortress Infrastructure Advisory Services, Mumbai | ०१३२८९ / दि.१३/१०/२०१४ |
| ०३. | Ernst & Young LLP, Hyderabad | ०१३२६६ / दि.१३/१०/२०१४ |

सदरहू प्रकल्प हा मोठ्या स्वरुपाचा असल्याने वर नमूद सल्लागार यांनी सादर केलेल्या वाणिज्यीक प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे दि.२०.११.२०१४ रोजीचे सभेत उघडणेत येऊन नि.क्र.८१४ अन्वये उपरोक्त तिन झालेले तांत्रिक व वाणिज्यीक प्रस्तावांचे मुल्यमापन करणेत येऊन त्याचा सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करण्यात यावा असे ठरले होते.

याकामी तांत्रिक व वाणिज्यीक प्रस्तावांचे मुल्यमापन करणेकामी दि.२०/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९८९/१२ अन्वये सल्लागार Arham Constrotech pvt.ltd. Nashik Road यांचे दर मान्य करुन त्यांचेकडून वरिल प्राप्त प्रस्तावांचे मुल्यमापन करुन घेणेकामी त्यांना नियुक्ती आदेश देण्यात यावा असे ठरले. त्यानुसार Arham Constrotech pvt.ltd. Nashik Road यांना संस्थानचे जा.क्र.४४०६/२०१४ दि.१५/१२/२०१४ अन्वये नियुक्ती आदेश देण्यात आला.

सल्लागार Arham Constrotech pvt. ltd. Nashik Road यांनी उपरोक्त प्राप्त ०३ ही प्रस्तावांचे तांत्रिक व वाणिज्यीक माहितीचे मुल्यमापन करुन त्यांचेकडील दि.०१.०१.२०१५ (आवक नं.०१९३६७, दि.०७.०१.२०१५) अन्वये सविस्तर मुल्यमापन अहवाल सादर केला असून तो सोबत अवलोकनार्थ ठेवला आहे. या अहवालाचा गोषवारा खालिलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Name Of Consulting Firm | Technical Score (ST) | Financial Score (SF) | Total Marks S = (STx0.7) + (SFx0.3) | Remark |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Tata Consulting Engineers Limited, Noida | 69.95 | 100 (Fees Quoted Rs. 87,30,000) | **78.97** | **Recomnended for award.** |
| 2. | Fortress Infrastructure Advisory Services, Mumbai | 70.23 | 12.23 (Fees Quoted Rs. 7,19,95,000) | 52.83 | |
| 3. | Ernst & Young LLP, Hyderabad | 62.71 | 29.59 (Fees Quoted Rs. 2,95,00,000) | 52.77 | |

उपरोक्त सल्लागार Arham Constrotech pvt.Ltd. Nashik Road यांचे अहवालानुसार Tata Consulting Engineers Limited, Noida यांना इतर दोन सल्लागारांपेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत. तसेच त्यांनी याकामी निम्नतम रु.८७,३०,०००/- मात्र इतक्या फीचा देकार वरील प्रस्तावाव्दारे सादर केला आहे.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेबाबत मा. त्रिसदस्य समितीचे दि.१८/०२/२०१४ रोजीचे सभेपुढे विषय सादर करण्यात आला होता. सदरहू सभेतील निर्णय क्र.३२ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"दिनांक ०१ ऑक्टोबर २०१७ पासून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष सुरु होणार असल्याने शिर्डी व लगतच्या परिसराचे विकासाकरिता कृती आराखडा तयार करणेकामी सल्लागार संस्था नेमणेसाठी प्रस्तावातील गुणांकाप्रमाणे* Tata Consulting Engineers Limited, Noida *यांचे नेमणूकीबाबत ते करणार असलेल्या कामाचे सादरीकरण समितीसमोर सादर करण्यात यावे. सदरहू सादरीकरण पाहून अंतिम निर्णय घेतला जाईल असे ठरले".*

तरी श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षाकरीता शिर्डी व लगतच्या परिसराचे विकासाकरीता कृती आराखडा तयार करणेसाठी सल्लागार संस्था Tata Consulting Engineers Limited, Noida यांचे सादरीकरण पाहून प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७७** **आजचे सभेत Tata Consulting Engineers Limited, Noida यांचे (1) Shri B.M. Date, Deputy General Manager, Architecture (2) Shri P.K. Arunkumar, Sector Head– Urban Development & Planning (3) Shri Vishal Pawar, Senior Manager- Enviroment हे प्रतिनिधी हजर होते, त्यांनी सभेसमोर खालील मुद्यांबाबत सादरीकरण केले.**

- A bout TCE
- Terms of Reference & Scope of work
- Project Milestones
- Project Back graound
- Approch and Methodology
- Experience in similar projects.

यावेळी TCE कपंनीचे उपस्थित सदस्यांनी TCE कंपनी ही ISO 9001:2008 प्रमाणीत कंपनी असून १९६२ सालापासून या क्षेत्रात कार्यरत आहे. भारतातील मुंबई, बेंगलोर, दिल्ली, पुणे चेन्नई, मजशेदपूर व कोलकत्ता या सात शहरांमधे त्यांचे कार्यालये असून त्यांमधून आता पर्यंत ७४०० प्रकल्प पूर्ण केलेले आहेत. यात प्रामुख्याने Water & Urban development ports & Transportation व Building & Architecture या कामांचा समावेश आहे.

श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षा निमित्त शिर्डी व लगतचे परिसराचा विकास करणेसाठी खालील मुख्य बाबी विचारात घ्याव्या लागतील असे त्यांनी नमूद केले.

1) Development & widening of roads in and around Shirdi
2) Development of Parking lots
3) Development of public Toilets
4) Additional water supply & sewerage scheme.
5) Solid waste management
6) Additional sewage disposal scheme
7) Extension of electricity supply & distribution system
8) Systemization of public transport facilities
9) Development of parks of garkens
10) Deveopment of accommodation facilities
11) Planning of health related services & facilities
12) Preliminary frame work for disaster & mitigation

उपरोक्त कामे करणेसाठी खालील दोन टप्प्यात कार्यवाही करणेत येईल.

Stage - I - Time line - 12 weeks from issue of LOA

a) Coceptual master plan

b) Preliminary layouts & Schematic drawings of individual infra structure components

c) Concept note

d) Project proposal

Stage - II - Time line - 08 weeks after approval of stage – I

a) Deaft detailed project Report

b) Final detailed project Repot

TCE यांचे प्रतिनिधींनी सदर प्रकल्पातील त्यांच्या Planning Aproach व Methodology आजचे सभेसमोर विस्तृत स्वरुपात सादर केली. तसेच त्यांनी यापूर्वी केलेल्या प्रकल्पांबाबत उपस्थितांना माहिती दिली.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, Tata consulting Engineers यांना नाशिक येथे आयोजीत कुंभमेळा– २०१५ येथील भक्तांसाठी उपलब्ध केलेल्या सोयीसुविधांचा अभ्यास करुन त्या धर्तीवर शताब्दी महोत्सवाकरीता प्रस्ताव तयार करणेस सूचना करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **रुग्णालयातील वैद्यकिय संचालक, उपवैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक व इतर कर्मचारी पदे भरतीबाबतचे मुलाखतीसंबंधी बंद पाकिट उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.३०/०१/२०१५ रोजीचे ओदशानुसार १) मा. संचालक वैद्यकिय शिक्षण व संशोधन यांचे प्रतिनिधी डॉ चंदनवाले, अधिष्ठाता, बी जे मेडीकल कॉलेज, पुणे २) मा. संचालक आरोग्य सेवा मुंबई यांचे प्रतिनिधी मा डॉ पवार उपसंचालक आरोग्य सेवा मंडळ नाशिक ३) मा. व्यवस्थापनाचे प्रतिनिधी म्हणून डॉ सोनवणे,जिल्हा शल्यचिकित्सक अहमदनगर या त्रिसदस्यीय निवड समितीसमोर दि.०१/०३/२०१५ रोजी उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या . जाहिरातीनुसार २९ पदासाठी ३०२ अर्ज प्राप्त झाले होते त्यापैकी १४९ उमेदवारांना मुलाखतीसाठी पत्र देण्यात आजे होते, त्यापैकी ७८ अमेदवार मुलाखतीसाठी समक्ष हजर होते या उमेदवारांची उपरोक्त निवडसमिती समोर दि.०१/०३/२०१५ रोजी मुलाखती घेण्यात आल्या. सदरच्या मुलाखतीचे व्हिडीओ चित्रीकरण केलेले आहे. मुलाखती पूर्ण झालेनंतर त्याच दिवशी निवडसमितीने मुलाखतीसंबंधी कागदपत्रे (मार्कशिट) सिल केले होते.

आज दि.०६/०३/२०१५ रोजी उपरोक्त निवड समितीचे सदस्य शिर्डी येथे समक्ष हजर राहून दि.०१/०३/२०१५ रोजीचे सिलबंद पाकीट उघडून संबंधित सर्व कागदपत्राची छाननी करून अंतिम मार्कलिस्ट व गुणवत्ता यादी तयार केली. तसेच संपूर्ण कार्यवाहीचे इतिवृत्त निवड समितीच्या सदस्यांनी तयार केले अंतिम मार्कलिस्ट, गुवणत्ता यादी व इतिवृत्त निवडसमितीने बंद पाकिटात सिलबंद केले आहे. सदरचे कार्यवाहीचे व्हिडिओ चित्रिकरण केले आहे.

सदरचे बंद पाकिट उघडून त्यावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७८** **रुग्णालयातील वैद्यकिय संचालक, उपवैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक व इतर कर्मचारी पदे भरतीबाबतच्या मुलाखतीसंबंधीचे बंद पाकिट आजचे सभेसमोर उघडणेत आले. उमेदरावांना मिळालेले गुण, त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, रिक्त पदे या सर्व गोष्टींचा त्री-सदस्यीय समितीने बारकाईने अभ्यास केला व ज्या पदांसाठी लायक उमेदवार मिळाले त्यांची त्या संबंधीत पदावर निवड करुन, निवडलेल्या उमेदवारांची यादी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर ताबडतोब प्रसिध्द करणेत आली. तसेच वैद्यकिय संचालक पदासाठी काही तांत्रिक बाबींकरिता गोपनीय अहवाल शासनास पाठविणेच्या सुचना केल्या व तोपर्यंत सदर पदाच्या नेमणूकीविषयीचा निर्णय स्थगित ठेवणेत आला व तसे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आले.**

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, निवड समितीने नियुक्तीसाठी शिफारस केलेल्या उमेदवारांना नेमणूक आदेश देण्यात यावा. तसेच निवड समितीच्या शिफारशीनुसार ज्या पदासाठी योग्य व लायक उमेदवार मिळाले नाहीत, त्या पदांसाठी पुन्हा जाहिरात प्रसिध्द करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.०७** **जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे स्वच्छतागृह बांधणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम– २००४ मधिल तरतूद:-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम, २००४ कलम २१ मधील "(१क) पोट–कमल (१) च्या तरतुदींना अधीन राहून विश्वव्यवस्थेस, राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधीन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यासारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकिय विभागांना, शासकिय महामंडळांना, शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल." अशी तरतुद आहे.

**प्रस्तावः-** तहसिलदार सामान्य प्रशासन जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे जा.क्र/साप्रशा/कार्या/रवका/३९६/ २०१४/ दिनांक ११/११/२०१४ रोजीचे पत्रान्वये तहसिलदार सामान्य प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय नगर यांनी कळविले आहे कि, जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये विविध कामानिमित्त नागरिकांची वर्दळ/ गर्दी असते. कार्यालयामध्ये शौचालयाची व्यवस्था नसल्याने नागरिकांची गैरसोय होते. याकरीता जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे स्वच्छतागृहाची व्यवस्था करुन देणेबाबत तहसिलदार सामान्य प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांनी त्यांचेकडील दि. ११/११/२०१४ रोजीचे पत्राने प्रस्ताव सादर केला आहे.

सदरचे प्रस्तावाबाबत जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडून इकडील जा. नं. ४३४०/२०१४ दि. १२/१२/२०१४ रोजीचे पत्रान्वये पुरुष व महिलांकरीता किती मुतारी व संडास बांधवयाचे आहेत व यासाठी किती जागा उपलब्ध आहे. तसेच याकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक व नकाशा खर्चाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेसाठी विस्तृत स्वरुपाचा प्रस्ताव सादर करणेबाबत कळविणेत आले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांनी त्यांचेकडील दि. ०६/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून रु.१३,०८,६८५/- मात्र खर्चाचे अंदाजपत्रक व आराखडे पाठविले आहेत.

तथापी सदरचे काम संस्थानचे देखरेखीखाली करणे शक्य नसल्याने सदरचे कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे उपरोक्त प्रमाणे निधी वर्ग करणे योग्य होईल. मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी पी. आय.एल. नं. १८/२०११ मधिल सिव्हिल ॲप्लीकेशन नं. १२०५६/२०१२ वर दि.१६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदरहू प्रकल्प हा मोठ्या खर्चाचा असल्याने त्यासाठी प्रथम मा.त्रिसदस्य समितीची मान्यता घेऊन मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून सदरचा निधी कामाचे प्रगतीनुसार टप्प्याटप्याने सार्वजनीक बांधकाम विभागाकडे वर्ग करणेसाठी मान्यता घ्यावी लागेल.

तरी जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे शौचालयाचे बांधकाम करणेसाठी रक्कम रु.१३,०८,६८५/- मात्रचा निधी कामाचे प्रगतीनुसार टप्प्याटप्याने सार्वजनीक बांधकाम विभागाकडे वर्ग करणेसाठी शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई व मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करणेस तत्वतः मान्यता मिळणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रस्ताव हा संस्थान अधिनियमाचे कृती कक्षेबाहेरील असल्याने जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे स्वच्छतागृह बांधणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०८** **शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणे व त्यापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने करणेविषयी म.रा. मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाचे करारनाम्यासाठी मुद्रांक शुल्क व नोंदणी फी भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथिल सर्व्हे नं.१७१ मधिल महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे मालकीचे जागेत संस्थानचे निधीतून बस स्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम, ठेकेदार मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि., पुणे यांचेमार्फत सध्या प्रगतीत आहे. सदरहू संपुर्ण इमारत संस्थानचे निधीतून बांधकाम करणे व बांधकाम पूर्ण झाल्यानंतर तळमजल्यावरील माहिती केंद्र व दुकान गाळा, तसेच पहील्या व दुस-या मजल्यावरील भक्तनिवासाचा वापर संस्थानसाठी करणे इत्यादी अटी व शर्तीचा समावेश असलेला करारनामा संस्थान व राज्य परिवहन महामंडळ यांचे दरम्यान करावयाचा आहे.

याबाबत संस्थान व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१४ रोजीचे सभेत खालील प्रमाणे निर्णय क्र.३०६ समंत करण्यात आलेला आहे.

*''यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१/१२ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणेविषयी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाचे करारनाम्यामध्ये, भविष्यात कुठलाही एकतर्फी निर्णय होऊ नये याकरिता मा. अध्यक्ष महोदय व मा. कार्यकारी अधिकारी यांचे नावाचा त्यामध्ये समावेश असावा.*

*तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी ठरवून दिलेले रु.१/- मात्र प्रती चौ. मीटर, प्रती वर्ष (एकूण क्षेत्रासाठी रु.२,५५४/- मात्र) हे निश्चीत करणेत यावे, त्यामध्ये करारनाम्याची मुदत संपेपर्यंत वाढ करता येणार नाही, याचा उल्लेख करावा, असे ठरले.''*

उपरोक्त निर्णयानुसार करारनाम्याचे अट क्र.२० व अंतिम परिच्छेदात सुधारणा करुन त्यानुसार करारनामा करण्यात यावा अशी विनंती मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मंबई यांना इकडील विविध पत्रांन्वये करण्यात आली होती. त्यानुसार उपरोक्त संदर्भिय क्र.५ अन्वये मुख्य स्थापत्य अभियंता, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांनी उपरोक्त प्रमाणे दुरुस्तीसह करारनामा करुन घेणेस मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, यांचे दरम्यान करारनामा करणेसाठी मुद्रांक शुल्क व नोंदणी फी किती भरावी लागेल याबाबत वरील संदर्भिय क्र.१ अन्वये दुय्यम निबंधक, राहाता यांना माहिती मिळणेबाबत विनंती करणेत आली होती. त्यांनी याबाबत मा. सह जिल्हा निबंधक, अहमदनगर यांना पुढील कार्यवाही करणेविषयी कळविले. त्यानंतर संस्थाननेही वरील संदर्भिय क्र.२ व ३ चे पत्रांद्वारे मा.सह जिल्हा निबंधक, अहमदनगर यांना मुद्रांक शुल्क कळविणेविषयी विनंती केली. त्यास अनुसरुन त्यांनी त्यांचेकडील जा.क्र.कक्ष-३/अभि/प्रक्र.०२/१४ दि.२०/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये मुद्रांक शुल्क आकारणी बाबत कळविले असून, ते सोबत आपले अवलोकनार्थ सादर केले आहे.

मद्रांक जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी सदर मुद्रांक शुल्क आकारणी बाबत दिलेल्या अभिनिर्णयानुसार सदर दस्त हा विकसन करारनामा व भाडेपट्टयाचा होत असल्याचे नमूद केले आहे.

सादर केलेल्या करारनाम्याच्या प्रारुप संलेखाबाबत मिळकतीची एकूण किंमत रु.१२,३२,००,०००/- निश्चीत केली असून, मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे अनुच्छेद ५ (जी– ए) अन्वये यावर ४% मुद्रांक शुल्क रु.४९,२८,०००/- मात्र इतके भरणेबाबत कळविले आहे. तथापी सदर मिळकत ही महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे मालकीची असल्याने तसेच करारानंतरही मिळकतीची मालकी ही महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांचीच राहणार असल्याने संपूर्ण मिळकतीचे किंमतीवर मुद्रांक शुल्क भरण्याची आवश्यकता नाही, असे मत आहे.

तसेच करारनाम्यातील अट क्र.१८ नुसार एकूण बांधकामाच्या क्षेत्रफळापैकी २५५८.०७ चौ.मी. बांधिव क्षेत्र रा.प.म. हे श्री साई संस्थान शिर्डी यांना रु.१/- प्रति चौ.मी. प्रतीवर्षी या दराने ३० वर्षाच्या मुदतीकरीता भाडेकरारावर देत आहे. सदरील बांधिव क्षेत्राचे मुल्यांकन रु.७,३२,६५,०००/- इतके निश्चीत करण्यात येत असून सदरील भाडेकरार ३० वर्षाचा असल्यामुळे मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे अनुच्छेद ३६ (४) अन्वये किंमत रु.७,३२,६५,०००/- च्या ९०% दराने मुल्यांकन रु.६,५९,३८,५००/- इतके येत असल्यामुळे यावर ४% दराप्रमाणे रु.२६,३७,५४०/- इतके मुद्रांक शुल्क भरणेबाबत कळविले आहे.

याबाबत इकडील दि.१८/१२/२०१४ रोजीचे टिपणी अन्वये संस्थान पॅनेलवरील ॲडव्होकेट, श्री.एस.डी. कुलकर्णी, कोपरगांव यांना इकडील पत्र जा.नं.४७२०/२०१४ दि.२९/१२/२०१४ अन्वये सदर मुद्रांक शुल्क आकारणीबाबत सल्ला देणेकामी विनंती करण्यात आली होती. त्यानुसार ॲडव्होकेट, श्री. एस.डी. कुलकर्णी यांनी दि.०६/०१/२०१५ रोजीचे पत्रान्वये असा अभिप्राय दिला आहे की, संबंधित प्रकरणात मुद्रांक जिल्हाधिकारी यांना आदेशानुसार कोणतीही जाचक आकारणी करता येणार नाही. साई संस्थान यांनी अद्याप कोणताही दस्त नोंदणीसाठी सादर केलेला नाही. जोपर्यंत दस्त नोंदणीसाठी सादर केला जात नाही तोपर्यंत मुद्रांक शुल्काची आकारणी करण्याचा प्रश्न येत नाही. संबंधित करारनाम्यात संस्थानचे ३० वर्षाचा कालावधी निश्चीत केला आहे. तो कालावधी जर २९ वर्षाचा केला तर मुद्रांक शुल्क निम्म्याहून जास्त रकमेचे कमी होऊ शकते तसेच मुद्रांक शुल्काची रु.७५,६५,५४०/- इतकी रक्कम योग्य नाही, कायदेशीर नाही. अद्याप करार नोंदणीस गेलेला नाही, तसेच कराराचे कायद्यानुसार कोणतीही अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे आदेश व दंडाच्या रकमेचा उल्लेख योग्य नाही, असे ॲड. श्री एस. डी. कुलकर्णी यांनी नमूद केले आहे.

३० वर्ष कालावधीकरीता करावयाचे करारनाम्यानुसार भरावे लागणारे मुद्रांक शुल्काबाबत सह जिल्हा निबंधक वर्ग- १ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी मुद्रांक शुल्क भरणेकामी दिलेला तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | रक्कम रु. |
|---|---|---|
| ०१ | अ) मिळकतीचे क्षेत्र -८८०० चौ. मी.<br>बाजार मुल्य दर १४०००/- प्रती चौ.मी.प्रमाणे किंमत.<br>ब) मुद्रांक शुल्क ४% दराने - | <br>१२,३२,००,०००/-<br>४९,२८,०००/- |
| ०२ | अ) संस्थानकरिता बांधीव क्षेत्र एकूण -२५५८ चौ.मी.<br>i) तळमजला – १२२.५३ चौ.मी.<br>बाजार मुल्य दर ५३,८००/- प्रती चौ.मी.प्रमाणे किंमत.<br>ii) पहिला व दुसरा मजला (निवासी इमारत ) प्रत्येकी ११९७.५३ चौ.मी.<br>बाजार मुल्य दर २७,३००/- प्र.चौ.मी. प्रमाणे किंमत.<br>iii) तिसरा मजला (जिना व लिफ्ट )<br>बाजार मुल्य दर ३१,८००/- प्रती चौ.मी. प्रमाणे किंमत. | <br><br>६५,९३,११९/-<br><br>६,५३,८५,१३८/-<br><br>१२,८६,६२८/- |
| | एकूण बांधीव क्षेत्राची किंमत – | ७,३२,६४,९५६/- |
| | ९०% दराने मुल्यांकन | ६,५९,३८,४०७/- |
| | ब) मुद्रांक शुल्क ४% दराने | २६,३७,५३८/- |
| | **एकूण मुद्रांक शुल्क -** | **७५,६५,५३८/-** |

ॲडव्होकेट, श्री. एस.डी. कुलकर्णी यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार २९ वर्षाचा करार केला तर मुद्रांक शुल्क निम्म्याहून जास्त रकमेचे कमी होऊ शकते.

ॲडव्होकेट, श्री.एस.डी.कुलकर्णी यांनी दि.०६/०१/२०१५ रोजीचे पत्राने कळविल्याप्रमाणे २९ वर्षाचे कालावधीकरीता भाडेपट्टा करारनामा केल्यास मिळकतीचे किंमतीवरील मुद्रांक शुल्क वगळून मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे अनुच्छेद ३६(३) अन्वये अंदाजे खालील प्रमाणे मुद्रांक शुल्क येते.

| **मजला** | **तपशिल** | **प्रकार** | **बांधकाम क्षेत्र (चौ. मी.)** | **बाजार मूल्य दर** | **बाजार मूल्य रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| तळमजला | दुकान गाळा | दुकाने | ४१ | रु.५९,१८०/- | रु.२,४२६,३८०/- |
| | माहीती केंद्र | ऑफीस | ३६ | रु.३४,९८०/- | रु.१,२५९,२८०/- |
| | जिना, लिफ्ट | निवासी | ४५ | रु.३०,०३०/- | रु.१,३५१,३५०/- |
| महिला मजला | निवासी हॉल्स, खोल्या, स्वच्छतागृहे, जिना, लिफ्ट | निवासी | ११९६ | रु.३०,०३०/- | रु.३५,९१५,८८०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दुसरा मजला | निवासी हॉल्स, खोल्या, स्वच्छतागृहे, जिना,लिफ्ट | निवासी | ११९६ | रु.३०,०३०/- | रु.३५,९१५,८८०/- |
| तिसरा मजला | जिना, लिफ्ट | निवासी | ४० | रु.३०,०३०/- | रु.१,२०१,२००/- |
| | | एकूणः- | २५५४ | | रु.७८,०६९,९७०/- |
| | | **मुद्रांक शुल्कासाठी ५०% रक्कम** | | | **रु.३९,०३४,९८५/-** |
| | | **मुद्रांक शुल्क ४% प्रमाणे.** | | | **रु.१,५६१,३९९/-** |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/११/२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६४ अन्वये सदर बांधकाम ३० वर्षे कराराने घेण्यात यावे असे यापुर्वी ठरले आहे. मुंबई मुद्रांक अधिनियम अनुच्छेद ३६(४) अन्वये २९ वर्षापेक्षा जास्त कालावधीचे भाडेपट्टा करारासाठी बाजार मुल्याचे ९०% रकमेवर मुद्रांक शुल्क आकारणेत येते. त्यानुसार अंदाजे रु.२८,१०,५१९/- मात्र इतके मुद्रांक शुल्क देय होईल. तथापी या अधिनियमाचे अनुच्छेद ३६(३) अन्वये १० वर्षांपेक्षा जास्त परंतू २९ वर्षापर्यंतचे कालावधीसाठी बाजार मुल्याचे ५०% रकमेवर मुद्रांक शुल्क आकारणेची तरतूद आहे. त्यामुळे २९ वर्षे कालावधीचा करार केल्यास संस्थानला मुद्रांक शुल्कापोटी येणारा खर्च अंदाजे रु.१२,४९,१२०/- मात्र इतका कमी होईल. याप्रमाणे रा.प.महामंडळ यांचेशी ३० वर्षा ऐवजी २९ वर्षे कालावधीचा भाडेपट्टा करार करणेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८०** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकामापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने करणेकामी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेबरोबर २९ वर्षे कालावधीचा भाडेपट्टा करार करणेस तसेच त्याकामी मुद्रांक शुल्कापोटी येणा-या अंदाजे रु.१५,६१,३९९/- मात्रचे व नियमाप्रमाणे होणारी नोंदणी फी तसेच इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०९** **शिर्डी- राहाता या शहरांचे बाहेरुन जाणारा बाहयवळण रस्ता (२३ कि.मी.) विकसित करणेकामी सार्वजनिक बांधकाम विभागास निधी उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री साईंचे दर्शनासाठी दररोज हजारो भक्त देश-विदेशातून श्री क्षेत्र शिर्डी येथे येत असतात. उत्सवकाळात तसेच उन्हाळी सुट्टया, दीपावली व नाताळच्या सुट्टया, गुरुवार व रविवार तसेच या दिवसांना जोडून येणाऱ्या सरकारी सुट्टया इत्यादी काळात श्री क्षेत्र शिर्डीस भेट देणाऱ्या साईभक्तांची संख्या सुमारे ३ ते ४ लाखांपर्यन्त जाते. श्री क्षेत्र शिर्डी हे अहमदनगर - मालेगांव या राज्यमार्ग क्रमांक १० वर वसलेले असून, या राज्यमार्गाने दक्षिण व उत्तर बाजूकडून हजारो साईभक्त पालखी पदयात्रेबरोबरच, खाजगी व सरकारी प्रवासी बसेस, खाजगी वाहनांव्दारे, रेल्वे प्रवासाव्दारे येत असतात. या राज्यमार्गावरच नेवासा तालुक्यातील शनि शिंगणापूर देवस्थान, राहाता तालुक्यातील उपासनी महाराज संस्थान, कोपरगांव तालुक्यातील मौनगिरी जनार्दन स्वामी समाधीस्थान, जंगली महाराज संस्थान आदि धार्मिक तीर्थस्थळे वसलेली आहेत. त्यामुळे सदर अहमदनगर- मालेगांव राज्यमार्गावर नेहमीच भक्तांच्या खाजगी व प्रवासी वाहनांची मोठया प्रमाणावर वर्दळ व वाहतुक सुरु असते.

तसेच सदर राज्यमार्ग हा महाराष्ट्रातील एक प्रमुख राज्यमार्ग असून, या राज्यमार्गाने देशातील दक्षिण बाजूकडील आंध्रप्रदेश, कर्नाटक, तामीळनाडू, केरळ आदि तर उत्तर बाजूकडील गुजराथ, मध्यप्रदेश, राजस्थान हरियाणा आदि राज्ये जोडली गेलेली आहेत. त्यामुळे सदर राज्यमार्गावर विविध औदयोगिक व व्यापारी कारणांने होणारी जड वाहतुक मोठया प्रमाणावर सुरु असते. त्यामुळे सदर राज्यमार्गावरील शिर्डी, राहाता, सावळीविहीर या गांवामध्ये व लगतच्या परिसरात नेहमीच वाहतुकीची मोठया प्रमाणावर कोंडी होऊन, साईभक्तांबरोबरच स्थानिक सामान्य नागरीकांना दैनंदिन अडचणींना तोंड द्यावे लागते. सदर वाहतुकीची कोंडी सलग सुट्टयांच्या कालावधीमध्ये मोठया प्रमाणावर होऊन, प्रसंगी मोठया अपघाताचे प्रसंग उद्भवतात.

या सर्व बाबींचा विचार करुन, कोपरगांव - अहमदनगर या राज्यमार्गाचे अंतर्गत, कोपरगांव – कोल्हार या टप्प्यातील रस्त्याचे चौपदरीकरणाचे कामांतर्गत, शिर्डी-राहाता या शहराचे बाहेरुन जाणा-या पिंप्री निर्मळ ते निमगांव या अंदाजे २३ किलोमीटर लांबीचे बाहयवळण रस्त्याचे कामाचा समावेश करणेत आलेला आहे. महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर विभागामार्फत या कोपरगांव – कोल्हार या राज्यमार्गासह उपरोक्त बाहयवळण रस्त्याचे काम "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर ठेकेदार सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर, अहमदनगर यांचेमार्फत करणेत येत आहे.

वर नमूद केलेप्रमाणे बाहयवळण रस्त्याचे महत्व लक्षात घेता, सदरहू काम प्राधान्याने व तातडीने सुरु होणे आवश्यक असल्याने विविध स्तरावरुन पाठपुरावा करणेत येत आहे. मात्र सदरहु रस्त्याचे काम अत्यंत धीम्या गतीने सुरु आहे.

**(ब)** माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०१५ मध्ये नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा संपन्न होत आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये श्री साईबाबांचा शताब्दी महोत्सव साजरा होणार आहे. याकालावधीत शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी मोठया प्रमाणावर भक्तांचीगर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहतुकीच्या नियोजनाच्या दृष्टीने व सर्वसामान्य जनतेचा प्रवास सुसाह्य व्हावा म्हणून सदर बाह्यवळण रस्ता तातडीने विकसीत होणे अत्यंत आवश्यक आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी संबंधित विभागांचे अधिकारी व इतर यांची नागपूर येथे दि. १५ डिसेंबर, २०१४ रोजी बैठक घेतली. या बैठकीत शिर्डी बाह्यवळण रस्त्याचे काम श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचे अर्थसहाय्याने करुन घेणेबाबत निर्देशित केले. त्या अनुषंगाने, अधिक्षक अभियंता,

सा.बां.मंडळ, अहमदनगर यांनी दि.०३/०१/२०१५ रोजीचे पत्र मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, नाशिक यांना अग्रेषित करुन, सदर पत्राची प्रत संस्थानला सादर केली.

मा. व्यवस्थापन समितीने दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ०६ अन्वये उपरोक्त बाह्यवळण रस्ता विकसित करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागास निधी उपलब्ध करुन द्यावयाचे प्रस्तावावर खालीलप्रमाणे निर्णय घेतला–

*"..शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेबाबत समिती प्रत्यक्ष आढावा घेऊन निर्णय देईल, असे ठरले."*

तसेच, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांनी मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, नाशिक यांना त्यांचेकडील पत्र जा. क्र. खाक्षेस-२००५/प्र.क्र.१९३/रस्ते-९, दि.०५/०२/२०१५ अन्वये खालीलप्रमाणे कळविले -

*".. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी शिर्डी राहाता बाह्यवळणाच्या कामाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्तावास खालील अटीवर मान्यता देणेत येत आहे.*

*१) शिर्डी-राहाता बाह्यवळण रस्त्यांच्या चौपदरीकरणासाठी लागणारा सुमारे रु. १४० ते १५० कोटी इतका निधी साईबाबा संस्थानाने सा.बां. विभागास ठेव अंशदान स्वरुपात द्यावा.*

*२) सा. बां. विभागाने शिर्डी राहाता बाह्यवळण रस्त्याचे काम विहीत विनिर्देश व गुणवत्ता राखून लवकरात लवकर पुर्ण करावे.*

*३) सा. बां. नियमावली व लेखासंहितेचे तंतोतत पालन करावे.*

*४) खाजगीकरणांतर्गत सुरु असलेल्या विषयांकित प्रकल्पामध्ये कोणतीही गुंतागुंत होऊ नये याची दक्षता घेणेत यावी.*

*५) ऑगस्ट २०१५ मध्ये नाशिक येथे नियोजित कुंभमेळा आणि सन २०१७ मध्ये साई समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त भाविकांच्या होणा-या संभाव्य गर्दीच्या नियोजनाच्या दृष्टीने शिर्डी बाह्यवळण रस्त्याचे काम तात्काळ हाती घेऊन पुर्ण करणेत यावे.*

*६) विषयांकित खाजगीकरणांतर्गत सुरु असलेल्या प्रकलपाच्या वावातुन दुपदरी शिर्डी राहाता बाह्यवळण रस्त्यांची किंमत कमी करुन सुधारीत सवलत कालावधीचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर करावा."*

दरम्यानचे कालावधीत, मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस संस्थानमार्फत जा. क्र. एसएसएसटी/ बांधकाम/५५७६/२०१५, दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ रोजीचे पत्राव्दारे, नगर-मनमाड रस्त्यावरील शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन पिंप्रीनिर्मळ ते निमगांव अशा अंदाजे २३ किलोमीटर लांबीच्या बाह्यवळण रस्त्यासाठी १४० ते १५० कोटी रुपयांचा निधी संस्थानमार्फत उपलब्ध करुन देणेस तसेच हा सर्व निधी एकाच वेळेस अथवा कामाचे प्रगतीनुसार टप्प्या-टप्प्याने उपलब्ध करुन देणेत यावा किंवा कसे याबाबत मान्यता मिळणेस विनंती प्रस्ताव सादर करणेत आला.

**(क) तथापी आता,** मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, श्री. खैरे, अधिक्ष्ाक अभियंता, सा. बां. विभाग, अहमदनगर यांचेशी सदरहू प्रस्तावाबाबत चर्चा केली असता, त्यांनी खालीलप्रमाणे सुचित केले आहे -

*०१. शिर्डी- राहाता या शहराच्या बाहेरुन जाणारे अंदाजे २३ किलोमीटर लांबीच्या दुपदरी बाहयवळण रस्त्याचे कामाचा समावेश "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर कोपरगांव-कोल्हार हा राज्यमार्ग विकसित करणा-या बांधकाम ठेकेदाराच्या कार्यादेशात करणेत आलेला आहे.*

*०२. सदरचे काम संस्थानच्या निधीतून स्वतंत्रपणे करावयाचे असल्यास, याकामी संस्थानची लेखी सहमती आवश्यक राहिल.*

*०३. संस्थान व्यवस्थापनाकडून अशा प्रकारे लेखी सहमती मिळालेनंतर, संबंधित ठेकेदाराच्या कामाच्या कार्यादेशातून उपरोक्त बाह्यवळण रस्त्याचे काम वगळणेबाबत उचित कार्यवाही सुरु करणेत येईल.*

*०४. संबंधित ठेकेदाराच्या कार्यदेशातून उपरोक्त बाह्यवळण रस्त्याचे काम वगळल्यास, संबंधीत ठेकेदार न्यायालयीन वाद अथवा दाद मागण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरचे बाह्यवळणाचे काम सर्व स्तरावरील कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच सुरु करणे शक्य होईल.*

**(ड)** उपरोक्त सर्व बाबींचा विचार करतां इकडील विभागाचे खालीलप्रमाणे मत आहे -

०१. शिर्डी – राहाता या शहराच्या बाहेरुन जाणा-या अंदाजे २३ किलोमीटर लांबीच्या दुपदरी बाह्यवळण रस्ता संस्थान निधीतून विकसित करावयाचा ठरल्यास, सर्वप्रथम मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने सार्वजनिक बांधकाम विभागास लेखी सहमती कळविणे आवश्यक राहिल.

०२. अशा प्रकारे निधी उपलब्ध करुन द्यावयाचा झाल्यास सर्वप्रथम मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद व अधिनियमातील तरतुदीनुसार मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणे आवश्यक राहील.

०३. तसेच परिच्छेद क मध्ये नमुद केलेप्रमाणे, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत संबंधित ठेकेदाराच्या कार्यादेशातून विषयांकित काम वगळणे, त्याबाबत ठेकेदाराशी यथायोग्य तडजोड करणे, विषयांकित कामाचे पुर्नःनियोजन करणे तसेच संस्थानमार्फत मा. न्यायालयाची व शासनाची मान्यता घेणे आदिबाबत काहीसा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१५ रोजीचे पत्रात नमुद केलेनुसार, उपरोक्त बाह्यवळण रस्त्याचे विकासासाठी लागणारा संपूर्ण निधी अंशदान ठेव स्वरुपात

त्यांचेकडे एकरकमी जमा न करतां, त्याऐवजी कामाचे प्रगतीनुसार टप्प्या-टप्प्याने वर्ग करता येईल, त्यामुळे संस्थानचे या रक्कमेवर मिळणा-या व्याजाचे/ अथवा इतर आर्थिक नुकसानही होणार नाही.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी- राहाता या शहरांचे बाहेरुन जाणारा बाहयवळण रस्ता (२३ कि.मी.) विकसित करणेकामी सार्वजनिक बांधकाम विभागास रु.१४० ते १५० कोटी मात्र निधी उपलब्ध करुन देणेस परवानगी घेणेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील अ‍ॅप्लीकेशन दाखल करण्यात यावे तसेच अधिनियमातील तरतुदीनुसार विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचीही मान्यता घेण्यात यावी. उपरोक्त मान्यता मिळाल्यानंतर प्रस्तावित केलेप्रमाणे निधी उपलब्ध करुन देणेस तत्वतः मान्यता देण्यात आली.**

**परंतु यासंबंधी मा.उच्च न्यायालयाचा पूर्वी काय निकाल झालेला आहे, याची पडताळणी करुन पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१०** **सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ मध्ये ऑनलाईन व जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणारे पासेस बंद ठेवणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शनासाठी देशाच्या व जगाच्या कानाकोप-यातून साईभक्त येत असतात. यामध्ये महत्वाच्या/ अतिमहत्वाच्या, मान्यवर व्यक्तीची संख्या मोठया प्रमाणावर असते. श्री साईबाबांच्या समाधीच्या दर्शन/ आरतीसाठी येणा-या महत्वाच्या/अतिमहत्वाच्या, मान्यवर व्यक्तींची दर्शन/आरतीची व्यवस्था जनसंपर्क विभागाकडून करण्यात येते.

सन २०१५ मध्ये होणा-या कुंभमेळयाचे वेळी श्रीसाईबाबांच्या समाधीच्या दर्शनासाठी येणा-या भाविकांची संख्या निश्चितच वाढणार आहे. या होणा-या गर्दीचे नियोजन करणे त्यांना श्रीसाईबाबांचे दर्शन सुलभतेने करता यावे याकरीता कुंभमेळा समितीच्या दिनांक ०६ फेब्रुवारी २०१५ रोजीच्या सभेत यावर्षी कुंभमेळयातील महत्वाच्या (१) मुख्य ध्वजारोहन समारंभ दिनांक १४.०७.२०१५, (२) आखाडयाचे ध्वजारोहन दिनांक १४.०८.२०१५, (३) पहिले शाही स्नान दिनांक २९.०८.२०१५, (४) दुसरे शाही स्नान दिनांक १३.०९.२०१५, (५) तिसरे शाही स्नान दिनांक १८.०९.२०१५, (६) त्र्यंबकेश्वर शाही स्नान दिनांक २५.०९.२०१५ आदि महत्वाच्या दिवसांपैकी प्रत्येक शाही स्नानच्या आदल्या व नंतरच्या दिवशी ऑनलाईन व जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणारे पासेस बंद ठेवण्याबाबत चर्चा झालेली आहे. त्यानुसार खालील दिवशी उपरोक्त व्ही.आय.पी. पासेस बंद ठेवता येईल.

| अ.नं. | माहिती | दिनांक | वार | एकूण दिवस |
|---|---|---|---|---|
| ०१ | पहिले शाही स्नान | २८.०८.२०१५ | शुक्रवार | ०३ |
| | | २९.०८.२०१५ | शनिवार | |
| | | ३०.०८.२०१५ | रविवार | |
| ०२ | दुसरे शाही स्नान | १२.०९.२०१५ | शनिवार | ०३ |
| | | १३.०९.२०१५ | रविवार | |
| | | १४.०९.२०१५ | सोमवार | |
| ०३ | तिसरे शाही स्नान | १७.०९.२०१५ | गुरुवार | ०३ |
| | | १८.०९.२०१५ | शुक्रवार | |
| | | १९.०९.२०१५ | शनिवार | |
| ०४ | त्र्यंबकेश्वर शाही स्नान | २४.०९.२०१५ | गुरुवार | ०३ |
| | | २५.०९.२०१५ | शुक्रवार | |
| | | २६.०९.२०१५ | शनिवार | |
| **एकूण** | | | | **१२** |

मात्र उपरोक्त दिवशी गर्दीचे प्रमाण कमी असल्यास मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे मार्गदर्शनानुसार आयत्यावेळी जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणारे पासेस सुरु ठेवता येईल.

तथापि सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ मध्ये प्रत्येक शाही स्नानच्या अगोदरच्या व नंतरच्या दिवशी ऑनलाईन व जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणारे पासेस बंद करणेस तत्वतः मान्यता देण्यात आली.**

**तसेच त्या वेळेस गर्दीचे प्रमाण कमी असल्यास जनसंपर्क विभागामार्फत वितरीत करण्यात येणारे पासेस सुरु करणेबाबत तत्कालीन स्थानिक परिस्थितीनुसार कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा, असे ठरले.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.११** **आठवडयातील सातही दिवस सशुल्क दर्शन सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींच्या दर्शनासाठी येणा-या महत्वाच्या/अतिमहत्वाच्या व्यक्ती तसेच मान्यवरांच्या शिफारशीनुसार येणा-या व्यक्तींना जनसंपर्क विभागामार्फत देण्यात येणा-या व्ही.आय.पी. पासेससाठी शुल्क आकारणेबाबत संदर्भ क्रमांक १ अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७.०१.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक २७२ अन्वये गुरुवार, शनिवार व रविवार या दिवशी दर्शन आरती पासेसवर जनसंपर्क कार्यालयामार्फत शुल्क आकारणेबाबत निर्णय झालेला आहे. संदर्भ क्रमांक २ नुसार मा.व्यवसथापन समितीचे दिनांक ०६.०३.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक ३०९ अन्वये सशुल्क दर्शन/आरती

पासेसची अंमलबजावणी प्रत्यक्षात दिनांक १३.०३.२०१० पासून सुरु करण्यात आलेली आहे. संदर्भ क्रमांक ३ नुसार मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०४.२०१० चे सभेतील निर्णय क्रमांक ३५८ (२५) अन्वये सशुल्क दर्शन/आरती पासेस सुविधेतुन गुरुवारचा दिवस वगळण्यात आलेला आहे. तसेच साईटेक प्रकल्पांतर्गत दिनांक १४ जुलै २०११ पासून ऑनलाईन दर्शन/आरती सुविधा सुरु करण्यात आलेली आहे. आणि संदर्भ क्रमांक ४ अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ९०७ अन्वये सर्व आरत्या करिता शुल्क आकारणेबाबत निर्णय झालेला आहे. शनिवार, रविवार सशुल्क दर्शन/आरती व आठवडयातील सर्व दिवस सशुल्क आरती तसेच ऑनलाईन दर्शन/आरती पासेसव्दारे दिनांक १३.०३.२०१० पासून दिनांक २८.०२.२०१५ पर्यंत एकूण सुमारे रक्कम रुपये ५४,५१,२२,४००/- मात्र इतके उत्पन्न संस्थानला मिळाले आहे.

**शनिवार/रविवार सशुल्क दर्शनपासेस व आठवडयातील सर्व दिवस सशुल्क आरत्या बाबत-**

| अ.नं. | शनिवार रविवार सशुल्क दर्शन पासेस व आठवडयातील सर्व दिवस सशुल्क आरती पासेस कालावधी | भक्तांची संख्या | रक्कम | एकुण दिवस | प्रतिदिनी भक्तांची सरासरी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | दि.१८.११.२०१३ ते २८.०२.२०१५ (दर्शन) | ३३२३२२ | ३,३२,३२,२००/- | १३२ | २५१७ |
| ०२ | दि.१८.११.२०१३ ते २८.०२.२०१५ (आरती) | १६९७७४ | ६,१५,९५,४००/- | ४६५ | ३६५ |

**ऑनलाईन दर्शन/आरती पासेस-**

| अ.नं. | ऑनलाईन दर्शन/आरती पासेस कालावधी | भक्तांची संख्या | रक्कम | एकुण दिवस | प्रतिदिनी भक्तांची सरासरी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०३ | दि.११.०७.२०११ ते २८.०२.२०१५ (दर्शन) | ८२७२५५ | ८,२७,४०,१००/- | १३२५ | ६२५ |
| ०४ | दि.११.०७.२०११ ते २८.०२.२०१५ (आरती) | ६०८३२० | २१,६८,८९,२००/- | १३२५ | ४५९ |

ऑनलाईन सुविधा सुरु झाल्यापासून विशेषतः दक्षिणेकडील राज्यातील तसेच इतरही राज्यातील मान्यवरांचे शिफारस पत्र फॅक्स/मेल संदेश तसेच दुरध्वनी संदेशांचे प्रमाण कमी झालेले आहे. जर आठवडयातील सर्व दिवस सशुल्क आरती व शनिवार रविवार सशुल्क दर्शनाप्रमाणे सर्व दिवस सध्याच्या प्रचलित पध्दतीनुसार सशुल्क दर्शन सुरु केल्यास पासेस मागणारांची संख्या कमी होईल व दर्शन रांगेतुन दर्शनासाठी येणा-या सर्वसामान्य साईभक्तांना दर्शनाचा लाभ मिळेल. सशुल्क आरती पासेस सुरु केल्याने आरती पासेसची मागणी करणा-या साईभक्तांची संख्या कमी झालेली आहे. परिणामी दर्शनरांगेतील साईभक्तांना आरतीचा लाभ मोठयाप्रमाणात मिळत आहे.

**तथापि सर्व दिवस सशुल्क दर्शन पास सुरु करावयाचे झाल्यास खालील मुद्यांवरही निर्णय व्हावा असे वाटते.**

१) पंचक्रोशीतून दर गुरुवारी श्रींच्या दर्शनास येणा-या भक्तांची संख्या जास्त असते यापैकी काही भक्त सकाळी तर काही भक्त सायंकाळी श्रींचे दर्शनास येतात. या भक्तांना सध्या विनाशुल्क शनिगेटने अथवा नंदिगेटने दर्शनासाठी सोडण्यात येते त्यामुळे दर गुरुवारी शनिगेटवर पंचक्रोशीतून येणा-या भक्तांची व पासधारक साईभक्तांची जास्त प्रमाणात गर्दी होते. तेव्हा फक्त दर गुरुवारी पंचक्रोशीतून येणा-या साईभक्तांची सकाळी २ तास व सायंकाळी २ तास पालखीगेटने मोफत दर्शनाची व्यवस्था करावी असे मत आहे. त्यामुळे शनिगेटचा वापर फक्त पासधारकांसाठी करता येईल.

२) गुरुवारी रात्रौ ०९.१५ वाजता होणा-या श्रींच्या पालखीसाठी नियमित येणारे भक्त, भजनी मंडळे, झांजपथके व बॅंड पथके यांची दर्शन व्यवस्था मोफत करण्यात यावी.

३) श्रीच्या दर्शन/आरतीसाठी येणारे महाराष्ट्र राज्यातील लोकसभा, राज्यसभा, विधानसभा व विधानपरिषद सदस्य सशुल्क पासेस घेतांना नेहमीच वाद घालतात. जर त्यांची व त्यांचेसह येणा-या तीन (१+३=४) व्यक्तींचा दर्शन/आरती व्यवस्था मोफत केल्यास वाद होणार नाहीत.

४) श्री साईबाबा संस्थानच्या आस्थापनेवरील व सेवानिवृत्त झालेल्या तसेच कंत्राटदारामार्फत सेवेत असणा-या कर्मचा-यांच्या कुटुंबियांची दर्शन/आरती व्यवस्था मोफत करण्यात यावी असे वाटते.

तरी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८३** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक ०१.०४.२०१५ पासून जनसंपर्क विभागामार्फत व्ही.आय.पी. व्यक्तिंकरीता देण्यात येणारे दर्शनपास प्रायोगिक तत्वावर आठवडयातील सातही दिवस शनिवार, रविवारच्या धर्तीवर सध्याच्या प्रचलित पध्दतीने देणगी शुल्क आकारणेत येऊन वितरीत करणेस तत्वतः मान्यता देण्यात आली.**

**मोफत दर्शन व्यवस्थेसाठी प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या मुद्दा क्र०१ व ०२ प्रमाणे कार्यवाही चालू ठेवणेत यावी व मुद्दा ०३, ०४ तूर्त स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी/ संरक्षण विभागप्रमुख/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२** **वनवासी कल्याण आश्रमातील विद्यार्थ्यांना साई भक्तांनी वापरलेले ब्लॅंकेट, चादर, बेडशीट व टॉवेल वापरणेस देणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ.प्रबोध जोशी, जिल्हाध्यक्ष वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र जिल्हा– उत्तर नगर यांचे दि. २१/०१/२०१५ रोजीचे पत्रान्वये वनवासी कल्याण आश्रमातील विदयार्थांना साईभक्तांनी वापरलेले ब्लॅंकेट, चादरी, बेडशीट, टॉवेल मिळणेबाबत विनंती केली आहे. वनवासी भागातील विदयार्थांची शिक्षणाची गरज ओळखून संस्थेने संपुर्ण महाराष्ट्रात विशेष करुन अदिवासी भागात वस्तीगृहाची सोय उपलब्ध करुन दिलेली आहे. अशा वस्तीगृहासाठी कोणत्याही

प्रकारचे शासकीय अनुदान मिळत नाही. लोकसहभागातून निवासाचा व भोजनाचा सर्व खर्च भागविला जातो. चालू वर्षाचा हिवाळा अत्यंत तीव्र् असल्याने अशा वनवासी विदयार्थांना अंगावर पांघरण्यासाठी भक्तांनी वापरलेले ब्लँकेट, चादर, बेडशीट, टॉवेल इ. गरजेच्या वस्तु वनवासी विदयार्थांची गरज लक्षात घेऊन एकुण १५ गावांचे १२८५ विदयार्थांसाठी संस्थानतर्फे मोफत उपलब्ध करुन दयावे अशी विनंती केली आहे.

संस्थानने खरेदी केलेल्या वस्तुंचा तपशिल खालील प्रमाणे आहेत:-

| **अ. नं.** | **संगणक कोड नंबर डेडस्टॉक रजि. पा.नं./अ.नं.** | **मालाचे वर्णन/ तपशिल/ खरेदी तारीख** | **एकुण नग** | **प्रति नग किंमत रुपये - पैसे** | | **एकुण किंमत रुपये – पैसे** | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **०१** | MIS/D030 ४८/०२ | सफेद टॉवेल (प्लेन व्हाईट) दिनांक ०८/०६/२०१. | १७४ | ६४ | ७५ | ११,२६६ | ५० |
| **०२** | CDR/D001 ११/०१ | मयुरपंखी सोलापुर चादर (जाक्वार) दिनांक १८/०२/२००९. | ३१० | २९० | ०० | ८९,९०० | ०० |
| **०३** | MIS/D020 ३४/०१ | वूलन ब्लँकेट एम्ब्रोईड कंपनीचे साईज ६०”×९०” दिनांक ०७/०५/२००९ | १०० | ४०० | ०० | ४०,००० | ०० |
| **०४** | MIS/D024 ५२/०१ | हिरवे प्रिंटेड सिंगल बेडशीट साईज ६०”×९०” (१००% कॉटन) दि.२०/०२/२००७ | १०४ | १५२ | ५९ | १५,८६९ | ३६ |
| | | **एकुण** | ६८८ | | | १,५७,०३५ | ८६ |

जा.न. एसएसएस/वशी- अ.क/९४३-२०१३ दि.२७/५/२०१३ अन्वये निरुपयोगी भंगार/सादिल स्वरुपाचे साहित्य् मागिल वर्षाचे नमुद उच्च्म दराने विक्री करणे बाबत अ.न.२३ नुसार विटलेल्या – फाटलेल्या जीर्ण झालेल्या कापडी वस्तु उदा. चादर,बेडशिट,ब्लॅकेट खराब झालेल्या गादी/ उशीच्या खोळी,टॉवेल, रुग्णालयाकडील लिनन इ. प्र.किलो रु 10/- अक्षरी रुपये दहा रुपये मात्र/- या प्रमाणे मंजुर झालेले आहे.

तरी उपरोक्त् कपडे भक्तांनी दैनंदिन वापरुन, धुऊन त्याचा कलर गेलेला आहे. ते भक्तांना वापरावयास देण्यासाठी योग्य् राहिलेले नाही. ते कपडे जा.नं.-५ दि.-०९/१२/२०१४ च्या मंजूर टिपणी अन्वये डेडस्टॉक मधून कमी करण्यास व वार्षिक मंजूरी दराप्रमाणे अभिलेख कक्षामार्फत प्रति किलोस १०/- रुपये याप्रमाणे विक्री करण्यास मंजूरी मिळाली आहे.

व्दारावती भक्तनिवास इमारतीच्या रुम मध्ये मयुरपंखी सोलापुर चादर,वूलन ब्लॅकेट, हिरवे प्रिंटेड सिंगल बेडशिट, टॉवेल हे भक्तांनी दैनंदिन वापरुन त्यांचा धुवुन कलर गेलेला आहे. त्या वस्तुचा घसारा किंमत खालील प्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **नाव** | **नग** | **एकत्रित वजन** | **निरुपयोगी भंगार/ सादील स्वरुपाचे उच्चतम मंजुर प्रति किलो दर** | **होणारी किमंत** |
|---|---|---|---|---|---|
| १ | मयुरपंखी (सोलापुरी) चादर | ३१० **नग** | ४४१ कि.ग्रॅम | १० | ४४१०/- |
| २ | वूलन ब्लॅकेट एम्ब्रॉईड कंपनी | १०० **नग** | १५५ कि.ग्रॅम | १० | १५५०/- |
| ३ | हिरवे प्रिंटेड सिंगल बेडशिट | १०४ **नग** | ४१ कि.ग्रॅम | १० | ४१०/- |
| ४ | सफेद टॉवेल | १७४ **नग** | ६९ कि.ग्रॅम | १० | ६९०/- |
| | **एकुण** | **६८८ नग** | **७०६ कि.ग्रॅम** | | **७०६०/-** |
| | | | | | **अक्षरी रुपये :- सात हजार, साठ मात्र** |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ ( As modified up to $4_{th}$ june 2011 ) कलम नं.१७ समितीचे कर्तव्ये व अधिकार मधील अ.नं. १७

(१)– राज्यशासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किवां विशेष् आदेशास आधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे. मंदीरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा –अर्चा समारंभ व उत्स्व आयोजित करण्यासाठी आणि पार पाडणासाठी योग्य् ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्थव्यवस्थेचा करभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य्करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न् कामी लावणे ही समितीची कर्तव्य् असतील.

(२)-विषेश करुन आणि पोट-कलम (१) मधील तरतुदी सर्व साधारणतेला बाध न आणता समिती...मध्ये (ण) मानव जातीचे कल्याण करण्या-या किवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य् करणा-या अन्य कोणत्याही उदात्त् कार्यास चालना देईल

मा. त्रिसदस्य समितीचे दि.१४/११/२०१३ रोजीचे सभेतील विषय नं.८ निर्णय क्रं. ९२७ अन्वये सन २००७ यांचे पुरग्रस्तासाठी खरेदी केलेल्या चादरी वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र याना वाटप करण्यास मान्यता मिळाली आहे. त्यानुसार त्या चादरीचे वाटप करण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त कपडे भक्तांनी दैनदिन वापरुन, धुवून त्याचा कलर गेलेला आहे ते भक्ताना वापरण्यासाठी देण्यास योग्य् राहिलेले नाही. तरी अध्यक्ष वनवासी कल्याण आश्रम यांच्या दि.२१/०१/२०१५ रोजी चे विनंती पत्रानुसार व अधिनियमाच्या तरतुदी अंर्तगत तसेच त्यांचे मागणीप्रमाणे त्यांना प्रत्यक्ष उपरोक्त् कपडे दाखविण्यात आले असुन ते त्यांनी स्विकारण्यास समंती दर्शवलेली आहे.

तरी वनवासी कल्याण आश्रमातील विदयार्थांना साई भक्तानी वापरलेले ब्लँकेट, चादर, बेडशिट व टॉवेल मोफत वापरणेस देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र८४** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांनी वापरलेले ब्लँकेट, चादर, बेडशीट व टॉवेल वनवासी कल्याण आश्रमातील विद्यार्थ्यांना वापरणेसाठी मोफत देणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, व्दारावती भक्तनिवास)

---

**विषय नं.१३** **गाद्या खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रिया सुरु करणे व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** साई धर्मशाळा हा विभाग दिनांक १३/०७/२०१३ पासुन नविन सुरु करण्यात आलेला आहे. या ठिकाणी एकुण ६ इमारती असून त्यापैकी एक इमारत श्री साईबाबा संस्थान संचलीत कनिष्ठ महाविद्यालयास वापरण्यास दिलेली आहे. उर्वरीत प्रत्येक इमारतीमध्ये ३२ हॉल असे एकुण ५ इमारतीमध्ये १६० हॉल असुन त्यामध्ये साईभक्तांची तसेच पालखीधारक व पदयात्रीचीं निवास व्यवस्था करण्यात येत आहे.

प्रत्येक हॉलमध्ये १८ कॉट व गाद्या टाकण्याचे नियोजन असुन ५ इमारतीमधील १६० हॉलमध्ये (१६० x १८) २८८० कॉट व २८८० गाद्याची साई धर्मशाळेमध्ये आवश्यकता आहे. सध्या १२०० कॉटस् व १२०० गाद्या साई धर्मशाळेमध्ये उपलब्ध आहेत. उर्वरीत १६८० कॉट खरेदी करणे कामीची कार्यवाही ही बांधकाम विभागा मार्फत चालु आहे.

आता १६८० गाद्यासाठी खरेदी कामी दि.०३/०३/२०१४ रोजी गादी खरेदी करणेबाबत टिपणी सादर केली होती. त्यात श्री व्यंकटेश्वरा क्वॉयर प्रा. ली. सिंकदराबाद यांचे कडुन मागील मान्य दराने म्हणजे रु. २,४८७/- मात्रने १६८० नग गाद्या खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रु. ४१,७८,१६०/- मात्रचे खर्चाचे मान्यतेसाठी तसेच खरेदी रु. १० लाखाचे वरील असल्याने मा. उच्चन्यायालयाची मान्यता घेणे कामी विधी विभागामार्फत कार्यवाही करणे बाबत किंवा १६८० गाद्या खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु. ४६ लाख मात्रचे खर्चास मान्यता घेणेसाठी विषय दि.०५/०६/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे समोर सादर केला होता. त्यावर विषय नं.१३६ व निर्णय क्र.४२४ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार विधी विभागामार्फत मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे गाद्या खरेदी करणे बाबत सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात आले होते. त्यावर दिनांक २२/१२/२०१४ रोजी मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी खालीलप्रमाणे निकाल दिलेला आहे.

1] As the tenderer has offered to supply mattresses at the 2011 rates, the original petitioners have no objection. Sansthan has recommended the acceptance. Accordingly, we permit Sansthan to proceed further.

2] Civil application is allowed and disposed of.

उपरोक्त मा.कोर्टाच्या निर्णयानुसार दिनांक ३१/१२/२०१४ रोजी श्री व्यंकटेश्वरा क्वॉयर प्रॉ.प्रा.लि. सिकंदराबाद यांचेकडुन खरेदी करण्यात आलेल्या मेट्रेसप्रमाणे मागील मान्य दराने म्हणजे रु. २,४८७/- मात्रने १६८० नग क्वॉयर मेट्रेस खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रु. ४१,७८,१६०/- मात्रचे खर्चाचे मान्यता देण्यात आलेली असुन त्यानुसार खरेदी विभागामार्फत श्री व्यंकटेश्वरा क्वॉयर प्रॉ.प्रा.लि.प्लॉट नं.२०४, दुसरा मजला, अमरचंद शर्मा कॉप्लेक्स, संगीत थेटरच्या जवळ, एस.डी.रोड, सिकंदराबाद यांचेकडुन खरेदी करणेस आदेश होण्याचे मान्यतेसाठी टिपणी सादर केली होती. त्यावर मा. कार्यकारी अधिकारी यांनी करारनाम्याच्या मसुद्यासह सादर करावे, असे निर्देश दिले होते.

त्यानुसार दिनांक ०८/०१/२०१५ व दिनांक २०/०१/२०१५ रोजी गाद्या खरेदी करणे बाबतचा करारनाम्याचा मसुदा मान्यतेसाठी सादर केला होता. त्यावर दिनांक २०/०१/२०१५ चे टिपणी वर मा. कार्यकारी अधिकारी यांनी लेखाधिकारी कृपया तपासावे, असे निर्देश दिले होते. त्यानुसार मा मुख्यलेखाधिकारी यांचेकडे टिपणी व मसुदा तपासणी कामी दिला होता.

त्यावर मुख्यलेखाधिकारी यांनी या पुर्वी साई आश्रम व व्दारावतीसाठी मॅट्रेस खरेदीसाठी निविदा प्रसिध्द करुन पुरवठा दार व दर निश्चित करुन दि. ११ ऑक्टोबर २०११ रोजी पुरवठा आदेश दिले होते. असे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसुन येते.

आता त्या आदेशाप्रमाणेच त्याच दराने त्याच पुरवठादाराकडुन साई आश्रम धर्मशाळासाठी मॅट्रेस खरेदीचा आदेश देणेसाठी प्रस्तावित केले आहे. सदरील आदेश हा पुर्नप्रत्ययी आदेश आहे. मुळ आदेश आणि पुर्नप्रत्ययी आदेश यामध्ये अडीच वर्षाचा कालावधी आहे.

पुर्नप्रत्ययी आदेशाबाबत शासनाचे असलेले नियम, आदेश व निर्णय :- शासनाच्या भांडार खरेदी बाबत असलेल्या २/१/१९९२ च्या शासन निर्णय क्र.भारवस १०८८/२५१२/ उद्योग-६ नुसार मुळ आदेश व पुर्नप्रत्ययी आदेश यामध्ये सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी असू नये. परंतु मॅट्रेस खरेदीमध्ये मुळ आदेश व पुर्नप्रत्ययी आदेश यामध्ये अडीच वर्षापेक्षाही जास्त कालावधी झाल्यानंतर पुर्नप्रत्ययी आदेश देणेबाबतचा ठराव करुन न्यायालयात परवानगीसाठी दाखल झाला होता.

मॅट्रेस खरेदीबाबतचा आदेश (पुर्नप्रत्ययी आदेश) प्रस्तावित करण्यामध्ये अनियमीतता घडलेली आहे. तसेच चुकीचा प्रस्ताव न्यायालयामध्ये सादर झालेला दिसतो. असा शेरा मा. मुख्यलेखाधिकारी यांनी दिला आहे. त्यावर मा. कार्यकारी अधिकारी यांनी धर्मशाळा विभागाने तपासुन सादर करावे असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार मा. मुख्यलेखाधिकारी यांच्या शे-यानुसार व शासनाचा पुर्नप्रत्ययी आदेशाबाबत शासनाचे असलेले नियम, आदेश व निर्णया नुसार शासनाच्या भांडार खरेदी बाबत असलेल्या २/१/१९९२ च्या शासन निर्णय क्र.भारवस १०८८/२५१२/उद्योग-६ नुसार मुळ आदेश व पुर्नप्रत्ययी आदेश यामध्ये सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी असू नये. असे म्हटले आहे. त्यानुसार मॅट्रेस खरेदीमध्ये मुळ आदेश व पुर्नप्रत्ययी आदेश यामध्ये अडीच वर्षापेक्षाही जास्त कालावधी असलेने पुर्नप्रत्ययी आदेश देता येणार नाही.

आता नविन गाद्या खरेदि करणेबाबत फेर टिपणी तयार करुन मा. व्यवस्थापन समिती समोर सादर करणे, खरेदी रु. १० लाखाचे वर असल्याने विधी विभागामार्फत मा. उच्चन्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणे, मा. कोर्टाचे आदेशा नुसार ई-निविदा मागविणे, वर्तमानपत्रात जाहीरात देणे, प्री-बीड निविदा उपसमितीच्या समोर उघडणे इ. कार्यवाही करावी लागणार आहे. त्यासाठी साधरणपणे ५ ते ६ महीन्याचा कालावधी लागणार आहे. तसेच तत्पुर्वी दिनांक ०५/०६/२०१४ रोजीचा मा. व्यवस्थापन समितीच्या ठरावात बदल करुन ई-टेंडरींग करण्यास मान्यता मिळणेकामी मा.त्रिसदस्य समितीचे सभेत मान्यतेसाठी सादर करुन ठरावा नंतर मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची पुन्हा मान्यता घ्यावी लागणार आहे.

दिनांक १२/०२/२०१५ रोजीचे टिपणीवर मा. कार्यकारी अधिकारी यांनी याविषयी त्वरीत चर्चा करावी, असे निर्देश दिले होते. त्यानुसार दि.१७/०२/२०१५ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे कक्षेत मध्यें झालेल्या चर्चेमध्ये मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी नियमानुसार कार्यवाही करण्याशिवाय पर्याय नाही. तरी कृपया त्वरीत प्रस्ताव ठेवावा, असे निर्देश दिले आहेत.

मा. कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार नविन गाद्या खरेदी करणेकामी ई-टेंडर मागविणेस तसेच त्याकामी प्रति नगास अंदाजे रु.४,५००/- प्रमाणे १६८० नग गादी खरेदी करणेस येणा-या रु.७५,६०,०००/- (अक्षरी रु.पंच्याहत्तर लाख साठ हजार मात्रचे) खर्चाचे मान्यतेस्तव, तसेच खरेदी रु. १० लाखाचे वर असल्याने विधी विभागामार्फत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेचे मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.८५** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, साई धर्मशाळा विभागाकरीता गाद्या खरेदी करणेकामी येणा-या अंदाजे रु.७५,६०,०००/- मात्रचे खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालायाचे औरंगाबाद खंडपीठाची परवागनी घेणेसाठी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत यावा व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक साईधर्मशाळा/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१४** **शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना देण्यात येणा-या ४० अकुशल कंत्राटी कर्मचा-यांच्या मुदतीबाबत**

**प्रस्ताव-** शिर्डी नगरपंचायत हद्दीतील नगर- मनमाड रोड हा राज्यमार्ग व साईबाबा मंदिर बाहेरील परीसरातील रस्ते साफ सफाई करणेसाठी शिर्डी नगरपंचायतचे आरोग्य विभाग कडील यंत्रणा कमी पडत आहे त्यामुळे नगर – मनमाड रोड, (शिर्डी पोलीस स्टेशन ते साईआश्रम, एक हजार रुम) मनोजकुमार पथ, या रस्त्यांचे साफसफाईसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांनी नगर पंचायतला दिलेले ४० कंत्राटी अकुशल कर्मचा-यांची मुदत ३१ मार्च २०१५ रोजी संपुष्टात येत आहे.

दि.०१ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ या पुढील वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ मिळणेकामी शिर्डी नगर पंचायत शिर्डी यांनी दि. ११/०२/२०१५ चे पत्राव्दारे विनंती केलेली आहे.

यापुर्वी मा. व्यवस्थापन सिमतीचे दि. ०५/०६/२०१४ रोजीचे सभेपुढील विषय नं. १३१ निर्णय क्र. ४१९ ने ०१/ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१५ अखेर एक वर्षाचे मुदतीसाठी साफसफाईकरिता ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी देण्याचे मंजुर करण्यात आले आहेत.

नगर पंचायतीचे दि. ११/०२/२०१५ रोजीचे विनंतीपत्रानुसार उपरोक्त कामी शिर्डी नगर पंखयत शिर्डी यांना पुढील एक वर्षासाठी ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी पुरविल्यास खालील प्रमाणे अंदाजे खर्च येईल.

४० कंत्राटी अकुशल कर्मचा-यांचे वेतनावर होणारा अंदाजे खर्च :-

| अ.नं. | तपशिल | होणारा खर्च |
|---|---|---|
| १ | प्रति दिन प्रति कर्मचारी दर रु. | २५४-३८ |
| २ | प्रा. फंड १३.६१% | ३४-६२ |
| ३ | सर्व्हिस चार्ज ०.१०% | ००-२५ |
| | एकुण | **२८९-२०** |
| ४ | सर्व्हिस टॅक्स १२.३६% | ३५-७५ |
| ५ | प्रति दिन प्रति कर्मचारी दर रु. | ३२५-०० |
| ६ | प्रति दिन ४० कर्मचारी रु. | १३०००-०० |
| ७ | प्रति दिन ४० कर्मचारी ३६५ दिवसाकरिता रु. | ४७४५०००-०० |
| ८ | +१०% वर्षात होणारी वाढ | ४७४५००-०० |
| | एकुण | **५२१९५००-००** |

तरी उपरोक्त प्रमाणे शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी पुरवावयाचे असल्यास त्यांचे वेतनापोटी अंदाजे रुपये ५२१९५००/- (अक्षरी रुपये बावन्न लाख एकोणाविस हजार पाचशे मात्र) इतका खर्च येईल.

तरी या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.८६** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना पुढील एक वर्ष (दि.०१ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६) कालावधीसाठी ४० अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.५२,१९,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

**विषय नं.१५** **श्री.रामराव रंभाजी शेळके, अधिक्षक, मंदिर विभाग यांचा दि.२५.०२.२०१५ रोजीच्या विनंती अर्जानुसार जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/ ३१८७/ २०१४ दि.०६.१०.२०१४ रोजीचे आदेशान्वये केलेले निलंबन रद्द होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.रामराव रंभाजी शेळके, अधिक्षक, मंदिर विभाग हे डयुटीवर असतांना त्यांचेकडून खालीलप्रमाणे गैरशिस्तवर्तन घडलेले आहे.

१) दि.२१-०८-२०१४ रोजीचे प्रभात या दैनिकात शिर्डी साईमंदिरात फोटोसेशन,ठरवाला हरताळः अधिका-यांचा आशिर्वाद,प्रशासन सुस्त या मथळयाखाली बातमी/निवेदन प्रसिध्द झालेले होते.

२) श्री.मनोहर दासगुरु पाठक,पुजारी,मंदिर विभाग यांनी दि.२५-०८-२०१४ रोजीचा तक्रार अर्ज दिलेला असून त्यात त्यांनी ‘मानसिक त्रासाबद्दल मंदिर प्रमुखाची चौकशी करण्याबाबत.’असे म्हटलेले आहे.

३) दक्षिण दरवाज्यावरील अनागोंदी व श्री.रामराव शेळके यांचे कार्यपध्दतीबाबत. जा.क्रं.बीडीडीस/मंदिर सुरक्षा/१५/२०१४ दि.३०-०८-२०१४ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

४) आरतीचे वेळी श्री साईबाबांना नैवेद्य दाखविणेकामी नैवेदय ताट ठेवणेची प्रचलित पध्दत आहे. परंतू त्यांनी अनाधिकारे आरतीचे वेळी नैवेद्य ताटास पार्टीशन लावणेची पध्दत नसतांना त्यांना नैवैदय ताटास दि.१२-०६-२०१४ रोजी दुपारी १२.००वा. माध्यान्ह आरतीचे वेळी पार्टीशन लावलेले असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत त्यांना जा.क्रं.एसएसएस/ वशी-७ए/२५०६/२०१४ दि.०६-०९-२०१४ अन्वये श्री.शेळके यांना ‘सक्तताकिद’ आदेश दिलेला आहे.

परंतू सदरचा ‘सक्तताकिद’ आदेश श्री.शेळके यांनी स्विकारणेस नकार दिलेला आहे याबाबत प्र.अधिक्षक यांनी दि.१०-०९-२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे.यावरुन त्यांनी वरिष्ठांचे आदेशाचा अवमान केलेला आहे असे दिसून येते.

अशाप्रकारे श्री.रामराव रंभाजी शेळके,अधिक्षक,मंदिर विभाग यांची उपरोक्तप्रमाणे वरिष्ठांच्या कोणत्याही कायदेशिर वाजवी हुकूमाच्या बाबतीत, दुस-याच्या जोडीने असो कि नसो, जाणूनबूजून उद्दामपणा करणे किंवा त्यांचे पालन न करणे., आस्थापनेच्या जागेत शिस्तीला व सद्वर्तनाला बाधक ठरेल असे कोणतेही कृत्य करणे किंवा त्यांचे ऑर्डर्स अनुसारचे आरोपपत्र, आदेश किंवा इतर पत्र घ्यावयास नकार देणे इ.कृत्ये दि इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅन्डींग ऑर्डर्स) ॲक्ट १९४६ चे कलम नंबर २२ (ए),२२ (एल) व २२ (एक्स) अन्वये गंभीर गैरशिस्तवर्तनात मोडतात. सदर गैरशिस्तवर्तन श्री.शेळके यांनी केलेले असल्याचा आरोप त्यांचेवर ठेवणेत आलेले असून त्यांना खातेचौकशी करणेकामी जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२८७३/२०१४ दि.२५-०९-२०१४ अन्वये आरोपपत्र बजाविणेत आलेले आहे.

श्री.शेळके यांचे विचाराचे गांभीर्य विचारात घेता त्यांना खातेचौकशी पुर्ण होवून निर्णय होईपर्यंत जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/३१८७/२०१४ दि.०६-१०-२०१४ अन्वये संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा सेवा निलंबीत करणेत आलेले आहे.

श्री.शेळके यांनी दि.१६-१०-२०१४ रोजीचा विनंती अर्ज मा.जिल्हाधिकारी साहेब, अहमदनगर,सदस्य, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेकडेस सादर केलेला असून त्यात त्यांनी,’ विनंती पुर्वक अर्ज करतो कि,मी मंदिर विभागामध्ये अधिक्षक या पदावर काम करीत आहे.मला पत्रान्वये खाते चौकशीकरीता तीन महिन्याचा कालावधी देण्यात आलेला होता.परंतू त्यानंतर लगेच संस्थान सेवेतून तात्पुरते सेवानिलंबीत करण्याचा आदेश करण्यात आलेला आहे.तरी माझा सेवा निलंबनाचा आदेश रद्द करुन मला कामावर पुर्ववत कामावर घेणेस विनंती आहे.’असे म्हटलेले आहे.

सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता.दि.०६-११-२०१४ रोजीचे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नंबर १७ निर्णय क्रं.९४० अन्वये श्री.शेळके यांना पुर्ववत कामावर हजर करुन घेण्याचे दि.१६-१०-२०१४ रोजीचे अर्जाद्वारे निलंबन रद्द होणेबाबत केलेली विनंती अमान्य करणेत आलेली आहे याबाबतचा निर्णय पारित करणेत आलेला आहे.

त्यानंतर श्री.शेळके यांनी दि.२५-०२-२०१५ रोजीचा विनंती अर्ज सादर केलेला आहे.त्यात त्यांनी,’’मला दि.२५-०९-२०१४ चे जा.नं.एसएसएस/वशी-७ ए/२८७३-२८७४/२०१४ दि.२५-०९-२०१४ अन्वये खातेचौकशीचे आदेश देणेत आलेला आहे. मात्र चौकशी अधिकारी, कामगार अधिकारी यांचेमुळे चौकशीचे कामकाजास उशीर झाला असुन,चौकशीचे कामकाज चालु आहे.

मी.दि.३१ मे २०१५ रोजी सेवा निवृत्त होणार आहे. त्याकरीता उपरोक्त विषयांकित आपण केलेले निलंबन रद्द करुन,मला पुर्ववत कामावर हजर करुन घेणेस विनंती आहे.मी औरंगाबाद हायकोर्ट येथील केस नं.९२४५/२०१४

माघार घेणेस तयार आहे.तरी मला कामावर हजर करुन,चौकशीचे कामकाज चालु ठेवणेस विनंती आहे.''असे म्हटलेले आहे.

श्री.शेळके यांना खातेचौकशी कामकाज लवकरात लवकर पुर्ण करणेकरीता २६ वेळा खातेचौकशी नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. श्री.शेळके हे ०५ तारखांना गैरहजर/अनुपस्थितीत असल्याने सदर तारखांना चौकशी कामकाज झालेले नाही. खातेचौकशी अधिकारी यांनी श्री.शेळके यांचे खातेचौकशी कामकाजाचा रोजनामा सोबत अवलोकनार्थ जोडलेला आहे.

सबब, श्री.रामराव रंभाजी शेळके, तात्पुरते सेवा निलंबीत अधिक्षक,मंदिर विभाग हे दि.३१-०५-२०१५ रोजी सेवा निवृत्त होत असल्याने, त्यांची चालु असलेली खातेचौकशी निष्कर्श अहवालाच्या अधिन राहुन त्यांना अन्यत्र नियुक्ती देता येवु शकेल.श्री.शेळके यांनी संस्थान विरुध्द दाखल केलेले नं.९२४५/२०१४ माघार घेणेची कार्यवाही पुर्ण करण्याच्या अटीवर त्यांना हि नियुक्ती देता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८७** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.रामराव रंभाजी शेळके, तात्पुरते सेवा निलंबीत अधिक्षक, मंदिर विभाग यांच्या विनंती अर्जाचा विचार करता, ते चौकशी कामात पुर्ण सहकार्य करतील. चौकशी कामात हस्तक्षेप अथवा दबावाचा अवलंब करणार नाहीत व औरंगाबाद हायकोर्ट येथील केस नं.९२४५/२०१४ माघारी घेतील, पूर्वीचा मंदिर प्रमुखाचा कार्यभार तात्काळ हस्तांतर करतील या अटिंच्या तसेच त्यांचेवर चालु असलेल्या खातेचौकशी निष्कर्श अहवालाच्या अधिन राहून त्यांचे निलंबन रद्द करणेत येऊन, त्यांना अन्यत्र पुनःस्थापना देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१६** **श्री.दिलीप बाळकृष्ण औदिच्य, स्टोअर मॅनेजर, श्री.मच्छिंद्र काशिनाथ थोरात, फार्माशिस्ट व श्री.प्रकाश जालींदर दिघे, फार्माशिस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत**

**प्रस्ताव-** 1) श्री.औदिच्य हे श्री साईबाबा हॉस्पीटल येथे स्टोअर मॅनेजर या पदांवर कार्यरत आहेंत. 2)श्री.थोरात हे श्री साईनाथ रूग्णालय येथे फार्मासिस्ट या पदावर कार्यरत आहेत. यापूर्वी ते साईबाबा हॉस्पीटल येथे दि.20-01-2015 रोजीपर्यंत प्रभारी मटेरियल मॅनेजर या पदाचे कामकाज पाहत होता. 3) श्री.दिघे हे श्री साईबाबा हॉस्पीटल येथे फार्मासीस्ट या पदांवर कार्यरत आहेंत.पुरवठा धारकाकडून संस्थानला आलेले औषधे पुरवठा आदेशानुसार स्वीकारणेचे कामकाज त्यांचेकडे सोपविणेत आलेले आहे. उपरोक्त तिघे कार्यरत असलेल्या कालावधीमध्ये औषध भांडार विभागामध्ये प्रत्यक्ष आलेली औषधे, देण्यात आलेला पुरवठा आदेश, दरपत्रक, शिल्लक साठा व इतर दैनंदिन कामकाजामध्ये सकृतदर्शनी गंभीर त्रुटी आढळुन आलेल्या आहेत.

दि.21-02-2015 रोजी दुपारी 4.45 ते सायंकाळी 6.00 या कालावधीत श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय येथे मा.कार्यकारी अधिकारी सा ो., उपकार्यकारी अधिकारी सा ो., मुख्यलेखाधिकारी व प्र.कामगार अधिकारी यांचे समवेत श्री साईनाथ व साईबाबा रुग्णालय, येथील मेडिकल स्टोअर येथे जावून औषध खरेदी व त्या संबंधीत माहिती घेण्यासाठी प्र.वैद्यकिय प्रशासक यांचे समवेत माहिती घेणेसाठी आले होते. उपरोक्त तृटीबाबत त्यांना विचारणा करणेत आली. याबाबत त्यांनी दिलेली उत्तरे असमाधानकारक आहेत. त्यांचे सदरचे कृत्ये हे गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते. त्यांनी त्यांचे कामकाजात हलगर्जीपणा, निष्काळजीपणा केलेला असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

म्हणून सदर गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.औदिच्य यांना जा.नं.एसएसएस/वशी-7ए/5464/2015 दि.25-02-2015 अन्वये, श्री.थोरात यांना जा.नं.एसएसएस/वशी-7ए/5465/2015 दि.25-02-2015 अन्वये व श्री.दिघे यांना जा.नं.एसएसएस/ वशी-7ए/5471/2015 दि.26-02-2015 अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून, त्यांनी अनुक्रमे दि.03-03-2015, दि.04-03-2015 व दि.26-02-2015 रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला आहे.

कारणे दाखवा नोटीसमध्ये त्यांचेवर ठेवलेले आरोप त्यावर त्यांनी सादर केलेला खुलासा व त्यावरील प्रशासनाचे अभिप्राय विषयक विवरणपत्र सोबत अवलोकनार्थ जोडले आहे.

श्री.औदिच्य, श्री.थोरात, श्री.दिघे यांनी उपरोक्तप्रमाणे केलेले लेखी खुलाशात जबाबदारी झटकलेली असून जुजबी खुलासे सादर केलेले आहेत.सदरचे लेखी खुलासे असमाधानकारक आहेत. स्टोअर्समध्ये अन्य कायम व कंत्राटी कर्मचाऱ्यांबाबत या संबंधाने विचारणा करण्यात आली असता त्यांनी आम्ही वरिष्ठांचेच आदेशाने सर्व कामकाज केलेले आहे असे त्यांनी लेखी खुलासे सादर केलेले आहेत. दरम्यानचे काळात हॉस्पिटलचे मेडीकल स्टोअर्सचे संबंधीत कामकाजात आणखी काही तृटी निदर्शनास येत असून ज्या औषधांचे खरेदी आदेश देण्यात आलेले नाहीत ते स्टोअर्समध्ये ठेवण्यात आले आहेत. यास सर्वस्वी औषधाचा खरेदी आदेश तयार करुन सादर करणारे तत्कालीन प्र.मटेरियल मॅनेजर श्री.थोरात अधिकारी, आलेली औषधे हि बरोबर आहेत किंवा नाही याची पडताळणी करणारा फार्मासिस्ट श्री.दिघे व भांडारमध्ये सदरचे औषधे ठेवणारे स्टोअर मॅनेजर श्री.औदिच्य हेच सर्वस्वी जबाबदार आहेत. सदरच्या बाबी अतिशय गंभीर स्वरुपाच्या असून याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करता येईल-

1) श्री साईबाबा हॉस्पिटल मेडिकल स्टोअर व भांडार विभागातील संबधीत कामकाजाचे विशेष परिक्षण त्रयस्थ यंत्रणेमार्फत करणे.

2) कागदपत्रात फेरफार करु नये व ऑडीटचे कामात हस्तक्षेप होणार नाही याकरीता श्री.दिलीप औदिच्य, श्री.मच्छिद्र थोरात, श्री.जालींदर दिघे यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपील) विनियम, 2013 प्रकरण 2 कलम 4 अ व 4 ब अन्वये निलंबन अंतर्गत तात्पुरते सेवा निलंबीत करणे.

3) यांना निलंबीत करुन विशेष लेखा परिक्षणातील निष्कर्शानुसार गैरबाबी समोर आल्यास त्यावर आधारीत पुढील अनुज्ञेय कायदेशीर कारवाई करणे.

मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.८८** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.दिलीप बाळकृष्ण औदिच्य, स्टोअर मॅनेजर, श्री.मच्छिंद्र काशिनाथ थोरात, फार्माशिस्ट व श्री.प्रकाश जालींदर दिघे, फार्माशिस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत प्रस्तावित केलेप्रमाणे व नियमानुसार कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१७** **गुरुस्थान, नंदादीप, दत्तमंदीर, शनी, शिव व गणपती मंदिराचे गोपूरास सोन्याचा मुलामा देणेबाबत**

**प्रस्ताव-** साईभक्त बी. विजयकुमार यांनी समाधी मंदिर परिसरामध्ये असलेल्या श्रीगुरुस्थान मंदिर, श्रीनंदादीप, श्री दत्तमंदिर, श्रीशनि मंदिर, श्रीशिव मंदिर, श्रीगणपती मंदिर या मंदिरांचे गोपूरास (घुमटास) कॉपर बेस करुन सोन्याचा मुलामा देणगीदाखल करणेस परवानगी मागितली आहे. तसेच संस्थानमार्फत सदर मंदिरांचे गोपूरास सोन्याचा मुलामा देणेचे कामास परवानगी मिळाल्यास या कामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रक सादर करण्यात येईल असे त्यांनी कळविले आहे.

श्री.बी.विजयकुमार यांचे देणगीतून सन २००७ मध्ये समाधी मंदिराचे कळसास तसेच गोपूरास सोन्याचा मुलामा दिलेला आहे. मंदिर परिसरातील इतर मंदिरापैकी श्रीदत्तमंदिर वगळता इतर मंदिराचे कळसांना सोन्याचा मुलामा देण्यात आलेला आहे. देणगीदार साईभक्त बी. विजयकुमार, हैद्राबाद हे या सर्व मंदिरांचे कळसानां तसेच गोपूरांना (घुमटांना) कॉपर बेस करुन सोन्याचा मुलामा करण्यास तयार आहेत. सोन्याचा मुलामा केल्यास ही मंदिरे अधिक आकर्षक दिसतील. तसेच संस्थानचे वैभवामध्ये भर पडेल.

तरी श्री गुरुस्थान मंदिर, श्रीनंदादीप, श्री दत्तमंदिर, श्रीशनि मंदिर, श्रीशिव मंदिर, श्रीगणपती मंदिर या मंदिरांचे कळसांना तसेच गोपूरांना (घुमटांना) श्री.बी.विजयकुमार, हैद्राबाद यांचे देणगीतून सोन्याचा मुलामा देणेस मान्यता मिळणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.८९** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुस्थान मंदिर, श्रीनंदादीप, श्री दत्तमंदिर, श्रीशनि मंदिर, श्रीशिव मंदिर, श्रीगणपती मंदिर या मंदिरांचे कळसांना तसेच गोपूरांना (घुमटांना) श्री.बी.विजयकुमार, हैद्राबाद यांचे देणगीतून सोन्याचा मुलामा देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.१८** **सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ दरम्यान जादा गर्दीचे कालावधीत समाधी मंदिर रात्रभर उघडे ठेवणेबाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०/०१/२०१०चे सभेतील विषय नं.७६, निर्णय क्र.७६ चे नुसार अ) २६ जानेवारी, ब) १५ ऑगस्ट, क) दिपावली (पाडवा), ड) २५ डिसेंबर नाताळ, ई)३१ डिसेंबर फ)गुढीपाडवा, ग)०१ मे (महाराष्ट्र दिन) या दिवशी व त्या शिवाय गर्दीचे कालावधीत समाधी मंदिर रात्रभर उघडे ठेवणेबाबतचे अधिकार हे मा.कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

त्यानुसार या वर्षी नाशिक येथे होणारे सिंहस्थ कुंभमेळ्याचे कालावधीमध्ये शिर्डी येथे श्रीसाईबाबांचे दर्शनार्थ येणा-या साईभक्तांचे संख्येमध्ये ज्या दिवशी मोठ्या प्रमाणात वाढ होईल त्या दिवशी भक्तांचे गर्दीचा अंदाज घेऊन समाधी मंदिर रात्रभर दर्शनासाठी उघडे ठेवणेबाबत विचार व्हावा असे नम्र मत आहे.

तरी सिंहस्थ कुंभमेळ्याचे दरम्यान दि.१० ऑगस्ट २०१५ ते दि.२५ सप्टेंबर २०१५ या कालावधीत गर्दीची प्रप्त परिस्थीती पाहुन गरज भासेल त्यावेळी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे ठेवणेबाबत निर्णय घेण्याचा अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना देणेबाबत मान्यता असावी. तसेच त्यादिवशी रात्री शेजारती व दुसरे दिवशी काकड आरती करता येणार नाही. याबाबत मान्यता असावी ही विनंती. तरी मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.९०** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ दरम्यान जादा गर्दीचे कालावधीत समाधी मंदिर रात्रभर उघडे ठेवणेबाबत त्या-त्या वेळची परिस्थीती पाहून कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग/ संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९** **मे.इंदापूर डेअरी मिल्क ॲण्ड मिल्क प्रोडक्ट, गोखळी यांचेकडून गावरान तुप खरेदी करणेबाबत**

**प्रस्ताव-** माहे ऑक्टोबर २०१४ ते मार्च-२०१५ करिता आवश्यक किराणा माल खरेदीकामी मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव इकडील जा.क्र.२२४ दि.२४.०६.२०१४ रोजी विधी विभागाकडे सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावास माहे ऑगस्ट-२०१४ अखेर मान्यता न मिळाल्याने व पहिल्या सहामाही खरेदीची मुदत माहे सप्टेंबर २०१४ अखेर संपत असल्याने, मा.व्य.समितीचे दि.२८.०८.२०१४ चे सभेतील निर्णयानुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.१३.०३.२०१४ रोजीचे निर्णयास अधीन राहुन, माहे ऑक्टो-१४ ते मार्च-१५ अखेर किराणा माल खरेदीची पुर्वतयारी करणेकामी दि.०६.०९.२०१४ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०६.०९.२०१४ ते दि.२०.०९.२०१४ अखेर ई-निविदा मागणी करण्यात आलेली होती. तसेच सदर खरेदीस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.२६.०९.१४ रोजी मान्यता दिलेली आहे.

मा.व्य.समितीचे दि.२८.०८.२०१४ चे सभेतील निर्णयानुसार माहे ऑक्टो-२०१४ ते मार्च-२०१५ करिता किराणा माल खरेदीकामी ई-निविदा प्रक्रिया राबवून कार्यवाही करण्यात आलेली असून, गावरान तुपाकरिता ०६ नमुने प्राप्त झालेले होते. सदरचे गावरान तुपाचे नमुने दि.२१.०९.२०१४ रोजी प्रशासकीय अधिकारी खरेदी विभाग

यांचेसमक्ष प्लॅस्टिक बरणीमध्ये सिलबंद करुन, त्यास गोपनीय कोड नंबर देऊन मे.अश्वमेघ लॅब, नाशिक येथे दि.२१.०९.२०१४ रोजी तपासणीसाठी पाठविण्यात आलेले होते. दिलेले गोपनीय कोड नंबर स्वतंत्र पाकिटात सिलबंद करण्यात आलेले होते. त्याचा तपासणी रिपोर्ट इकडील कार्यालयाकडे दि.०४.१०.२०१४ रोजी प्राप्त झालेला आहे..

सन २०१४-१५ चे माहे ऑक्टोबर २०१४ ते मार्च २०१५ अखेर किराणा माल खरेदीकामी प्राप्त ३७ निविदांपैकी पात्र ३५ निविदाधारकांच्या मुळ निविदा (Financial Bid) व गावरान तुपाचा प्राप्त तपासणी अहवाल मा.व्य.समितीचे दि.०९.१०.२०१४ रोजीचे सभेत उघडण्यात आला. तसेच मे.अश्वमध लॅब, नाशिक यांचेकडील तपासणी अहवालामध्ये उपरोक्त सर्व निविदाधारकांच्या गावरान तुपाचे सॅम्पलचे तपासणी अहवालामध्ये गावरान तुप अन्न सुरक्षा कायदानुसार योग्य असल्याचे नमुद केलेले आहे. गावरान तुपाचे ०६ निविदाधारकांपैकी ०३ निविदाधारकांच्या निविदा वेगवेगळ्या कारणांसाठी अपात्र ठरविण्यात आलेल्या आहेत.

तसेच पात्र तीन निविदाधारकांच्या निविदेतील गावरान तुपाकरिता दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | ब्रॅण्ड | निविदेतील दर प्रती क्विंटल | |
|---|---|---|---|---|
| ०१. | मे.अंजता राज प्रोटीन्स लि., आग्रा | मोहक | **रु.२७,४५०/-** | L1 |
| ०२. | मे.इंदापूर डेअरी अॅण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी | सोनाई | रु.३१,५००/- | L3 |
| ०३. | मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई | पंचामृत | रु.२८,८७५/- | L2 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये मे.अंजता राज प्रोटीन्स लि, आग्रा यांचे मोहक बॅण्डचे प्रति क्विंटल रु.२७,४५०/- मात्र हे दर न्यनुतम असल्याने, त्यांना इकडील जा.क्र.४९६४/२०१४ दि.०९.०१.२०१५ अन्वये गावरान तुप पुरविणेकामी खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

| अ.नं. | मालाचा तपशिल | वर्णन | मागणी क्विंटलमध्ये | निविदेमधील दर प्रती क्विंटल | एकुण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | गावरान तुप, गाईचे, अॅगमार्क/ FSSAI, १५ कि.ग्रॅ.नवीन डबा पॅकिंग | मोहक | 7,000 | 27,450.00 | 19,21,50,000.00 |
| | | | | **एकुण रक्कम रुपये** | **19,21,50,000.00** |
| | | | | **२ % सुरक्षा अनामत रक्कम रुपये** | **38,43,000.00** |

त्यानुसार त्यांचेकडून आजपावेतो २२८४.१०० क्विंटल गावरान तुपाचा पुरवठा झालेला आहे.

मात्र त्यांचेकडून दि.०५.०२.२०१५ रोजी बॅच नं.A-05 Mfg.January-2015 चे मोहक ब्रॅण्डचे १००० डबे (१५,००० किलो) गावरान तुप भांडार विभागात आले असता, संस्थानचे दक्षता पथकाने सदरचे गावरान तुपाचे दोन डब्बे फोडून पाहिले असता, पुर्वी संस्थानला प्राप्त झालेल्या डब्यातील तुप व आजच्या डब्यामधील तुपात फरक आढळलेला आहे. तसेच संस्थानचे आचारी श्री.सांबारे व बुंदी तळणारे आचारी यांनीही सदर मालात फरक असलेबाबत तोंडी अभिप्राय दिलेले होते. याबाबत दक्षता पथकाने माल तपासणी रजिस्टरला शेरा नोंदविलेला आहे. त्यामुळे सदरची गाडीतील तुप उतरवून न घेता नाकारण्यात आलेली आहे. तसेच दक्षता पथकामार्फत सदरील गावरान तुपाचे सॅम्पल रासायनिक तपासणीसाठी नेण्यात आलेले आहेत. तसेच दि.०७.०२.२०१५ रोजी सबंधीत कंपनीचे प्रतिनिधी श्री.विनोद सिंघल यांचे समक्ष दक्षता पथकाने प्राप्त गावरान तुपातील डब्ंयांमधील नमुने काढले असता, सदर नमुन्याच्या बरणीमध्ये साधरणतः १ इंच जाडीचा पांढ-या रंगाचा थर (मॉईश्चर) आढळला. सदरची बाब ही कंपनीचे प्रतिनिधी श्री.सिंघल यांनीही मान्य केलेली आहे. सदरबाबत दक्षता पथक माल तपासणी रजिस्टरला नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे असे गावरान तुप वापरणे श्री साईभक्तांचे आरोग्य अपायकारक ठरेल. करिता यापुढे मे.अंजता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांचेकडून गावरान तुप खरेदी करणे योग्य ठरणार नाही.

तसेच द्वितीय न्युनतम दरधारक मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई यांनीही सन २०१२-१३ मध्ये पंचामृत ब्रॅण्डचे गावरान तुपाचा पुरवठा करतांना अशाच प्रकारे कमी दर्जाचे गावरान तुप पुरविलेले होते, सदरवेळी मा.व्य.समितीचे दि.०७.०२.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.७३ नुसार त्यांचेकडून गावरान तुप बदलुन घेतलेले होते. तसेच अन्याय व भ्रष्टाचार निवारण व पर्यावरण संरक्षण संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचेकडील दि.०४.०९.२०१४ रोजीचे पत्रान्वये पंचामृत डेअरी प्रा.लि., यांचे गावरान तुपाचे दर्जाबाबत शंका असून, सदरचे तुप आवश्यक योग्यता धारण करत नाही. सदरचे तुप निम्न प्रतिचे असून, ते लोकांच्या स्वास्थ्यास घातक ठरु शकते, तरी मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई यांचेकडून संस्थानने तुप खरेदी करु नये वगैरे मजकुराचे पत्र दिलेले होते. सदरबाबत मा.व्य.समितीचे दि.२५.०९.२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.८३३ नुसार संस्थानमध्ये गावरान तुपाची खरेदी विहित पध्दतीने केली जाते, त्यामुळे सदर पत्राची दखल घेण्यात येऊ नये, मात्र आपल्या स्तरावर सदरहु तुपाच्या उत्तम प्रतीबाबत देखरेख ठेवावी असे ठरलेले आहे. तसेच मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई यांनी वेळोवेळी संस्थानचे आचारी यांचेवर चुकीचे काम केलेबाबत तसेच संस्थान प्रशासनावर चुकीच्या पध्दतीने निविदा प्रक्रिया राबविल्याबद्दल गंभीर स्वरुपाचे आरोप करुन, संस्थानची बदनामी करण्याचा प्रयत्न केलेला होता. त्यामुळे त्यांच्या दरांचा विचार करता येणार नाही.

तसेच तृतीय न्युनतम दरधारक मे.इंदापूर डेअरी अॅण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी यांचेकडूनही संस्थानने यापुर्वी सोनाई ब्रॅण्डचे गावरान तुप खरेदी केलेले आहे. त्यांचेकडील तुपाचा दर्जा हा उत्तम प्रतीचा असून, त्यांची तुप

पुरविण्याची क्षमतादेखील चांगली आहे. त्यामुळे त्यांचेकडून पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यक गावरान तुप खरेदी करता येऊ शकते. सदर निविदाधारकाचे निविदेमध्ये प्रति क्विंटल रु.३१,५००/- मात्र दर होता. मात्र त्यांचेशी दुरध्वनीद्वारे केलेल्या चर्चेनुसार त्यांनी प्रति क्विंटल रु.२९,५००/- + ५%व्हॅट (रु.१,४७५/-) = रु.३०,९७५/- मात्र प्रमाणे गावरान तुपाचा पुरवठा करण्यास समर्थता दर्शविलेली आहे. त्याबाबत त्यांनी दि.२३.०२.२०१५ रोजी ई-मेलदेखील केलेला आहे.

तरी निविदेतील व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी यांचेकडून पुढील निविदेची प्रक्रिया पुर्ण होईपावेतो अंदाजे २००० क्विंटल सोनाई ब्रॅण्डचे गावरान तुप प्रति क्विंटल रु.३०,९७५/- या दराने खरेदी करता येईल. तसेच सदर गावरान तुप खरेदी करतांना मे.अंजता राज प्रोटीन्स लि., आग्रा, मोहक ब्रॅण्ड दर प्रति क्विंटल रु.२७,४५०/- मात्र पेक्षा प्रति क्विंटल रु.३,५२५/- मात्र जादा खर्च येईल. त्यानुसार २००० क्विंटल गावरान तुप खरेदीकामी जादा येणारी अंदाजे रक्कम रु.७०,५०,०००/- (रु.३,५२५/- X २००० क्विंटल) मात्र मे.अंजता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांचे प्रलंबित बिलातून अथवा सुरक्षा अनामत रक्कमेतून वसुल करता येईल.

मा.उच्च न्यायालयाने त्यांचेकडील दि.२६.०९.२०१४ च्या निर्णयामध्ये गावरान तुप खरेदीस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता दिलेली असल्याने तृतीय न्युनतम दरधारक मे.इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी यांचेकडून तुप खरेदी करता येईल. सबब मा.उच्च न्यायालयाचा याकामी वेळ घेणे योग्य ठरणार नाही. तसेच तृतीय न्युनतम दरधारकांकडून तुप खरेदी करतांना जादा येणारी अंदाजे रक्कम रु.७०,५०,०००/- मात्रही मे.अंजता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांचे सुरक्षा अनामत रक्कमेतून अथवा प्रलंबित बिलातून करण्यात येणार आहे, त्यामुळे यामध्ये संस्थानचे कोणत्याही प्रकारचे आर्थिक नुकसान होणार नाही.

तरी प्रस्तावित केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी यांचेकडून सोनाई ब्रॅण्डचे गावरान तुप प्रति क्विंटल रु.३०,९७५/- या दराने खरेदी करणेस व त्याकामी जादा येणारी रक्कम मे.अंजता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांचे प्रलंबित बिलातून अथवा सुरक्षा अनामत रक्कमेतून वसुल करणेस, मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्य.समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९१** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मे.इंदापूर डेअरी मिल्क ॲण्ड मिल्क प्रोडक्ट, गोखळी हे निविदाप्रक्रियेमधील तृतीय निम्नतम दरधारक असून त्यांचेकडून प्रति क्विंटल रु.३०,९७५/- या दराने संस्थानसाठी आवश्यक असलेले गावरान तुप खरेदी करणे अथवा दुस-या नामांकित गावरान तुप उत्पादक कंपन्यांकडून तुप खरेदी करण्यास परवानगी मिळण्यासाठी व त्याकामी जादा येणारा खर्च मे.अजंता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांचे प्रलंबीत बीलातून अथवा सुरक्षा अनामत रकमेमधून वसुल करणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठासमोर संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत यावा व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक खरेदी विभाग/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.२०** **दान स्वरुपातील अन्न धान्य वस्तू न स्विकारणे व भक्तांचे माहिती करीता तशी जाहिरात प्रसिध्द करणेबाबत**

**प्रस्ताव-** भांडार विभागातील दि.१४.०२.२०१५ रोजीचे टिप्पणीवर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी दि.०३.०३.२०१५ रोजी पुढील तोंडी सुचना दिल्या- कोणतीही खाद्य वस्तू देणगी स्वीकारू नये, त्याकरीता भक्तांना विनंती करुन खाद्य पदार्थाऐवजी दानपेटीत अथवा देणगी काऊंटरवर भक्तांना पैसे जमा करण्यास सांगावे, जेणेकरुन भेसळयुक्त अथवा विषारी पदार्थ भक्तांचे सेवनात जाणार नाहीत व विषबाधेसारखा अनर्थ टळेल.

तसेच दिनांक ०६.०३.२०१५ रोजी सकाळी १०.२० वा. मा.कार्यकारी अधिकारी साहेब भांडार विभागात आलेनंतर त्यांनी भांडार विभागात खाद्य पदार्थ स्वीकारु नयेत अशा तोंडी सुचना दिल्या. मा.माहोदयांच्या निर्देशाप्रमाणे दि.०६.०३.२०१५ रोजीचे मध्यान्होत्तर इकडील विभागाने देणगी स्वरुपातील खाद्य पदार्थ स्वीकारणे बंद केले आहे.

तथापि, पुर्वापार रुढीप्रमाणे पुष्कळ साईभक्त त्यांचे श्रद्धा तथा कुवतीनुसार धान्य, डाळी, तांदुळ तसेच इतर खाद्यपदार्थ आणुन त्या नेहमीप्रमाणे स्विकारणेकरीता विनंती करत आहेत. सदरची देणगी स्वीकारणेस नकार दिल्यास नाराजी व्यक्त करीत आहेत किंवा याबाबत प्रसिद्ध न दिल्याचे कारणांवरून कुरापत काढत आहेत. त्यामुळे भक्तांच्या धार्मिक भावना दुखावल्या जाऊ शकतात.

यापुर्वीही संस्थानने ऑक्टोबर २०१२ मध्ये खाद्य स्वरुपातील देणगी स्विकारणे बंद केले होते. परंतु त्यानंतर दि.१६.१०.२०१२ ते दि.१९.१०.२०१२ या कालावधीत विविध वृत्तपत्रांमध्ये बातम्या येऊन संस्थानचे निर्णयाबाबत सर्व स्तरांमधून नाराजी व्यक्त करण्यात आली होती. त्यानंतर संस्थानने खाद्य स्वरुपातील देणगी स्वीकारणे पुन्हा सुरु केले आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** भक्तांच्या धार्मिक भावना जपण्यासाठी देणगी म्हणून कडधान्ये, तृणधान्ये स्विकारता येतील व तेल, तुप व इतर प्रक्रिया केलेले अन्न पदार्थ स्विकारु नयेत, असे मत आहे.

तरी सदर विषयावर चर्चा होऊन निर्णय होणेस्तव मा.त्रिसदस्यीय समिती सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.९२** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तांच्या धार्मिक भावना जपण्यासाठी देणगी वस्तू स्विकारणेत याव्यात मात्र त्यामधून कडधान्ये, तृणधान्ये वगळता तेल, तुप व इतर प्रक्रिया केलेले सुट्टया स्वरुपातील अन्नपदार्थांची लिलावाद्वारे विक्री करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-. अधिक्षक, भांडार)

---

**विषय नं.२१** **ग्रुप ग्रॅच्युटी योजना (Plan) बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन मंडळ निर्णय क्र.४१८ दि.२२-२३/०९/२००१ अन्वये दिनांक ०१ ऑक्टोबर, २००१ पासुन संस्थान कर्मचा-यांसाठी एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युटी योजना लागु करण्यात आलेली आहे. सदर योजनेचे दरवर्षी ऑक्टोबरच्या पहिल्या आठवडयात नुतनीकरण करण्यात येते. सध्या संस्थान सेवेत साधारणतः २१८२ कायम कर्मचारी आहेत.

संस्थानची आतापर्यंत ग्रुप ग्रॅच्युटी फंडात शिल्लक असलेली रक्कम रु.३७,०५,६४,९६८.०० मात्र इतकी आहे. सदर रक्कम ही संस्थानच्या ग्रुप ग्रॅच्युटी या योजनेमध्ये संस्थानच्या नांवे डिपॉझीट होत असून त्यावर संस्थानला सध्या ८.८५ % या दराने व्याज मिळत आहे. हा संस्थानचा खर्च नसुन सदर रक्कम डिपॉझीट म्हणुन एल.आय.सी.कडे ठेवण्यात येते.

एल.आय.सी. पुणे यांचे पत्रान्वये IRDA च्या नवीन नियमावलीनुसार ग्रॅच्युटीची जुनी योजना(Plan) त्यांनी बंद केलेले आहे. जून्या योजनेचे रुपांतर नवीन योजनेमध्ये करण्यात आलेले आहे. त्यातही त्यांनी पर्याय दिलेला आहे. त्यानुसार आपणास पुर्वीची योजना (Plan) बंद करण्यास सक्ती करण्यात आलेली नाही. तथापि, नवीन कर्मचा-यांसाठी IRDA च्या नवीन नियमावलीनुसार नवीन योजना (Plan)घेणे बंधनकारक असेल असे त्यांनी सुचविले आहे. सोबत एल.आय.सी. ने दिलेले Brief Detail जोडलेले आहे.

त्याकरीता संस्थानच्या जुन्या कर्मचा-यांसाठी सध्या लागू असलेली योजना (Plan) चालू ठेवावी असे वाटते. कारण तिचा व्याजदर ८.८५ % इतका मिळत असुन नवीन योजनोसाठी सध्याचा व्याजदर ८.७५ % हा आहे. परंतु भविष्यात संस्थान सेवेत येणा-या कर्मचा-यांना IRDA च्या नवीन नियमावलीनुसार नवीन ग्रॅच्युटी योजना(Plan) घेणे बंधनकारक आहे.

सबब, जुन्या कर्मचा-यांसाठी पुर्वीचीच योजना (Plan) सुरु ठेवणेकामी व भविष्यात संस्थान सेवेत येणा-या कर्मचा-यांसाठी ग्रॅच्युटीची नवीन योजना (Plan) घेणेकामी मा.त्रिसदस्सीय समितीचे सभेत निर्णय होणेकामी सादर.

**निर्णय क्र.९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ग्रुप ग्रॅच्युटी योजना (Plan) बाबत प्रस्तावित केलेप्रमाणे मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी )

---

**विषय नं.२२** **संस्थानच्या निधीतून करावयाच्या विविध विकास कामाचे प्रस्ताव व त्यांची एकंदरीत अंदाजे किंमत व संस्थानकडे उपलब्ध असलेल्या निधीची सद्यस्थिती पाहून प्राधान्यक्रम ठरविणेबाबत.**

**प्रस्ताव-**

| अ.क्र | विभाग | प्रस्तावित प्रकल्पाचे नाव/ विभाग/<br>प्रस्तावाची सद्यस्थिती/<br>संस्थानसाठी आवश्यकता / उपयोगिता | अंदाजे खर्च<br>रक्कम रु.<br>(चालू दरानुसार) |
|---|---|---|---|
| १ | **पाणीपुरवठा विभाग** | | |
| | 1) | निळवंडे धरणांतून पाणी आरक्षण ठेवण्यापोटी संस्थानने डाव्या कालव्याच्या कामांसाठी पाचशे कोटी निधी शासनास उपलब्ध करून देणेबाबत. | 5,000,000,000 |
| | | 1) जा.नं.एसएसएस/वशी/पाणीपुरवठा/1936 /2014. दि.22 जुलै 2014.<br>2) जा.नं.एसएसएस/वशी/पाणीपुरवठा /2511/2014. दि.21 ऑगस्ट 2014.<br>3) जा.नं.एसएसएस/वशी/पाणीपुरवठा/2867 /2014. दि.12 सप्टेंबर 2014.<br>उपरोक्त पत्रान्वये प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे. शासन मान्यता मिळालेबाबतची प्रत अदयाप इकडील कार्यालयास प्राप्त नाही. | |
| | 2) | शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना शिर्डी शहर विकास कामांकरिता अनुदान देणेबाबत.<br>1) शिर्डी नगरपंचायतच्या नविन साठवण तलावात कागद टाकणेबाबत (Geomembarance Sheet)- अंदाजित 4.00 कोटी निधी<br>2) शिर्डी नगरपंचायतच्या साठवण तलावापर्यत कॅनॉल इनटेक पाण्याची रॉ वॉटर पाईपलाईन टाकणेबाबत. अंदाजित 3.25 कोटी निधी.<br>3) शिर्डी नगरपंचायतच्या जुन्या साठवण तलाव दुरूस्तीसाठी निधी मिळणे बाबत. अंदाजित 2.00 कोटी निधी. | 92,500,000 |
| | | 1) महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग,शासन निर्णय क्र.सासंवि 2014/610/प्र.कं.87/का.सोळा,दि.20 जानेवारी 2015 अन्वये उपरोक्त निधी शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना देण्यास शासनाकडून मान्यता देण्यात येवून त्यानुसार मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेवून पुढील कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. | |
| | 3) | वाढीव शिर्डी संस्थान,पिंपळवाडी व कनकुरी संयुक्त पाणी पुरवठा योजना ता.राहाता जि.अहमदनगर योजनेबाबत. | 3,808,600,000 |
| | | श्री साईबाबा संस्थान, शिर्डी करीता पाणीपुरवठा करण्यासाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन प्रस्तावित योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे इ.कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फेत तयार करण्यात आलेले | |

| अ.क्र | विभाग | प्रस्तावित प्रकल्पाचे नाव/ विभाग/ प्रस्तावाची सद्यस्थिती/ संस्थानसाठी आवश्यकता / उपयोगिता | अंदाजे खर्च रक्कम रु. (चालू दरानुसार) |
|---|---|---|---|
| | | आहेत. सदरचे योजनेस प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्ष मुंबई यांचे जा.नं.मजीप्रा/ मनिसंवस कक्ष/ना-365/58/2014,दि.13/01/2014 अन्वये योजनेची अंदाजपत्रके व आराखडे प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी शिफारशीसह मा.प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय मुंबई योचकडे सादर करण्यात आलेले आहेत. तसेच जा.नं.एसएसएस/ वशी/पाणी पुरवठा /897/2014,दि.22 मे 2014 अन्वये मा.प्रधान सचिव , पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय मुंबई यांना संस्थानकडुन पत्र पाठवुन यो ेजनेस प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे. तसेच,उपरोक्त विषयाबाबत विधी विभागामार्फेत मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठ येथे सिव्हिल ॲप्लिकेशन नं 12346 दाखल करण्यात आलेले असून, याबाबत मा.उच्च न्यायालयाने दि.22/12/2014 रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे सदर योजनेचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेबाबत कळविले आहे. उपरोक्त प्रस्तावास शासनाची मान्यता प्राप्त नाही. | |
| | | श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.01 ऑक्टोबर, 2017 ते 19 ऑक्टोबर, 2018 (विजयादशमी) या कालावधीत साजरे करण्यात येणार आहे.या श्री साईबाबा महाशताब्दी वर्षात लाखो साईभक्त श्री साईंचे महासमाधीचे दर्शनार्थ शिर्डीस भेट देतील.यावेळी साईभक्तांची गैरसोय होवू नये याकरीता सदर योजना सन 2016 पुर्वी पुर्ण होवून कार्यान्वीत होणे गरजेचे आहे. | |
| | 4) | श्री साईबाबा संस्थान,कनकुरी व पिंपळवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजनेतील साठवण तलाव व जलशुध्दीकरण यंत्रणेची क्षमता वाढविणे. | 480,000,000 |
| | | उपरोक्त प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सदरचे विषयास मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठाची मान्यता मिळणेसाठी विधी विभागामार्फेत सिव्हिल ॲप्लीकेशन दाखल करणेबाबतची कार्यवाही चालू आहे. | |
| | | श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.01 ऑक्टोबर, 2017 ते 19 ऑक्टोबर, 2018 (विजयादशमी) या कालावधीत साजरे करण्यात येणार आहे.या श्री साईबाबा महाशताब्दी वर्षात लाखो साईभक्त श्री साईचे महासमाधीचे दर्शनार्थ शिर्डीस भेट देतील.यावेळी साईभक्तांची गैरसोय होवू नये याकरीता सदरचे काम करणे गरजेचे आहे. | |
| | 5) | कनकुरी साठवण तलाव (Geomembrane Sheet) करणेबाबत. | 106,500,000 |
| | | उपरोक्त प्रस्तावाबाबत मा.व्यवस्थापन समिती व मा.उच्च न्यायालये औरंगाबाद खंडपिठाचे निर्णयानुसार ई-निविदा मागविणेबाबतची कार्यवाही चालू आहे. | |
| | | श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.01 ऑक्टोबर, 2017 ते 19 ऑक्टोबर, 2018 (विजयादशमी) या कालावधीत साजरे करण्यात येणार आहे.या श्री साईबाबा महाशताब्दी वर्षात लाखो साईभक्त श्री साईंचे महासमाधीचे दर्शनार्थ शिर्डीस भेट देतील.यावेळी साईभक्तांची गैरसोय होवू नये याकरिता सदरचे काम करणे गरजेचे आहे. | |
| | 6) | पाणी पुरवठा विभागासाठी सन 2014-2015 करीता वार्षिक साहित्य खरेदी करणेबाबत. | 13,223,710 |
| | | उपरोक्त प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सदरचे विषयास मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठाची मान्यता मिळणेसाठी विधी विभागामार्फेत सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल करणेबाबतची कार्यवाही चालु आहे. | |
| | | पाणी वितरणांकरिता टाकण्यात आलेल्या पाईपलाईन,त्यासाठी वापरण्यात आलेले प्लंबीग मटेरिअल,इलेक्ट्रीक मटेरिअल तसेच रूममध्ये बसविण्यात आलेले कॉक हे साईभक्तांचे सततचे वापराने खराब होतात.याकरिता त्यांची | |

| अ.क्र | विभाग | प्रस्तावित प्रकल्पाचे नाव/ विभाग/ प्रस्तावाची सद्यस्थिती/ संस्थानसाठी आवश्यकता / उपयोगिता | अंदाजे खर्च रक्कम रु. (चालू दरानुसार) |
|---|---|---|---|
| | | वारंवार दुरूस्ती करावी लागते अथवा ते बदली करावे लागतात.याकरीता आवश्यक मटेरियलची खरेदी वारंवार करण्यापेक्षा विभागासाठी आवश्यक मटेरिअलची वार्षिक खरेदी करणे आवश्यक आहे.तसेच उत्सवात पाण्याची व्यवस्था करणेकरिता सदर मटेरियलची खरेदी करणे आवश्यक आहे. | |
| ०२ | **बगीचा विभाग** | | |
| | | मंदिर परिसरातील लेंडीबागेचे नुतनीकरण करणे. | 566,850 |
| | | सध्या लेंडीबागेतील लॉन काढून त्या ठिकाणी पोयटा टाकून,सदर पोयटा पसरविणेचे काम चालू आहे. | |
| | | मंदिर परिसरातील लेंडीबाग ब-याच दिवसापुर्वीची असल्याने त्यातील लॉन हि सुकत चालली होती.त्यामुळे सदर बागेचे नुतनीकरण करून ठिकठिकाणी नविन झाडांची लागवड करून परिसर सुशोभित करणे. | |
| ०३ | **वाहन विभाग** | | |
| | 1) | नविन ब्लड डोनेशन व्हॅन खरेदी करणे (वाहन विभाग) | 3,000,000 |
| | | ई निविदा मागविणे बाबतचे कार्यवाही चालु आहे. | |
| | | रक्तदान शिबिरासाठी वाहनात आवश्यक सुविधा (रक्तपेढीच्या मशीन,मोबाईल फ्रिज,डोनर बेड,जनरेटर) उपलब्ध नसलेने रक्त संकलन करणेस अडचणी येतात.दोन्ही हॉस्पीटल कडील रूग्णांना आवश्यक असलेल्या विविध रक्तगटाची गरज,तसेच शिबिराची व रक्तदात्यांची संख्या विचारात घेता श्री साईनाथ रक्तपेढीकरीता मोबाईल ब्लड डोनेशन व्हॅन असणे आवश्यक आहे. | |
| | 2) | नविन वाहनयुक्त हायड्रोलिक लँडर मशिन खरेदी करणे. (विद्युत/वाहन विभाग) | 4,000,000 |
| | | ई निविदा मागविणे बाबतचे कार्यवाही चालु आहे. | |
| | | विद्युत विभागाचे मागणीनुसार 16 मिटर उंचीपर्यत दुरूस्तीचे कामाकरिता तसेच रेस्क्यू ऑपरेशन व वेगवेगळया विभागाच्या कामाकरिता उपयोग करता येईल. | |
| | 3) | केंद्र शासनाच्या निर्देशानुसार संस्थेत सध्या सुरू असलेल्या सर्व ट्रेडचे नविन मांनकानुसार नुतनीकरण करून Quality Council of India यांचेकडून प्रमाणीकरण करून घेणे बंधनकारक केलेले आहे. | 30,000,000 |
| | | यासाठी लागणा-या साहित्य खर्चाचा तपशिल तयार करून मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सध्या सुरू आहे. | |
| | | सध्या सुरू असलेली औ.प्र.संस्था यापुढे चालविणेकामी आवश्यक आहे. | |
| ०४ | **विदयुत विभाग** | | |
| | 1) | साईनगर कडील साईध्यान 01 आणि 02 या स्टाफ क्वाटरचे रिवायरींग करणेबाबत. | 5,273,475 |
| | | मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी प्रस्ताव मिटींग विभागाकडे पाठविण्यात आला आहे. | |
| | | याठिकाणचे वायरींग हे 27 वर्षापुर्वीचे असल्याने व वायरींगची इन्सुलेशन क्षमता कमी झाल्याने संपुर्ण वायरींग काम नविन करणे आवश्यक आहे. | |
| | 2) | आयएसओचे ऑडीटर यांनी सुचविलेल्या साईआश्रम भक्तनिवास मधील प्रत्येक रुमला बाहेरून सप्लाय बंद करणेसाठी दरवाजावर मास्टर स्वीचसह वायरींगचे काम करून घेणे. | 3,566,930 |
| | | मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी प्रस्ताव मिटींग विभागाकडे पाठविण्यात आला आहे. | |
| | | आयएसओ मानांकनाचे ऑडीटर यांनी केलेल्या सुचनाप्रमाणे मास्टर स्विच बसविणेकरीता वायरींग काम करावे लागणार आहे. | |
| | 3) | शिर्डी ते सावळीविहीर पर्यंत स्ट्रीट लाईट उभारणी करणेबाबत. | --- |

| अ.क्र | विभाग | प्रस्तावित प्रकल्पाचे नाव/ विभाग/ प्रस्तावाची सद्यस्थिती/ संस्थानसाठी आवश्यकता / उपयोगिता | अंदाजे खर्च रक्कम रु. (चालू दरानुसार) |
|---|---|---|---|
| | | उपरोक्त प्रस्तावावर दि.31.01.2015 चे मा.त्रिसदस्य समितीचे सभेमध्ये विषय क्र.17 निर्णय क्र.17 सविस्तर चर्चा होऊन शिर्डी ते सावळीविहीर पर्यत स्ट्रीटलाईट उभारणी करणेकामी विद्युत पुरवठा जोडणी खर्च,स्ट्रीट लाईटची येणारी वीज बीले तसेच भविष्यात निघणारे स्ट्रीटलाईट मेन्टेनन्स कोणी करावयाचे याबाबत माहिती घेऊन सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा असे ठरले. | |
| | | सावळीविहीर ग्रामस्थ यांची मागणी व मा.राधाकृष्ण विखे पा.साहेब,विरोधी पक्षनेता, विधानसभा यांची शिफारस आहे. | |
| | 4) | श्री साईनाथ रुग्णालय तसेच द्वारावती भक्तनिवास इमारतीचे वाढीव लोडकरीता ट्रान्सफार्मर, जनरेटर, क्युबीकल, इलेक्ट्रीक पॅनेल व केबल खरेदी करून बसविणेबाबत. | 2,50,86,814/- |
| | | मा.व्यवस्थापन समितीचे दि.15.03.2014 सभेतील विषय क्र.50 निर्णय क्र.229 नुसार सदरील कामास मान्यता देण्यात आली.सदरील कामाचे टेंडर व संबंधीत काम सल्लागार यांचे देखरेखीखाली करून घ्यावयाचे असल्याने सल्लागार नेमणेकरीता प्रस्ताव मान्यतेसाठी मा.त्रिसदस्य समितीसमोर सादर करावा लागणार आहे. | |
| | | वाढीव लोडकरीता सदरील विदयुतीकरणाचे काम करून घ्यावे लागणार आहे. | |
| | 5) | समाधी मंदिर व दर्शन लाईन वातानुकुलीत यंत्रणेला विद्युत पुरवठा करणे असल्याने वाढीव लोडकरीता जनरेटर,ट्रान्सफॉर्मर,इलेक्ट्रीक पॅनेल, केबल, क्युबीकल इ.खरेदी करुन बसविणेबाबत विद्युतीकरणाचे काम करणे. | --- |
| | | सदरील कामाकरीता विदयुत सल्लागार यांची नेमणुक करणेविषयी प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे. | |
| | | वातानकुलीत यंत्रणेचा एकुण 284 के.डब्ल्यु इतका लोड वाढणार असल्याने सदरील विदयुतीकरणाचे काम करून घ्यावे लागणार आहे. | |
| ०५ | **बांधकाम विभाग** | | |
| | 1) | श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील दुस-या टप्पामध्ये 200 खोल्याचे नुतनिकरण करणेबाबत. | 41,032,647 |
| | | सदर प्रकरणांस मान्यता मिळणेसाठी मा.उच्च न्यायालयाकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे. | |
| | | सदर इमारतीमधील खोल्यांना रंगकाम करून सुमारे 10 ते 15 वर्ष झालेले असल्याने सदरचे रंगकाम खराब झालेले असल्याने रंगकाम व इतर दुरूस्ती देखभालीची कामे करणे आवश्यक आहे. | |
| | 2) | साईनगर कर्मचारी वसाहत परिसरात साईनगर, समर्पण व साईध्यान इमारतींचे भोवती पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | 1,431,500 |
| | | सदरहू कामी ई-निविदा मागविणेत आल्या असून प्राप्त निविदांचे Technical Bid उघडणेत आले आहे. | |
| | | सदर इमारतीचे बाजून असेलेले ड्रेनेज लाईन साफसफाई करणे अडचणीचे होत असलेने तसेच तेथे डास व सरपटणाऱ्या प्राण्यांचा प्रादुर्भाव रोखणेसाठी पेव्हिंग ब्लॉक बसविणे आवश्यक आहे. | |
| | 3) | संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व द्वारावती भक्तनिवास इमारतीचे मेन गेट वर प्रवेशद्वार व सुरक्षा केबीन चे बांधकाम करणे. | 1,337,574 |
| | | सदर प्रकरणास मान्यता मिळविणेसाठी मा. उच्च न्यायालयाकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे. | |
| | | सदर इमारतीचे संरक्षणाचे दृष्टीने प्रवेशद्वार उभारणे आवश्यक आहे. | |
| | 4) | श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयाच्या इमारतीस रंगकाम करणे व संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. | 1,242,775 |
| | | सदरहू कामी ई-निविदा मागविणेत आल्या असून प्राप्त निविदांचे Technical Bid उघडणेत आले आहे. | |

| अ.क्र | विभाग | प्रस्तावित प्रकल्पाचे नाव/ विभाग/ प्रस्तावाची सद्यस्थिती/ संस्थानसाठी आवश्यकता / उपयोगिता | अंदाजे खर्च रक्कम रु. (चालू दरानुसार) |
|---|---|---|---|
| | | सदर इमारतीस रंगकाम करुन सुमारे 30 ते 32 वर्ष झालेली असल्याने इमारत स्वच्छ व सुंदर दिसणेकामी रंगकाम करणे आवश्यक आहे. तसेच संरक्षणाच्या दृष्टीने संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे आवश्यक आहे. | |
| | **5)** | श्री साईबाबा मल्टिमिडीया थिमपार्क प्रकल्पांतर्गत लेजर शो प्रकल्पाकरिता आवश्यक सिव्हील वर्क करणेचे कामासाठी नव्याने निविदा मागविणे बाबत. | 465,500,000 |
| | | सदर प्रकरणास मान्यता मिळविणेसाठी मा. उच्च न्यायालयाकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे. | |
| | | श्रीसाईबाबांच्या विचारांचा प्रचार व प्रसार होणेसाठी तसेच साईभक्तांचे मनोरंजनासाठी शिर्डी येथे सुविधा निर्माण करणेसाठी. | |
| | **6)** | श्री साईनाथ रुग्णालयातील एम.एस. खिडक्यांऐवजी ॲल्युमिनियम स्लायडिंग विंडो बसविणे. | 2,083,000 |
| | | सदरहू कामी ई-निविदा मागविणेत आल्या असून प्राप्त निविदांचे Technical Bid उघडणेत आले आहे. | |
| | | रुग्णालयातील रुग्णांना डासांचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून व सुरक्षिततेच्या दृष्टीने ॲल्युमिनियम खिडक्या बसविणे आवश्यक आहे. | |
| | **7)** | द्वारावती भक्तनिवास इमारतीचे आतील भागास रंगकाम करणे. | 8,263,553 |
| | | सदरहु प्रकरणी निविदा सुचना प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही चालू | |
| | | सदर इमारतीचे रंगकाम खराब झालेले असल्याने, रंगकाम करणे आवश्यक आहे. | |
| | **8)** | श्री साईनाथ रुग्णालय आतील भागास रंगकाम करणे | 3,032,419 |
| | | सदरहु प्रकरणी निविदा सुचना प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही चालू | |
| | | सदर इमारतीचे रंगकाम खराब झालेले असल्याने, रंगकाम करणे आवश्यक आहे. | |
| | **9)** | शैक्षणिक संकूल इमारतीचे आतील भागास रंगकाम करणे | 1,709,314 |
| | | सदरहु प्रकरणी निविदा सुचना प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही चालू | |
| | | सदर इमारतीचे रंगकाम खराब झालेले असल्याने, रंगकाम करणे आवश्यक आहे. | |
| | **10)** | लेजर व्हिजन लि.हॉगकॉग यांचे 3355000 US$ चे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | 208,010,000 |
| | | सदर प्रकरणांस मान्यता मिळणेसाठी मा.उच्च न्यायालयाकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे. | |
| | | श्री साईबाबांच्या विचारांचा प्रचार व प्रसार होणेसाठी तसेच साईभक्तांचे मनोरंजनासाठी शिर्डी येथे सुविधा निर्माण करणेसाठी. | |
| | | श्री साईबाबांच्या विचारांचा प्रचार व प्रसार होणेसाठी तसेच साईभक्तांचे मनोरंजनासाठी शिर्डी येथे सुविधा निर्माण करणेसाठी. | |
| | **11)** | मौजे शिर्डी येथील अंतर्गत रस्ते विकसीत करणेकामी भूसंपादन व इतर खर्चाकामी रक्कम रू.111.545 कोटी खर्चास मान्यता मिळणेबाबत. | 1,115,450,000 |
| | | सदर प्रकरणांस मान्यता मिळणेसाठी मा.उच्च न्यायालयाकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे. | |
| | | शिर्डी शहरातील वाहतुकीचे दृष्टीने नियोजन करणेचे दृष्टीने तसेच शिर्डी नगरपंचायत ,शिर्डी यांचे विनंतीनुसार रस्ते विकसीत करणे आवश्यक आहे. | |
| | **12)** | अधिकारी निवासस्थानातील 43 सदनिकांमध्ये किचन ट्रॉली तसेच पोटमाळयावरील भागात व कडप्पामध्ये असलेल्या कपाटांना प्लायवुड लॅमिनेट वापरून झडपा करणेबाबत. | 3,924,270 |
| | | सदर प्रकरणांस मान्यता मिळालेली असून ,सल्लागार नियुक्तीबाबत कार्यवाही करणेत येत आहे. | |
| | | सदर सदनिका हया वर्ग 01 व 02 असलेने सदरचे सदनिकेमध्ये कपाटांना प्लायवुड लॅमिनेट वापरून झडपा करणे आवश्यक आहे. | |
| | **13)** | संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील जमीनींचे भोवती कुंपन करणेबाबत. | 2,695,000 |

| अ.क्र | विभाग | प्रस्तावित प्रकल्पाचे नाव/ विभाग/<br>प्रस्तावाची सद्यस्थिती/<br>संस्थानसाठी आवश्यकता / उपयोगिता | अंदाजे खर्च<br>रक्कम रु.<br>(चालू दरानुसार) |
|---|---|---|---|
| | | सदर प्रकरणांस मान्यता मिळणेसाठी मा.उच्च न्यायालयाकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे. | |
| | | संस्थान मालमत्तेचे संरक्षणाचे दृष्टीने सदरहू जमिनीचे कडेने कुंपन करणे आवश्यक आहे. | |
| | 14) | द्वारावती भक्तनिवास समोरील गार्डनमध्ये पेव्हिंग ब्लॉक बसवून रस्ता (पाथवे) तयार करणेबाबत. | 1,229,900 |
| | | सदर प्रकरणांस मान्यता मिळणेसाठी मा.उच्च न्यायालयाकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे. | |
| | | सदर गार्डनमध्ये साईभक्त व स्थानिक नागरिक मो्ठया प्रमाणावर येत असलेने बगीचाचे संरक्षणाचे दृष्टीने गार्डनमध्ये पेव्हिंग ब्लॉक बसवून रस्ता (पाथवे ) तयार करणे. | |
| | 15) | श्री साईनाथ रूग्णालय परिसरातील कॅन्टीनची इमारत रूग्णालयाचे वाढीव सोयी सुविधेसाठी उपलब्ध करून जनरेटर कक्षा समोरील जागेत उपहारगृह उभारणेबाबत. | 1,890,000 |
| | | सदर प्रकरणांस मान्यता मिळणेसाठी मा.उच्च न्यायालयाकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे. | |
| | | सदरहू कॅन्टीन इमारत श्री साईनाथ रूग्णालयचे वाढीव वापरासाठी करावयाची असल्याने कॅन्टीनसाठी शेड करणे आवश्यक आहे. | |
| | 16) | शिर्डी येथे विमानतळ उभारणेकामी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित,मुंबई यांना अर्थसहाय्य करणेबाबत. | 50,000,000 |
| | | सदर प्रकरणांस मान्यता मिळणेसाठी मा.उच्च न्यायालयाकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे. | |
| | | महाराष्ट्र शासनाने दि.24/06/2011 रोजी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना रू 50 कोटी इतके सहायक अनुदान देणेबाबत आदेश दिलेले आहे.सदर आदेशास अनुसरून उर्वरीत रक्कम रू.5 कोटी देणे. | |
| | 17) | द्वितीय प्राधान्य गटातील 17 रस्ते विकसीत करणे. | 470,200,000 |
| | | सदर प्रकरणांस मान्यता मिळणेसाठी मा.उच्च न्यायालयाकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे. | |
| | | शिर्डी शहरातील वाहतुकीचे दृष्टीने तसेच स्थानिक नागरिकांचे वापराचे दृष्टीने तसेच शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे विनंतीनुसार रस्ते विकसीत करणे आवश्यक आहे. | |
| | 18) | विद्युत विभागांसाठी द्वारावती/साईनाथ रुग्णालय परिसरात जनरेटर रूमचे बांधकाम करणे. | 4,000,000 |
| | | विद्युत विभागाने त्यांचे स्तरावर जागेची निवड केलेली असल्याने सदर जागेवर कॅन्टीन शेडसाठी मान्यता घेणेत येत आहे. | |
| | | सदर भागातील उच्च दाबाचा विदयुत पुरवठा करणेसाठी जनरेटर रूमचे बांधकाम करणे. | |
| | 19) | साईनाथ रूग्णालय दक्षिण बाजूकडील संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. | 900,000 |
| | | सदरहू कामी येणारे खर्चास दि.30/01/2015 रोजीचे सभेत मान्यता देणेत आली आहे.सदर कामासाठी निविदा सूचना प्रसिध्द करणेची कार्यवाही करणेत येत आहे. | |
| | | संस्थान मालमत्तेचे संरक्षणाचे दृष्टीने सदरहू सरंक्षक भिंतीचे बांधकाम करणे आवश्यक आहे. | |
| | 20) | संस्थानकडे नियुक्त असलेले उप कार्यकारी अधिकारी यांचेकरिता निवासस्थानचे बांधकाम करणे. | 4,059,316 |
| | | सदर प्रकरणांस मान्यता मिळणेसाठी मा.उच्च न्यायालयाकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे. | |
| | | मा.उपकार्यकारी अधिकारी यांचेकरिता स्वतंत्र निवासस्थानची व्यवस्था नसलेने सदरचे बांधकाम करणे आवश्यक आहे. | |

| अ.क्र | विभाग | प्रस्तावित प्रकल्पाचे नाव/ विभाग/<br>प्रस्तावाची सद्यस्थिती/<br>संस्थानसाठी आवश्यकता / उपयोगिता | अंदाजे खर्च<br>रक्कम रु.<br>(चालू दरानुसार) |
|---|---|---|---|
| | 21) | श्री साईबाबा हॉस्पीटल इमारतीचे आतिल भागास रंगकाम करणे. | 821,507 |
| | | दि.30/1/2015 रोजीचे सभेतील निर्णयानुसार निम्नतम दराचे ठेकेदार सौरव डेकोरेटर्स,पुणे यांना कार्यादेश देणेत येत आहे. | |
| | | सदर इमारतींचे रंगकाम खराब झालेले असल्याने रंगकाम करणे आवश्यक आहे. | |
| | 22) | श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटल कडील STP साठी O&M करणे. | 780,000 |
| | | दि.30/1/2015 रोजीचे सभेतील निर्णयानुसार निम्नतम दराचे ठेकेदार यश एनव्हायरो,पुणे यांना कार्यादेश देणेत येत आहे. | |
| | | रूग्णालयाचे ऑथोरायझेशनचे दृष्टीने सदर प्रकल्प कार्यान्वीत ठेवणे आवश्यक आहे. | |
| | 23) | श्री साईबाबा भक्तनिवास इमारतीचे पूर्व व पश्चिमेकडील भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | 686,326 |
| | | दि.30/1/2015 रोजीचे सभेतील निर्णयानुसार निम्नतम दराचे ठेकेदार अे.एस.कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांना कार्यादेश देणेत येत आहे. | |
| | | श्री साईबाबा भक्तनिवास इमारतीचे बाजूने पावसाळयाचे दिवसात चिखल होतो.तसेच खोल्यांमध्ये मोठया प्रमाणात धुळही येत असल्याने सदर इमारतीचे कडेने पेव्हिंग ब्लॉक बसविणे आवश्यक आह. | |
| | 24) | द्वारावती साईबाबा भक्तनिवास इमारतेचे पूर्व व पश्चिमेकडील भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | 693,611 |
| | | दि.30/1/2015 रोजीचे सभेतील निर्णयानुसार निम्नतम दराचे ठेकेदार अे.एस.कन्स्ट्रक्शन,औरंगाबाद यांना कार्यादेश देणेत येत आहे. | |
| | | सदर परिसर सर्वत्र पेव्हिंग ब्लॉक बसविणेत आलेले असून उर्वरीत भाग स्वच्छ दिसावा यासाठी पेव्हिंग ब्लॉक बसविणे आवश्यक आहे. | |
| | 25) | सर्व्हे नं.124 पैकी मध्ये नवीन भांडार इमारतीचे बांधकाम करणे व इतर अनुषंगीक कामे करणे. | 85,000,000 |
| | | सदरहू जमिनीचे बिनशेतीबाबत मालमत्ता विभागामार्फेत कार्यवाही करणेत येत आहे. | |
| | | भांडार विभागाची मालाची साठवण क्षमता वाढविणेसाठी नविन भांडार इमारतीचे बांधकाम करणे आवश्यक आहे. | |
| | 26) | संस्थानचे मुसळगांव ता.सिन्नर येथील पालखी थांब्याचे नुतनिकरण व परिसर विकसीत करणे. | 927,876 |
| | | दि.30/1/2015 रोजीचे सभेतील निर्णयानुसार याकामी निविदा मागविणेची कार्यवाही करणेत येत आहे. | |
| | | शेडचे बाजूने पत्रे नसल्याने पावसाचे पाणी आत येऊन भाविकांची गैरसोय टाळणेसाठी तसेच परिसर साफसफाई करणेचे दृष्टीने परिसर विकास करणे आवश्यक आहे. | |
| | 27) | निमगांव को-हाळे हद्दीतील चर रस्ता नगर मनमाड ते गोदावरी उजवा कालवा गट नं.221 व 45 पर्यंतच्या रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | 3,629,080 |
| | | सदर प्रकरणास मान्यता मिळविणेसाठी मा. उच्च न्यायालयाकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे. | |
| | | सदर चर रस्तालगत संस्थानचे गट नं.172,169 पैकी 218,221,245,249 असे एकुण 06 प्लॉट आहे.सदरचे पलॉटमध्ये जाणेसाठी चर रस्ताचा वापर करावा लागत असल्याने,सदर रस्ताचा विकास करणे आवश्यक आहे. | |
| | 28) | लाडू विक्री काऊंटरसाठी 4 बंदीस्त केबीन्स व कॉम्प्युटर टेबल तयार करणे. | 416,840 |
| | | दि.09/02/2015 रोजीचे सभेत प्राप्त निविदा उघडणेत आल्या आहेत.अदयाप निर्णय प्राप्त झालेला नाही. | |
| | | लाडू विक्री काउंटरसाठी संगणक प्रणाली तयार करणेत आलेली असून साईभक्तांना संगणकाद्वारे तिकीट विक्री करून लाडू प्रसाद देणेचे नियोजन असल्याने केबीन्स व टेबल तयार करणे आवश्यक आहे. | |

| अ.क्र | विभाग | प्रस्तावित प्रकल्पाचे नाव/ विभाग/ प्रस्तावाची सद्यस्थिती/ संस्थानसाठी आवश्यकता / उपयोगिता | अंदाजे खर्च रक्कम रु. (चालू दरानुसार) |
|---|---|---|---|
| | 29) | फोटो व पुस्तके विक्री काऊंटरला वाढीव ऍ़ल्युमिनीअम पार्टीशन व संगणक काऊंटर तयार करणे. | 187,410 |
| | | दि.09/02/2015 रोजीचे सभेत प्राप्त निविदा उघडणेत आल्या आहेत.अदयाप निर्णय प्राप्त झालेला नाही. | |
| | | मंदिर परिसरातील फोटो व पुस्तक विक्री कांऊटरवर संगणकांचा वापर करावयाचा असल्याने सदरहू काम करणे आवश्यक आहे. | |
| | 30) | संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.169 मधील कर्मचारी निवासस्थान इमारतीचे सांडपाणी व्यवस्थापनाबाबत. | 3,394,072 |
| | | सदर प्रकरणांस मा.उच्च न्यायालयाची परवानगी मिळालेली असून, नगरपालीका हद्दीपर्यंत मिळालेली आहे. | |
| | | सदरचे वसाहतीमधील सांडपाणी नाल्यात उघडयावर सोडलेले असल्याने, कर्मचारी वसाहत व साई आश्रम भाग 02 येथे दुर्गंधी पसरून डासांचे प्रमाण वाढल्यामुळे आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने, त्यासाठी सांडपाणी व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. | |
| | 31) | नियोजित दर्शन रांग इमारत बांधकाम व मंदिर परिसर पुनर्विकास करणे. | 3,690,000,000 |
| | | सदरहू कामी येणारे खर्चास मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालयात सादर करणेत आला आहे. | |
| | | साईभक्तांना वाढीव सोयी सुविधा देणेसाठी दर्शन रांगेचे व मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पाचे काम हाती घेणे आवश्यक आहे. | |
| | 32) | मौजे निमगाव को-हौळे येथील साईधर्मशाळा परिसरात साईभक्तांना श्री ची पालखी ठेवणेसाठी शेड बांधणे. | 5,900,000 |
| | | सदरहू कामी येणारे खर्चास मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करणेत येत आहे. | |
| | | साईभक्तांना श्रींची पालखी ठेवणेसाठी शेडचे बांधकाम करणे आवश्यक आहे. | |
| | 33) | संस्थानचे हेलीपॅड भोवती पेव्हिंग ब्लॉक व वेटींग लॉजची दुरूस्ती करणे. | 1,535,870 |
| | | सदरहू कामी येणारे खर्चास मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालयात सादर करणेत आला आहे. | |
| | | व्ही.व्ही.आय.पी.साईभक्तांचे सोयीसाठी हेलीपॅड परिसरात सदर कामे करणे आवश्यक आहे. | |
| | 34) | श्री साई प्रसादालय येथे क्लोक रूमची व्यवस्था करणे. | 223,726 |
| | | सदरहू कामी येणारे खर्चास मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करणेत येत आहे. | |
| | | साईभक्तांना वाढीव सोयी सुविधा देणेसाठी क्लोक रूमची व्यवस्था करणे आवश्यक आहे. | |
| | 35) | वर्ग 04 कर्मचारी निवासस्थाने पाठीमागील कम्पांउड लगत पेव्हिंग ब्लॉक बसविणेबाबत. | 927,586 |
| | | सदरहू कामी निविदा मागविणेची कार्यवाही करणेत येत आहे. | |
| | | कर्मचारी निवासस्थान भोवतालचा परिसर स्वच्छतेच्या दृष्टीने सदर भागात पव्हिंग ब्लॉक बसविणे आवश्यक आहे. | |
| | 36) | श्री साई प्रसादालय परिसरात प्रकाशने विभागासाठी नविन काउंटर करणे. | 225,000 |
| | | सदरहू कामी निविदा मागविणेची कार्यवाही करणेत येत आहे. | |
| | | साईभक्तांना वाढीव सोयी सुविधा देणेसाठी नवीन कांउटर व्यवस्था करणे आवश्यक आहे. | |
| | 37) | मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.183 मध्ये नियोजित शैक्षणिक संकुल इमारत उभारणे. | 720,722,528 |
| | | सदरहू कामी येणारे खर्चास मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालयात सादर करणेत आला आहे. | |
| | | सुसज्ज असे शेक्षणिक संकुल उभारणेसाठी. | |

| अ.क्र | विभाग | प्रस्तावित प्रकल्पाचे नाव/ विभाग/ प्रस्तावाची सद्यस्थिती/ संस्थानसाठी आवश्यकता / उपयोगिता | अंदाजे खर्च रक्कम रु. (चालू दरानुसार) |
|---|---|---|---|
| | 38) | संस्थानचे शिर्डी येथील सर्व्हे नं.54,55,125 व मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.87,88 येथे टॉयलेटचे बांधकाम करणे. | 884,911 |
| | | ठेकेदार श्री बी.पी.शिंदे ,पढेगांव यांना दि.22/03/2014 रोजी कार्यादेश देणेत आला आहे.तथापि ठेकेदार यांनी अदयाप कामास सुरूवात केलेली नाही.याबाबत ठेकेदार यांना कार्यमुक्त करणेबाबत प्रस्ताव सादर करणेत येत आहे. | |
| | | सदर ठिकाणी गर्दीचे कालावधीमध्ये पार्किंगची व्यवस्था करणेत येत असते.तेथे टॉयलेटची व्यवस्था नसल्याने सदर टॉयलेटचे बांधकाम करणे आवश्यक आहे. | |
| | 39) | साई आश्रम भक्तनिवास येथील ॲम्पीथिएटरच्या पूर्व बाजूचे मोकळया जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | 927,960 |
| | | सदर कामी येणारे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दि.30/01/2015 रोजीचे सभेत मान्यता मिळालेली आहे.सदर कामासाठी निविदा सुचना प्रसिध्द करणेची कार्यवाही करणेत येत आहे. | |
| | | सदर ठिकाणी चहाचे कप, पाण्याच्या बाटल्या व कचरा टाकण्यात येत असतो त्यामुळे तो परिसर अस्वच्छ दिसतो.त्यामुळे सदर ठिकाणी पेव्हिंग ब्लॉक बसविणे आवश्यक आहे. | |
| | 40) | साई आश्रम भक्तनिवास येथील परिसरात कर्मचा-यांचे दुचाकी वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था करणे. | 2,628,450 |
| | | सदर प्रकरणास मान्यता मिळविणेसाठी मा. उच्च न्यायालयाकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे. | |
| | | साई आश्रम भक्तनिवास येथे येणारे साई भक्त व कर्मचारी यांचे दुचाकी वाहने पार्किंगसाठी सोय नसल्याने सदरचे काम करणे आवश्यक आहे. | |
| | 41) | साई आश्रम भाग 02 येथील डॉरमेटरी हॉल्स करीता लॉकर्स खरेदी करणे. | 6,364,800 |
| | | दि.12/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र.454 नुसार सदरचे लॉकर्स देणगी दाखल मिळणेकामी मुख्यलेखाधिकारी व जनसंपर्क अधिकारी यांना दि.16/08/2014 रोजी कळविण्यात आले आहे. | |
| | | साई आश्रम भाग 02 येथे हॉल्स असल्याने साईभक्तांचे लगेज व इतर किमती साहित्य ठेवणेसाठी लॉकर्सची आवश्यकता आहे.त्यामुळे सदर कामी 576 युनिट लॉकर्स खरेदी आवश्यक आहे. | |
| | 42) | साई आश्रम भाग 02 येथील डॉरमेटरी हॉल्स करीता बेड खरेदी करणे. | 7,726,320 |
| | | सदर कामी पुरवठादार समर स्टील इंडस्ट्रीज,जळगांव यांना पुरवठा आदेश देणेत आला आहे. | |
| | | साईभक्तांचे सोयीसाठी डॉरमेटरी हॉलमध्ये कॉट (बेड) नसल्याने सदरचे बेड खरेदी करणे आवश्यक आहे. | |
| | 43) | साईबाबा हॉस्पीटल ICCU वार्ड करीता बेडची संख्या वाढविणे. | 294,529 |
| | | सदर कामी ठेकेदार श्री संजय गणपत गायकवाड,राहाता यांना दि.13/11/2014 रोजी कार्यादेश देणेत आला आहे. | |
| | | श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये ICCU बेडची संख्या अपुरी पडत असल्याने , आर्थो रिकव्हरी रूम व मायनर ओटी एकत्र करून तसेच न्युरो ओटी रिकव्हरी रूममध्ये नुतनिकरण करून 10 ते 12 बेड करीता वाढीव बांधकाम करणेत येत आहे. | |
| | 44) | साईबाबा भक्तनिवास व शैक्षणिक संकुल परिसरात रेन वॉटर हार्वेस्टीग प्रकल्प राबविणेबाबत. | 881,997 |
| | | सदरहू कामी ठेकेदार संजय गायकवाड,राहाता यांना कार्यादेश देणेत आला आहे.ठेकेदार यांनी सदरचे काम दि.23/02/2015 रोजी पुर्ण केले आहे. | |
| | | रेन वॉटर हार्वेस्टींगचे माध्यमातून पावसाचे पाणी जमिनीमध्ये जिरवून भू-जल पातळी वाढविणे प्रस्तावित आहे.त्यामुळे सदर प्रकल्प हाती घेणेत आला आहे.तसेच सदर प्रकल्पामुळे इमारतीचे मालमत्ता करामध्ये 2% सुट नगरपंचायत यांचेकडून मिळणार आहे. | |

| अ.क्र | विभाग | प्रस्तावित प्रकल्पाचे नाव/ विभाग/ प्रस्तावाची सद्यस्थिती/ संस्थानसाठी आवश्यकता / उपयोगिता | अंदाजे खर्च रक्कम रु. (चालू दरानुसार) |
|---|---|---|---|
| | 45) | साई धर्मशाळा येथे साई भक्ताकरीता बस वेटींग शेडचे बांधकाम करणे. | 751,000 |
| | | ठेकेदार अथर्व ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद यांना दि.29/11/2014 रोजी कार्यादेश देणेत आला आहे. | |
| | | साईधर्मशाळा परिसरातून साईभक्तंना मंदिर परिसरामध्ये ने आण करणेसाठी बस व्यवस्था करणेत आलेली आहे.सदर बसेससाठी बस थांबा करणेत येत आहे. | |
| | 46) | साई आश्रम भक्तनिवास येथे साईभक्तांकरिता बस वेटींग शेडचे बांधकाम करणे. | 751,000 |
| | | ठेकेदार अथर्व ट्रेडींग कंपनी,औरंगाबाद यांना दि.29/11/2014 रोजी कार्यादेश देणेत आला आहे. | |
| | | साईआश्रम भक्तनिवास परिसरातून साईभक्तांना मंदिर परिसरामध्ये ने आण करणेसाठी बस व्यवस्था करणेत आलेली आहे.सदर बसेससाठी बस थांबा करणेत येत आहे. | |
| | 47) | साई भक्तांचे सोयीसाठी नगर-मनमाड रोड,साईनगर रेल्वे स्टेशन येथे साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी दिशादर्शक बोर्ड बसविणे. | 400,000 |
| | | याकामी फेर निविदा मागविणेचा प्रस्ताव सादर करणेत आला आहे. | |
| | | साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी शिर्डी रेल्वे स्टेशन व नगर-मनमाड रस्ताचे बाजूला विविध ठिकाणी भक्तनिवास व इतर इमारतींचे माहितीचे बोर्ड तयार करून बसविणे आवश्यक आहे. | |
| | 48) | साई आश्रम भक्तनिवास येथे साई भक्तांकरीता उपहारगृहाचे बांधकाम करणे. | 4,842,000 |
| | | सदर कामी येणारे खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.उच्च न्यायालयात सादर करणेत येत आहे. | |
| | | साई आश्रम परिसर हा विस्तीर्ण स्वरूपाचा आहे.तेथे साई भक्तांचे सोयीसाठी दोन ठिकाणी उपहारगृहाची उभारणी करणे आवश्यक आहे. | |
| | 49) | मौजे नांदुर्खी येथे नियोजित सुपर स्पेशालीटी रुग्णालयाचे बांधकाम करणे. | 2,450,000,000 |
| | | मौजे नांदुर्खी बु.येथील 15 हेक्टर 60 आर. जमिन नांदुर्खी ग्रामपंचायतीने संस्थानला सुसज्ज व अदयावत रुग्णालय उभारणेसाठी विनामुल्य उपलब्ध करून देणबाबत ठराव करून दिलेला आहे.सदर जमिनीचे कागदोपत्री संस्थानचे नांव लावणेबाबतची कार्यवाही मा.जिल्हाधिकारी व मा.आयुक्त, नाशिक यांचेमार्फेत चालू आहे. | |
| | | शिर्डी येथे संस्थानचे दोन रूग्णालय कार्यरत असून रूग्णांची संख्या मोठया प्रमाणात असल्याने सदर रुग्णालये कमी पडत असल्याने ,मौजे नांदुर्खी येथे विनामुल्य मिळणा-या क्षेत्रावर सुमारे 600 बेडचे सुसज्ज रुग्णालय उभारणेचा मानस आहे. | |
| ०६ | **माहिती तंत्रज्ञान विभाग** | | |
| | | साईटेक कार्यप्रणाली. | 210,000,000 |
| | | एकुण 37 कार्यप्रणाली पैकी 33 कार्यप्रणाली सुरू आहे.उर्वरीत चार अंतिम टप्यात आहेत. | |
| | | सदर प्रकल्पामुळे कार्यालयीन कामकाज संगणीकृत करण्यात येत आहे.त्याद्वारे व्यवस्थापनास आवश्यक ती माहिती उपलब्ध करून देणे शक्य आहे.ऑनलाईन द्वारे भक्तांना दर्शनपास व रूम बुकींग उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.आज अखेर 29,63,491 भक्तांनी कार्यप्रणाली मार्फेत सेवांचा लाभ घेतला आहे.त्याद्वारे 68,78,33,540/-रूपये संस्थान खाती जमा झाले आहे. | |
| ०७ | **प्रसादालय विभाग** | निरंक | निरंक |
| ०८ | **संरक्षण विभाग** | | |
| | | कुंभमेळा व शताब्दी वर्षाच्या निमित्ताने विविध विभागांकडे बसविण्याचे साहित्य खरेदी करणेबाबत. | 281,604,400 |
| | | सी सी टी व्ही कक्षामार्फेत कार्यवाही चालू आहे. | |

| अ.क्र | विभाग | प्रस्तावित प्रकल्पाचे नाव/ विभाग/ प्रस्तावाची सद्यस्थिती/ संस्थानसाठी आवश्यकता / उपयोगिता | अंदाजे खर्च रक्कम रु. (चालू दरानुसार) |
|---|---|---|---|
| | | सदर साहित्य सुरक्षिततेच्या दृष्टीने संस्थानचे विविध ठिकाणी बसविणे साईभक्तांची तपासणी करणे यासाठी वापरण्यात येणार असल्याने त्याचा संस्थानसाठी उपयोग होणार आहे. | |
| ०९ | | **सीसीटिव्ही कंट्रोल** | |
| | 1) | मंदिर परीसर,द्वारावती व साई प्रसादालय येथे सीसीटीव्ही सुरक्षा यंत्रणा विकसीत करणेबाबत.विषय नं.15 व निर्णय क्र.15 | 53,200,000 |
| | | सदरचा विषय दि.30/01/2015 रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत आलेला असून,मा.व्यवस्थापन समितीने सदर प्रस्तावास व येणा-या खर्चास तत्वत:मान्यता दिलेली आहे.त्यामुळे सदरचा प्रस्ताव व खर्चाचे मान्यतेस्तव मा.उच्च न्यायालय खंडपीठ,औरंगाबाद यांचेसमोर विधी विभागा मार्फेत सादर करणेकामी देण्यात आलेला आहे. | |
| | | मंदिर व परिसरातील सुरक्षेच्या दृष्टीने. | |
| | 2) | साईबाबा भक्तनिवासस्थान व साई आश्रम भक्तनिवास येथे सीसीटीव्ही सुरक्षा यंत्रणा विकसीत करणेबाबत.विषय नं.16 विकसीत करणेबाबत. विषय नं.16 व निर्णय क्र.16 | 75,200,000 |
| | | सदरचा विषय दि.30/01/2015 रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत आलेला असून,मा.व्यवस्थापन समितीने सदर प्रस्तावास व येणा-या खर्चास तत्वत:मान्यता दिलेली आहे.त्यामुळे सदरचा प्रस्ताव व खर्चाचे मान्यतेस्तव मा.उच्च न्यायालय खंडपीठ,औरंगाबाद यांचेसमोर विधी विभागामार्फेत सादर करणेकामी देण्यात आलेला आहे. | |
| | | श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे तसेच सदर विभागांचे सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन. | |
| | 3) | कुंभमेळा -2015 चे कालावधीत संभाव्य गर्दीच्या काळात बनविलेल्या अतिरिक्त दर्शन रांगेत महत्वाचे ठिकाणी सीसीटीव्ही कॅमरे भाडेतत्वावर बसविणे. | 4,200,000 |
| | | बांधकाम विभागामार्फेत मंडप व्यवस्थेचे काम पुर्ण झालेवर सदर ठिकाणी 15 दिवसांचे आंत सीसीटीव्ही कॅमरे बसविणेबाबत कार्यवाही पुर्ण केली जाईल. | |
| | | जा.क्र.एसएसएसटी/कुंभमेळा-शताब्दी/4849/2015, दि.17/01/2015 व जा.क्र.एसएसएसटी /कुंभमेळा-शताब्दी/5151/2015, दि.17/01/2015 अन्वये. | |
| | 4) | वाढीव देर्शन रांगेत ठिकठिकाणी डिजीटल लार्ज स्क्रीन बसविणे.(एकूण 13 ठिकाणी) | 2,400,000 |
| | | बांधकाम विभागामार्फेत वॉटरप्रुफ मंडप व्यवस्था झालेनंतर 04 दिवसांत डीजीटल स्क्रीन बसविण्यात येतील. | |
| | | जा.क्र.एसएसएसटी/कुंभमेळा-शताब्दी/4849/2015, दि.17/01/2015 व जा.क्र.एसएसएसटी /कुंभमेळा-शताब्दी/5151/2015, दि.17/01/2015 अन्वये. | |
| | 5) | कुंभमेळा-2015 व शताब्दी महोत्सव-2018 करीता गर्दीवर नियंत्रण ठेवणेकामी तसेच मंदिर परीसर व संस्थानचे विविध विभागांसाठी साईभक्तांचे सुरक्षितेसाठी सुरक्षा साहित्य व उपकरणे खरेदी करणे. | 149,070,000 |
| | | सदर प्रस्तावाबत कार्यवाही चालु आहे. | |
| | | बॉम्ब शोधक व नाशक पथक,शिर्डी यांचे जा.क्र.बीडीडीएस/ सीसीटीव्ही/ साहित्य/13/2015, दि.17/01/2015 रोजीचे पत्रान्वये. | |
| | 6) | संस्थानचे शैक्षणिक संकुलाकडील (इं.मि.स्कुल,कन्या विद्या मंदिर व आय.टी.आय.) विभागांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वीत करणे. | 3,000,000 |
| | | सदर प्रस्तावाबत कार्यवाही चालु आहे. | |
| | | शैक्षणिक संकुलाकडील दि.05/02/2015 रोजीचे मंजुर टिपणी व मागणीनुसार. | |

| अ.क्र | विभाग | प्रस्तावित प्रकल्पाचे नाव/ विभाग/ प्रस्तावाची सद्यस्थिती/ संस्थानसाठी आवश्यकता / उपयोगिता | अंदाजे खर्च रक्कम रु. (चालू दरानुसार) |
|---|---|---|---|
| १० | मालमत्ता विभाग | | |
| | 1) | आरक्षण क्र.39 (एलएक्यु/एसआर/16/2000,शिर्डी, सं.नं. 124 व 126 पै.क्षेत्र 4 हेक्टर 54 आर. 18चौ.मीटर).विविध उपक्रमांसाठी भूसंपादन. | 159,711,591 |
| | | नविन भूसंपादन कायदा सन-2013 प्रमाणे सुधारीत प्रारूप निवाडा करणेचे काम चालू असून मान्यतेसाठी मा.जिल्हाधिकारी,अ.नगर यांचेमार्फेत मा.विभागीय आयुक्त,नाशिक विभाग,नाशिक यांचेकडे सादर करणेबाबत कार्यवाही सुरू आहे. | |
| | | शिर्डी विकास योजनेनुसार आरक्षण क्र.39 स.नं.124 व 126 पै.क्षेत्र 4 हेक्टर 54 आर 18 चौ.मीटर संस्थानकरीता विविध उपक्रमांसाठी आरक्षित आहे. | |
| | 2) | श्री बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांची मौजे कनकुरी येथील सर्वे नं.143/5 क्षेत्र 1.51.50 चौ.मी.खरेदी बाबत. | 51,510,000 |
| | | मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेसाठी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेत आलेले आहे. | |
| | | संस्थानचे पाणीपुरवठा तलावाजवळ असल्याने भविष्यात उपयोगी | |
| | 3) | श्री पंतिगराव रंगनाथ शेळके यांची मौजे शिर्डी सर्वे नं.212/2 व 212/3 क्षेत्र 1.40 आर खरेदी बाबत. | 121,800,000 |
| | | मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेसाठी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेत आलेले आहे. | |
| | | सदरचे क्षेत्र सुधारीत विकास आराखडयानुसार संस्थानसाठी आरक्षित आहे. | |
| | 4) | श्री पंडितराव रंगनाथ शेळके यांची मौजे शिर्डी सर्वे नं.203/2 क्षेत्र 00.60 आर खरेदी बाबत. | 52,200,000 |
| | | मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेसाठी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेत आलेले आहे. | |
| | | सदरचे क्षेत्र सुधारीत विकास आराखडयानुसार संस्थानसाठी आरक्षित आहे. | |
| | 5) | श्रीमती नलिनी संपतराव शेळके,श्री मिलींद संपतराव शेळके,श्री राहुल संपतराव शेळके यांची मौजे शिर्डी येथील स.नं.203/1 क्षेत्र 00.60 आर खरेदी बाबत | 52,200,000 |
| | | मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेसाठी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेत आलेले आहे. | |
| | | सदरचे क्षेत्र सुधारीत विकास आराखडयानुसार संस्थानसाठी आरक्षित आहे. | |
| | 6) | श्री बाजीराव नामदेव शेळके व श्री साहेबराव नामदेव शेळके यांची मौजे शिर्डी येथील स.नं.213/1 क्षेत्र 00.80 आर खरेदी बाबत. | 69,600,000 |
| | | मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेसाठी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेत आलेले आहे. | |
| | | सदरचे क्षेत्र सुधारीत विकास आराखडयानुसार संस्थानसाठी आरक्षित आहे. | |
| | 7) | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांची मौजे लक्ष्मीवाडी मळा ता.राहाता येथील सुमारे 364 हेक्टर 43 आर. जमीन खरेदीबाबत. | 2,000,000,000 |
| | | मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना इकडील दि.10/11/2014 रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव शासनाकडे सादर करणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे. | |
| | | विविध विकास कामांसाठी. | |
| ११ | मेकॅनिकल विभाग | | |
| | 1) | शिर्डी बसस्थानक येथे 2 लिफ्ट बसविणे. | 4,000,000 |
| | | प्रकल्पाचे सल्लागार मे.काबरे चौधरी आर्कीटेक्ट,नाशिक यांचेकडून टेंडर डाक्युमेंट येणे बाकी. | |

| अ.क्र | विभाग | प्रस्तावित प्रकल्पाचे नाव/ विभाग/ प्रस्तावाची सद्यस्थिती/ संस्थानसाठी आवश्यकता / उपयोगिता | अंदाजे खर्च रक्कम रु. (चालू दरानुसार) |
|---|---|---|---|
| | | शिर्डी बसस्थानक येथील पहिल्या व दुस-या मजल्यावरील एकूण 260 बेडस संस्थानला मिळणार असल्याने या ठिकाणी श्री साईभक्तांचे राहण्याची व इतर संस्थान कामासाठी लिफ्टची आवश्यकता आहे. | |
| | 2) | शिर्डी बसस्थानक येथे सोलर वॉटर सिस्टीम बसविणे. | 4,500,000 |
| | | प्रकल्पाचे सल्लागार मे.काबरे चौधरी आर्कीटेक्ट,नाशिक यांचेकडून टेंडर डाक्युमेंट येणे बाकी. | |
| | | शिर्डी बसस्थानक येथील पहिल्या व दुस-या मजल्यावरील एकूण 260 बेडस संस्थानला मिळणार असल्याने या ठिकाणी श्री साईभक्तांना गरम पाण्याची सुविधा मिळणेसाठी आवश्यक आहे. | |
| | 3) | साईआश्रम येथे 20 लिफ्ट बसविणे. | 50,000,000 |
| | | तिसरे वेळेस व अंतिम निविदेची प्रक्रिया चालू आहे. | |
| | | श्री साईभक्तांचे सोयीकरीता लिफ्टची आवश्यकता आहे. | |
| | 4) | संस्थान कर्मचारी वसाहत व इतर ठिकाणी सोलर वॉटर सिस्टीम बसविणे. | 5,500,000 |
| | | निविदा बोलविण्याची प्रक्रिया चालू आहे. | |
| | | संस्थान वसाहतीत राहणा-या कर्मचा-यांना याचा लाभ होणार आहे.तसेच वीज वापर कमी होईल. | |
| | 5) | कुंभमेळा गर्दीतील नियोजनासाठी 16 गुंठे (मंदिर परिसर) येथे स्टेनलेस स्टीलची रेलींग तयार करून बसविणे. | 5,500,000 |
| | | कुंभमेळा शताब्दी कक्षामार्फत खर्चास मान्यता घेणेकामी कार्यवाही चालू आहे. | |
| | | सिंहस्थ कुंभमेळा कालावधीत दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे नियोजनासाठी रेलींग तयार करणे आवश्यक आहे. | |
| १२ | **साईबाबा रुग्णालये विभाग (EDP)** | | |
| | 1) | श्री साईबाबा हॉस्पीटलमधील 10 MBPS Internet Lease Line करीता Hardware खरेदी करणेबाबत. | 700,000 |
| | | श्री साईबाबा हॉस्पीटलमधील 10 MBPS Internet Lease Line करीता Hardware खरेदी करणकामी मे.राक्का इन्फोटेक प्रा.लि.नाशिक यांना दि.24/02/2015 रोजी जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/4012/2015 कार्यादेश देण्यात आलेला आहे. | |
| | | सदर मशनरी कार्यान्वीत केल्यानंतर इंटरनेटचा उपयोग काय केला आहे व कोणत्या युजरने कोणत्या साईटचा वापर केलेला आहे तसेच इंटरनेटवरील अन वॉटेड साईट ब्लॉक करण्याची प्रोव्हीजन आहे. | |
| | 2) | श्री साईबाबा हॉस्पीटल करीता नविन संगणक संच खरेदी करणेबाबत. | 729,000 |
| | | सदर कंपनी कडुन नविन संगणक संच साहित्य खरेदी करणेस व सदर कंपनीस कार्यादेश देण्यास टिपणी मान्यतेसाठी मा.कार्यकारी अधिकारी सो.यांचे स्वाक्षरीस ठेवण्यात आली आहे. | |
| | | 2006 पासून असलेले संगणक व संगणकीय साहित्य यातील बरेच संगणक नादुरूस्त झालेले आहे.त्यासाठी अंत्यत आवश्यक असलेल्या विभागाकरीता संगणक घेण्यात आलेले आहे. | |
| | 3) | श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रूग्णालयाकरीता CCTV Camera System बसविणे बाबत. | 17,000,000 |
| | | श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रूग्णालयामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेकामी प्राप्त झालेल्या टेक्निकल ई-निविदा उघडणे बाबतचा प्रस्तावावर न्यायालयाचा मान्यतेची प्रतिक्षा करणे इष्ट असा त्यावर शेरा आला आहे. | |
| | | श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रूग्णालयामध्ये लहानमुले चोरी जाणे,पेंशटच्या नातेवाईकांनी डॉक्टर व कर्मचा-यांशी वाद घालणे, डॉक्टरांना मारहाण करणे, शिकाऊ डॉक्टारांची छेडछाड करणे, हे सर्व प्रकारचे नियंत्रण करणेकामी यासाठी सीसीटीव्ही ची आवश्यकता आहे. | |

| अ.क्र | विभाग | प्रस्तावित प्रकल्पाचे नाव/ विभाग/ प्रस्तावाची सद्यस्थिती/ संस्थानसाठी आवश्यकता / उपयोगिता | अंदाजे खर्च रक्कम रु. (चालू दरानुसार) |
|---|---|---|---|
| | 4) | राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेकरीता संगणक संच व इतर साहित्य खरेदी करणेबाबत. | 543,500 |
| | | सदर संगणक हे RC दरा प्रमाणे नाहीत.सदरचा दर हा RC पेक्षा जास्त असल्याने सदरचा प्रस्ताव रद्द करून व फेर सादर करण्यास मा.कार्यकारी अधिकारी सो.यांनी सुचविले आहे. | |
| | | श्री साईनाथ रूग्णालयाकरिता शासनाची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना राबविण्यात मान्यता मिळालेली आहे.सदर योजनेकरीता संगणक संच खरेदी करणेही आवश्यक आहे. | |
| १३ | **फायर & सेफ्टी विभाग** | | |
| | 1) | फायर सिलेंडर व आपत्कालीन पथक व फायर मदतनीससाठी साहित्य खरेदी करणेबाबत. | 285,000 |
| | | याबाबतची कार्यवाही कुंभमेळा कक्षामार्फेत चालू आहे. | |
| | | साईमंदिर व संस्थानच्या परिसरात आगीची दुर्घटना घडल्यास सदर साहित्यांची आवश्यकता आहे.सदर साहित्यांचा उपयोग संस्थानसाठी होणार आहे. | |

1) उपरोक्त रकमे व्यतिरिक्त संस्थानने अधिग्रहीत केलेल्या जमिनीच्या वाढीव मोबदल्यासाठी अधिगृहीत केलेल्या जमिनीचे मुळ मालकाने उच्च न्यायालयात दाद मागतली आहे. व तसेच शिर्डी व संस्थानच्या घनकचरा व्यवस्थापनासाठी आवश्यक त्या रकमेची तरतुद करून ठेवावी लागणार आहे.तसेच शिर्डी ते सावळिविहीर स्ट्रीटलाईट व समाधी मंदिर व दर्शन लाईन वातानुकुलित यंत्रणेला विद्युत पुरवठा करणेकरिता वाढीव लोड करिता जनरेटर, ट्रान्सफार्मर, इलेक्ट्रीक पॅनेल, केबल,क्युबीकल इ.खरेदी करणे व विद्युतीकरणाचे काम करणेसाठी तरतूद करावी लागणार आहे.
2) संस्थानचे वार्षिक उत्पन्न साधारणत ढोबळमानाने रू.500 कोटी व खर्च साधारणत 350 कोटी इतका आहे. वार्षिक रू. 150 कोटीचे जवळपास उत्पन्न उरते. त्याचा विनियोग संस्थान अधिनियम 2004 चे कलम 21 (2) अन्वये वितरणयोग्य उत्पन्नाच्या 30 % रक्कम (साधारणत: 45 कोटी) राज्यशासनाच्या पूर्व मंजुरीने बिगर वाणिज्यिक संस्थाना अथवा व्यक्तींना किंवा शिर्डी नगरपंचायतला वित्तसहाय्य देण्याची तरतूद आहे व मागील वर्षीच्या स्थूल उत्पन्नाच्या 10 % रक्कम व्यवस्थापन निधीत (साधारणत: 53 कोटी) वर्ग करण्याची तरतूद आहे. साईदर्शनासाठी येणारे भक्त केंद्रस्थानी धरुन, पूजा, निवास, भोजन इत्यादी सर्वंकश सुविधा उपलब्ध करुन देणेकरिता संस्थानच्या उत्पन्नाचा मोठा भाग त्यावर खर्च करणे क्रमप्राप्त आहे व त्याप्रमाणे खर्च होत आहे.
3) संस्थानकडे 31 मार्च 2014 अखेर 1100 कोटी मुदत ठेवी असून त्यापैकी संस्थान निधी, व्यवस्थापन निधी, Earmarked Fund, ग्रच्युईटी निधी व घसारा निधी खाती तरतूद करुन ठेवण्यात आलेली एकूण 800 कोटी वजा जाता रू.300 कोटी उपरोक्त विकास कामांसाठी उपलब्ध होतील.
4) उपरोक्त नमुद केलेल्या रू.1100 कोटी ठेवी विकासकामांसाठी वापरल्यास त्यावर वार्षीक साधारणत: रु. 100 कोटी व्याजापोटी मिळणारे उत्पन्न बंद होईल त्याप्रमाणात पुढील रक्कमा वर्ग करणे सुध्दा कमी होईल. सदरील रक्कम संस्थानच्या एकूण उत्पन्नापैकी 20 % पर्यत असून भविष्यात संस्थानचे दैनदिन खर्च भागवणेस उत्पन्न कमी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचा विचार होणे आवश्यक वाटते.
5) सबंधीत विभागांनी परिपत्रकास अनुसरून ढोबळ मानाने रू.2,230/- कोटी खर्चाचे प्रकल्प प्रस्तावित केले आहे. त्यासाठी ठेवींपैकी रु.300 कोटीची तुलना करता रू.1,900/- कोटीची तूट (deficit) दिसत आहे. याचा विचार करता उपरोक्त विकास प्रकल्प राबवितांना प्राधान्यक्रम देवून त्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. यामुळे काही विकास कामे प्रलंबीत राहतील असे दिसत आहे.
6) उपरोक्त खर्च झाल्यास संस्थानला सध्या वैद्यकिय सेवेसाठी देण्यात येणारी चॅरिटी देणे, इतर विकास कामांकरिता चॅरिटी देणे अडचणीचे होईल.

सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त करावयाच्या कामांची आवश्यकता, निकड या दृष्टीकोनातून विचार करुन प्राधान्यक्रमासह नवीन फेरप्रस्ताव सद्यपरिस्थितीसह ठेवावा. तसेच न्यायालयात प्रलंबित असलेल्या अर्जांचा तक्ता व काळाच्या ओघात एखाद्या अर्जाची आवश्यकता उरली नसल्यास असे अर्ज काढून घेण्याच्या माहितीचा तक्ताही सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.२३** **कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे मार्च- २०१४ ते डिसेंबर- २०१४ अखेरचे पेमेंट अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीचे काम हाती घेण्यात आलेले आहे. साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाच्या कार्यप्रणाली कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी संबधीत विभागांमध्ये कार्यान्वीत करुन दिलेल्या आहेत.

करारनाम्यानुसार साईटेक प्रकल्पातील सर्व कार्यप्रणाली ह्या अठरा (१८) महिन्यांच्या कालावधीत, एकुण सहा टप्प्यांमध्ये कार्यान्वीत करण्यात येणार होत्या. मुळ करारनाम्यानुसार प्रकल्प जानेवारी २०१० ला सुरु होऊन जुन

२०११ पुर्ण होणे अपेक्षित होते. परंतु सुरवातीच्या काळात आलेल्या विविध अडचणींमुळे उदा-सर्व्हर रुमच्या जागेतील बदल, फायबर केबल टाकणेकामी रस्त्याच्या कडेने असलेल्या दुकाने व रहदारी यांची अडचण इ. कारणास्तव प्रकल्प निर्धारीत वेळेत पुर्ण करणे अशक्य झाले होते. प्रकल्पासाठी तयार करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे व श्री साईबाबा संस्थान यांना सहमतीने निर्धारीत वेळेत बदल करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार प्रकल्प उभारणीचे कामास सुरवातीस दि. १३/०३/२०१३ व दि.३०/०८/२०१३ अशी मुदतवाढ घेण्यात आलेली असून दि. १५/०३/२०१४ रोजीचे सभेत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना आता पर्यंत दिलेल्या सर्व कार्यप्रणालीतील सर्व अडचणींचे माहे एप्रिल २०१४ अखेर समाधानकारक निरसन करावे, असे निर्देश् देण्यात आलेले आहे.

करारनाम्यानुसार प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील पहिली कार्यप्रणाली संस्थानने स्वीकारलेनंतर कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना त्यांचे दरमहा पेमेंट संस्थानने अदा करणे गरजेचे आहे. साईटेक प्रकल्पातील पहिली कार्यप्रणाली ०१ ऑगष्ट २०११ रोजी स्वीकारण्यात आलेली आहे सबब, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना करारनाम्यानुसार ऑगष्ट २०११ पासून पेमेंट अदा करण्यात येत आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना माहे नोव्हेंबर २०१३ पर्यंतच्या बीलांची रक्कम त्यांना अदा करण्यात आलेली असून, दि.१७/०७/२०१४ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं. ५९१ नुसार माहे डिसेंबर २०१३ ते फेब्रुवारी २०१४ च्या बीलच्या एकुण रकमेच्या ७५% रक्कम त्यांना अदा करण्यात आलेली आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे डिसेंबर २०१४ ते फेब्रुवारी २०१४ च्या पेमेंटमधील उर्वरीत २५% रक्कम व माहे मार्च २०१४ पासूनचे पेमेंटबाबत निर्णय होणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१५ रोजीचे सभेसमोर सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. २० अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहे-

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना डिसेंबर २०१३ ते फेब्रुवारी २०१४ या कालावधीतील बाकी असलेली २५% रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच सॉफ्टवेअर रिक्वॅायरमेंटचा अभ्यास करुन त्यांचे पुढील पेमेंटबाबत या प्रकल्पाची प्रगती पाहून निर्णय घेतला जाईल, असे ठरले.

त्यानुसार मा.कार्यकारी अधिकारी सो., यांनी विषयाकींत प्रस्तावावर चर्चेअंती दिलेल्या निर्देशानुसार संबंधीत मुद्दयांचा खुलासा खालीलप्रमाणे.

**१)** मा. व्यवस्थापन समितीचे दि. ३०/०१/२०१५ रोजीचे निर्णयानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी सर्व विभागात संगणकीय कार्यप्रणाली विभागाच्या दैनंदिन कामकाजानुसार (Requirement) नुसार कार्यान्वीत करुन दिलेली असुन सर्व विभागांचा याबाबतचा अभिप्राय घेण्याचे काम सुरु असुन संबधीत विभागांचे त्रुटी मार्च २०१५ अखेर पुर्ण करण्यात येणार असल्याचे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी दि. ०४/०३/२०१५ रोजीचे पत्राव्दारे कळविले आहे.

**२)** कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेशी करारनाम्यातील मुद्दा क्रं.2.0 मधील Sansthan Proposed Scope नुसार The Scope Will Include development Maintainance and Support for an initial period of 69 Months त्यानुसार पहिली कार्यप्रणाली दि. ०१/०८/२०११ पासुन पुढील ६९ महिन्यांकरीता प्रत्येक महिन्याचे पेमेंट करारनाम्यानुसार कंपनीस अदा करणे गरजेचे आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा करारनामा ३०/०४/२०१७ पर्यंत असल्याने सदर कालावधीत कंपनीचा Support असणार आहे.

**३)** दि. ०५/०३/२०१५ अखेर सर्व विभागांचे Application Compliance Reports खालीलप्रमाणे.

| SaiTech - Application Status as on 05/03/2015 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **Sr** | **Application Name** | **Application Status** | **Defects Raised** | **Defects Closed** | **Defects Open** | **Remarks** |
| 1 | Online System (OLS) | Live | 2 | 0 | 2 | |
| 2 | Prasadalaya | Live | 8 | 2 | 6 | |
| 3 | Accomodation | Live | 8 | 4 | 4 | |
| 4 | Finance System (ERP) | Live | 2 | 0 | 2 | Accounts use both the systems ERP as well as Tally, they should stop using Tally to avoid data duplication |
| 5 | Purchase/Inventory System | Live | 10 | 9 | 1 | Being used partially, Except Book Shore no other dept is using the inventory system. |
| 6 | Darshan Pass Phase-1 (PRO) | Live | 11 | 9 | 2 | |
| 7 | Donation | Live | 21 | 19 | 2 | |
| 8 | Cheque / DD | Live | 9 | 2 | 7 | ATM/OBT bank soft copy uploading functionality to be implemented |
| 9 | Postal Money Order | Live | 0 | 0 | 0 | |
| 10 | Life Member Ship | Live | 9 | 2 | 7 | |
| 11 | SaiLeela Membership | Live | 0 | 0 | 0 | |
| 12 | Telephone Billing | Live | 4 | 1 | 3 | |
| 13 | Book Store & Book Shop | Live | 4 | 2 | 2 | |
| 14 | Canteen | Live | 4 | 4 | 0 | |
| 15 | Cloth Store & Cloth Shop | Live | 21 | 14 | 7 | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 16 | Water Supply | Live | 2 | 0 | 2 | |
| 17 | Guest Information System | Live | 6 | 3 | 3 | |
| 18 | Kiosk | Live | 1 | 0 | 1 | Kiosks are not working due to infrastructure problem, Application live |
| 19 | Laddu Prasad | Live | 0 | 0 | 0 | |
| 20 | Security Dept. | Live | 0 | 0 | 0 | Users are not using the application |
| 21 | Medical Aid | Live | 16 | 15 | 1 | |
| 22 | Education Complex | Live | 26 | 0 | 26 | |
| 23 | Festive Budgeting & Management | Live | 5 | 5 | 0 | |
| 24 | Record Maintenance | Live | 2 | 2 | 0 | |
| 25 | Construction | Live | 0 | 0 | 0 | |
| 26 | Electric Department | Live | 24 | 22 | 2 | |
| 27 | Meeting Section (WFS) | Live | 8 | 7 | 1 | |
| 28 | Legal | Live | 9 | 9 | 0 | Users are not using the application |
| 29 | Inward / Outward | Live | 16 | 15 | 1 | |
| 30 | Information System For Sr. Officers | Live | 0 | 0 | 0 | |
| 31 | Vehicle Department | Live | 0 | 0 | 0 | |
| 32 | MIS | Live | 0 | 0 | 0 | |
| 33 | HR & Payroll | Live | 79 | 62 | 17 | |
| 34 | Labour | Live | 3 | 0 | 3 | Users are using th eapplication partially, need to use for contract labour as well |
| 35 | Q-Management Phase -2 | TBD | 0 | 0 | 0 | Requirements not available |
| 36 | Integration with HMS | TBD | 0 | 0 | 0 | Requirements not available |
| 37 | Proxy & Email Integration | Live | 0 | 0 | 0 | |
| 38 | OLD Data Migration | Live | 0 | 0 | 0 | |
| | | **Total** | **310** | **208** | **102** | |
| **Application Compliance Date : 31/05/2015** | | | | | | |

४) तरी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना करारनाम्यानुसार त्यांचे SOW मधील Section No.5 नुसार मार्च २०१४ ते माहे डिसेंबर २०१४ चे पेमेंट मधुन ७% रक्कम राखीव ठेऊन उर्वरीत रक्कम रुपये २५८३८८४१.३७/- मात्र अदा करणेकामी प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सविनय सादर करता येईल.

सद्स्थितीत साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाच्या सर्व कार्यप्रणाली कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी संबधीत विभागात कार्यान्वीत करुन दिलेल्या आहेत. तसेच मा.व्यवस्थापन समितीने दिलेल्या निर्देशानुसार साईबाबांना अर्पण करावयाची वस्त्राबाबतची कार्यप्रणाली, दर्शनपास कार्यप्रणालीमध्ये बायोमॅट्रीकची सुविधा, बुकस्टॉल या कार्यप्रणालीमध्ये बारकोडची सुविधा व ऑनलाईन सर्व्हिसेस (वेबसाईटवर) साईभक्तांना मार्गदर्शन करणेकामीची सुविधा तसेच तेला तुपाचे एकुण डबे, रिकामे झालेले डबे व रिकामे झालेले डबे कोठे वापरण्यात आले याबाबतची कार्यप्रणाली कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी कार्यान्वीत करुन दिलेल्या आहेत. कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली वापरत असताना संबधीत विभागांना येणा-या अडचणी तथा आवश्यक सुधारणा आयटी विभागामार्फत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून सोडवून घेतल्या जातात.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी वेळोवेळी पत्राव्दारे तसेच प्रत्यक्षात तोंडी, प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाच्या सर्व कार्यप्रणाली संबधीत विभागात कार्यान्वीत केलेल्या असल्याने, त्यांचे माहे मार्च २०१४ ते माहे डिसेंबर २०१४ पर्यंतचे खालील तपशिलात नमुद केलेप्रमाणे बील अदा करावे.

**Pending Invoices - SaiTech (Cognizant) Till Dec 2014**

| Month | Invoice Number & Date | Desc | Net Amount |
|---|---|---|---|
| Mar-14 | IN214-0000002871 | Service Rendered for the month of March 2014 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| Apr-14 | IN214-0000002900 | Service Rendered for the month of April 2014 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| May-14 | IN214-0000002980 | Service Rendered for the month of May 2014 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| Jun-14 | IN214-0000003078 | Service Rendered for the month of June 2014 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |

| | | | |
|---|---|---|---|
| Jul-14 | IN214-0000003141 | Service Rendered for the month of July 2014 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| Aug-14 | IN214-0000003203 | Service Rendered for the month of August 2014 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| Sep-14 | IN214-0000003232 | Service Rendered for the month of Sept 2014 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| Oct-14 | IN214-0000003283 | Service Rendered for the month of October 2014 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| Nov-14 | IN214-0000003324 | Service Rendered for the month of November 2014 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| Dec-14 | IN214-0000003464 | Service Rendered for the month of December 2014 | 21,24,702.88 |
| | IN214-0000000861 | Installment advice for hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| | | **Grand Total** | **2,77,83,700.40** |
| | | As per SOW Section No.5.1 Hold 7% amount on Total Invoice Amount | **19,44,859.03** |
| | | Total Amount to be Paid | **2,58,38,841.37** |

तसेच करारनाम्यानुसार सर्व विभाग कार्यप्रणाली वापरतांना येणा-या अडी-अडचणी बाबतचे मुद्दे माहे मार्च २०१५ अखेर सोडवीले जातील तोपर्यंत SOW Section No.5.1 नुसार उपरोक्त मार्च २०१४ ते माहे डिसेंबर २०१४ चे पेमेंट मधुन ७% रक्कम राखीव ठेऊन उर्वरीत रक्कम रुपये २५८३८८४१.३७/- मात्र अदा करावी, अशी त्यांनी दि, ०४/०३/२०१५ रोजीचे पत्राव्दारे विनंती केली आहे.

**मागणी:** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे साईटेक प्रकल्पाअंतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून झालेली कामकाजाची कार्यवाही पाहता, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे मार्च २०१४ ते माहे डिसेंबर २०१४ चे पेमेंट मधुन ७% रक्कम राखीव ठेऊन उर्वरीत रक्कम रुपये २,५८,३८,८४१.३७/- मात्र अदा करणेसंदर्भात निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर करणेस मान्यता असावी, असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे साईटेक प्रकल्पाअंतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून झालेली कामकाजाची कार्यवाही पाहता, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे मार्च २०१४ ते माहे डिसेंबर २०१४ चे पेमेंट मधुन ७% रक्कम राखीव ठेऊन उर्वरीत रक्कम रुपये २,५८,३८,८४१/- अदा करणे संदर्भात निर्णय होणेकामी विषयाकींत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सविनय सादर

**निर्णय क्र.९५** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे मार्च- २०१४ ते डिसेंबर- २०१४ अखेरचे पेमेंट अदा करणेपूर्वी आय.टी. कमिटी व तांत्रिक सहाय्यक यांचा अभिप्राय घेण्यात यावा. तसेच त्यांचे अभिप्राय आल्यानंतर कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधींना चर्चेसाठी सभेसमोर बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र. प्रमुख माहिती तंत्रज्ञान विभाग)

---

**विषय नं.२४** **श्री साईप्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे कामाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद:- सन** 2004 **चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.**14 (**भाग**-4) **मध्ये महाराष्ट्र विधान** मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील 14 (2 घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते उपाययोजना हाती घेण्याचे. तसेच 21 (1 घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**प्रस्तावना:-** श्री साई प्रसादालयात दैनंदिन सरासरी 35,000 ते 45,000 साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेत आहे. श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग/स्वच्छता व पेस्टकंट्रोलची कामे जानेवारी 2009 पासून आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेण्यात येत आहेत.

मा.व्यवस्थापन समिती दि.08/01/2014 रोजीचे सभेतील निर्णयानूसार सन 2014-2015 करीता श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग,स्वच्छता व पेस्टकंट्रोलची कामे करुन घेणेकामी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन जाहीर निविदा मागविणेत आलेल्या आहेत. परंतू मा.व्यवस्थापन समिती सभेची तारीख काही कारणामुळे पुढे ढकलण्यात आल्याने निर्धारीत वेळेत प्राप्त झालेली दरपत्रके मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक 12/06/2014 रोजीचे सभेत उघडणे व निर्णय घेणेकामीचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

मा.व्य.समिती सभा दि.12/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.467 नूसार यावर सविस्तर चर्चा होवून, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. त्यानूसार सन 2014-2015 साठी श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींगचे खर्चास मान्यता मिळणेकामी विधी विभागामार्फत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन सादर करण्यात आलेले होते.

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचा सदर प्रकरणी आदेश होईपावेतो उशिर लागणार असल्याने, प्रसादालयातील स्वच्छतेअभावी साईभक्तांची गैरसोय होवू नये, याकरीता मा.व्यवस्थापन समिती दिनांक 15/03/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.257 नूसार सन 2014-2015 करीता मागविणेत आलेल्या टेंडरर्सबाबत पुढील

कार्यवाही होणेकामी काही कालावधी लागणार असल्याने सन 2013-2014 चे हाऊसकिपींग टेंडरमधील व करारनाम्यातील अटी/शर्तीस अधीन राहुन, पुढील कार्यवाही होईपर्यंत पुर्वीचेच (सन 2013-2014 करीता) मंजूर असलेले रक्कम रु.11,00,000/- सर्व करांसहीत (अक्षरी रक्कम रुपये अकरा लाख मात्र) या दरात मे.बी.व्ही.जी. इंडिया लि, पुणे यांना मुदतवाढ देणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानूसार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांना जा.नं.एसएसएस/ वशि/ प्रसादा/ 156/14 दि.11/4/2014 नूसार रक्कम रु.11,00,000/- (अक्षरी रक्कम रु.अकरा लाख मात्र) प्रती माह सर्व करांसह याप्रमाणे दि.01/04/2014 पासून पुढील आदेश होईपर्यंतचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.12/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.467 अन्वये सन 2014-2015 साठी मागविणेत आलेल्या टेंडर्सबाबत विधी विभागामार्फत मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे दाखल झालेले सिव्हील ॲप्लीकेशन नं.12314/2014 वर दि.22 डिसेंबर 2014 रोजी पुढील प्रमाणे आदेश झालेला आहे.

Sansthan has, on 12.6.2014, selected Allied Resources Management Services Private Ltd, Which has offered bid of Rs.11,84,000/- for House Keeping/Pest control and Cleaning work of "Sai Prasadalaya". The bid is lowest. It be accepted.

**मागणी:-** मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी वरील आदेशानूसार हाऊसकिपींगचे वार्षिक खर्चास मान्यता दिलेली आहे. परंतू सदरचे आदेशामध्ये कामाचा कालावधी नमूद केलेला नाही. तसेच सदरची ऑर्डर विधी विभागाकडून दि.02/02/2015 रोजी इकडील विभागाचे ई-मेलवर प्राप्ज्ञ झालेली असून सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडून आदेश होणेकामी कालावधी लागलेला आहे. त्यामुळे अलाइड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि.पुणे यांना मशिनरी, केमिकल्स, झाडू, वगैरे साहित्य आणणे तसेच काम स्विकारलेबाबतचे स्विकृतीपत्र घेणे व करारनामा करणे यासाठी 10 ते 15 दिवसांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. सदर काम व्यवस्थीतरित्या सुरु होणेकामी जवळपास एक महिन्याचा कालावधी जावू शकतो. त्यामुळे अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि.पुणे यांना फक्त एक महिन्यासाठी म्हणजेच मार्च-2015 पर्यंत काम देणे उचीत होणार नाही.

श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे खर्चास मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांची मान्यता मिळालेली असल्याने, अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि.पुणे यांना दि.01 मार्च-2015 ते 28 फेब्रुवारी- 2016 अखेर काम देणे उचीत होईल असे नम्र मत आहे.

संस्थान अधिनियम /ठराव यानूसार अनुमान :- आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** तरी श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलकामी अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि.पुणे यांना सन 2014-2015 करीता भरलेल्या टेंडरमधील अटी/शर्तीनूसारच दि.01 मार्च-2015 ते 28 फेब्रुवारी- 2016 अखेर कामाचा कार्यादेश देणेस मान्यता असावी. याकरीता सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९६** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, समिती अध्यक्ष व सदस्य यांच्या मान्यतेने श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलकामी अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हीसेस इंडिया प्रा.लि.पुणे यांना सन 2014-2015 करीता भरलेल्या टेंडरमधील अटी/शर्तीनूसारच दि.01 मार्च-2015 ते 29 फेब्रुवारी- 2016 अखेर कामाचा जा.नं.एसएसएस/ वशी-प्रसादा/ ५८८०/२०१५, दि.२७ फेब्रुवारी २०१५ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक साईप्रसादालय विभाग )

---

**विषय नं.२५** **श्री.प्राणेश श्रीपाद कुलकर्णी, तब्बलजी, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. प्राणेश श्रीपाद कुलकर्णी हे संस्थानचे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागात तबलजी या पदावर कार्यरत आहेत. त्यांचे विरुध्द भारतीय दंड विधान कलम ३५४ (अ) बालकांचे लैंगिक गुन्हयापासुन संरक्षण संरक्षण कायदा२१२ चे कलम ११ (१) अंतर्गत शिर्डी पोलीस स्टेशन शिर्डी येथे गुन्हा रजिस्टर नं. १८/२०१५ अन्वये गुन्हा दाखल आहे. त्याबद्दल त्यांना दि. ३१.०१.२०१५ रोजी अटक झाली असून दि. ०१.०२.२०१५ ते ०३.०२.२०१५ या कालावधीत पोलीस कोठडी तर दि. ०३.०२.२०१५ ते ०५.०२.२०१५ या कालावधीत न्यायालयीन कोठडी रिमांड घेण्यात आले होते. सदरच्या घटनेमुळे संस्थानचे नावलौकीकास बाधा पोहोचली आहे. त्यांच्या गैरवर्तनाचे गांभीर्य लक्षात घेवून त्यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनीयम २०१३ चे प्रकरण २ नियम क्र. ४ (२) (अ) नुसार इकडील जा. नं. एसएसएस/वशी ७ बी/६६९/२०१५ दि. २८.०२.२०१५ अन्वये दि. ०१.०२.२०१५ पासून संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत ठेवले आहे. तसेच श्री. कुलकर्णी यांना सेवा निलंबन कालावधीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) सेवा (पदग्रहण, अवधी आणि निलंबन, सेवेतून बडतर्फी आणि काढून टाकणे या कालखंडातील प्रधाने) विनीयम २०१३ मधील प्रकरण ४ चे नियम क्र. १७ (अ) नुसार ५० % वेतन निर्वाह भत्ता म्हणून अदा केला जात आहे.

माहितीस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.९७** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.प्राणेश श्रीपाद कुलकर्णी, तब्बलजी, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांचेवर केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- कामगार विभाग, रुग्णालय/ वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२६ सि.व्ही.टी.एस. विभागातील डॉक्टरांच्या इन्सेंटीव्हमध्ये सुधारणा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सि.व्ही.टी.एस विभागातील डॉक्टरांनी त्यांना मिळत असलेल्या इन्सेंटीव्हमध्ये वाढ करणेबाबत मागणी केली आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सुपर स्पेशालिटी वैद्यकिय सेवा देणेबाबत व शिर्डी सारख्या ठिकाणी सुपर स्पेशालिस्ट डॉक्टर उपलब्ध होऊन टिकुन राहण्यासाठी डॉक्टरांना मासिक वेतनाव्यतिरीक्त रुग्णांना आकारण्यात येणा-या बिलातील विशिष्ट रक्कम देणेबाबत मा.व्य.स.सभेमध्ये निर्णय संमत झाला आहे. गरीब व गरजु रुग्णांना कमीत कमी दरात हृदयशस्त्रक्रिया वैद्यकिय सेवा देण्यास अनुसरुन इतर रुग्णालयांच्या तुलनेत दर कमी ठेवुन त्याप्रमाणे डॉक्टरांनाही इन्सेंटीव्ह ठरविण्यात आला होता. मे २००६ पासून ते आजपर्यंत बायपास सर्जरीसाठी दर आकारणीमध्ये झालेली व सर्जन डॉक्टर, भुलतज्ञ, इन्टेंसिव्हीस्ट डॉक्टर व परफयुजनिस्ट यांना देण्यात येणारा इन्सेंटीव्ह थोडक्यात खालीलप्रमाणेः-

| **निर्णय क्रं.५५०/ दि.१९.०८.२००६** | | **निर्णय क्रं.७७०/ दि.२२.०९.२००७** | | **निर्णय क्रं.१९६/ दि.०८.०३.२००९** | | **निर्णय क्रं.८२०/ दि.०८.१०.२०१२ (JD & RGJAY)** | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६५,००० | १४,००० | ७५,००० | १५,००० | ८३,००० | १५,००० | १,२५,००० | १५,००० |

निर्णय क्रं.५५०/दि.१९.०८.२००६ या सुरुवातीपासुन सर्जन डॉक्टर, भुलतज्ञ डॉक्टरांची रक्कम तीच असुन त्यानंतर पुढील ५ वर्षात दर आकारणी रु.६५,०००/- वरुन रु.८३,०००/- व सध्या राजीव गांधी व जीवनदायी योजनेअंतर्गत दर रु.१,२५,०००/- करण्यात येऊन डॉक्टरांना देण्यात येणा-या रकमेत कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. डॉक्टरांनी सदर रकमेत वाढ करणेबाबत मागणी केली होती, तथापी प्रत्यक्ष दर अंमलबजावणीचे वेळी विचार करण्यात येईल असे सांगण्यात आले होते. यामध्ये अदयाप वाढ करण्यात आलेली नाही. कार्डीयाक सर्जन यांनी सदर बाबत प्राधान्याने विचार करण्यात यावा असे दि.१९.०८.२०१३ रोजीचे पत्रान्वये लेखी विनंती केली आहे. हृदयशस्त्रक्रिया विभागातील शस्त्रक्रियांचे सध्याचे दर व डॉक्टरांची मागणी व वाढीव रक्कम मिळत असलेप्रमाणे साधारणतः प्रस्थावित केलेले दर यांचे विवरण निर्णयार्थ सोबत जोडले आहे. सदर प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे दि.०५.०६.२०१४ रोजी झालेल्या सभेमधील निर्णय क्रं.३४४ अन्वये स्थगित ठेवण्यात आला होता परंतु आपल्या हॉस्पिटलला चांगल्या डॉक्टरांची सेवा सतत पुढे चालु राहण्यासाठी या प्रस्तावावर पुनःश्च विचार होणे आवश्यक असल्याने प्रस्ताव फेर सादर केला आहे.

हृदयशस्त्रक्रिया विभागातील दर वाढीस अनुसरुन संबंधित सर्जन डॉक्टर, भुलतज्ञ डॉक्टर, इन्टेंसिव्हीस्ट डॉक्टर व परफयुजनिस्ट यांचे मोबदल्यात वाढ होणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सि.व्ही.टी.एस. विभागातील डॉक्टरांच्या इन्सेंटीव्हमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सुधारणा करणेस तत्वतः मान्यता देण्यात आली.**

**मात्र तत्पुर्वी इन्सेंटीव्ह दर निश्चितीचे तत्व ठरविणेसाठी इतर धर्मदाय रुग्णालयांमध्ये इन्सेंटीव्ह देतात का व देत असल्यास किती प्रमाणात इन्सेंटीव्ह देण्यात येतो, याची माहिती घेण्यात येऊन, इन्सेंटीव्ह दरात किती वाढ करणे योग्य राहील याचा तौलानिक अभ्यास करुन प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२७ कॅथलॅब मधील प्रोसिजर्सवरील यापुर्वी कपात केलेल्या इन्सेन्टीव्ह दरात काही प्रमाणात वाढ करण्यास व फिक्स मानधनावरील कार्डीओलॉजिस्ट यांनाही ते दर लागू करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्डीयालॉजी विभागातील डॉक्टरांना मासिक वेतना व्यतिरीक्त कामाचे विशिष्ट प्रमाणात मोबदला देण्याबाबत वेळोवेळी मा.व्य.स.चे सभेत निर्णय संमत झाले आहे. त्याचा आढावा खालीलप्रमाणेः-

1. निर्णय क्रं.१९६/दि.०८.०३.२००९ अन्वये लागु असलेल्या इन्सेन्टीव्ह दरास अनुसरुन एकूण दोन कार्डीओलॉजिस्ट यांना प्रत्येकी मासिक वेतना व्यतिरीक्त साधारणतः रु.२० ते २५ लाखापर्यंत इन्सेन्टीव्ह दिला जात होता. सध्या या दोन कार्डीओलॉजिस्ट यांना आर्थिक गैरव्यवहार व कामातील निष्काळजीपणामुळे खातेनिहाय चौकशी करिता सेवा निलंबित करण्यात आले आहे.

2. दरम्यानच्या कालावधीत मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपाठ यांचेकडील सिव्हल ॲप्लीकेशन नं.२७९७/ २०१४ दि.१९.०३.२०१४ अन्वये, सहा महिने कालावधीकरीता कार्डीयालॉजिस्ट नेमणुकीस मान्यता मिळाली होती. त्यास अनुसरुन २ पुर्णवेळ फिक्स मानधनावर व ५ व्हिजीटींग कार्डीयालॉजीस्टचा पॅनल विहीत पध्दतीने नियुक्त करण्यात आला होता. त्यांच्या कामाचा अनुभव पाहुन एक कार्डीओलॉजिस्ट यांना मासिक फिक्स ०३ लाख रुपये व दुस-या कार्डीओलॉजिस्टला मासिक दीड लाख रुपये व इतर व्हिजिटींग कार्डीओलॉजिस्ट यांना खालीलप्रमाणे इन्सेन्टीव्ह मंजुर करण्यात आला होता.

| **पुर्वीचा इन्सेन्टीव्ह दर (रुपये)** | | **नव्याने लागु करण्यात आलेला इन्सेन्टीव्ह दर (रुपये)** | |
|---|---|---|---|
| ॲन्जीओग्राफि | १,०००/- | ॲन्जीओग्राफि | ३००/- |
| ॲन्जीओप्लास्टी १ व २ स्टेन्ट करीता इतर सर्व समकक्ष प्रोसिजर्स् | ८,०००/- व १०,०००/- | ॲन्जीओप्लास्टी १ व २ स्टेन्ट करीता | ३,०००/- |
| २ डी इको, टीएमटी, | १८०/- | २ डी इको, टीएमटी, | १८०/- |

डॉक्टर मनोहर शिंदे यांना सर्व प्रकारच्या प्रोसिजर्स्ची चांगल्या प्रकारे माहिती व अनुभव असल्याने त्यांनी दर महा तीन ऐवजी ४ लाखाची मागणी केली होती. तथापी, कामाचा अभिप्राय पाहुण वाढ करणेबाबत निर्णय घेण्यात येईल असे सांगीतले होते.

3. सहा महिने कालावधीकरीता नेमणुका केल्या नंतर कॅथलॅब विभागाच्या कामकाजाचा प्रत्यक्ष आढावाः- इन्सेन्टीव्ह दर कमी झाल्याने मासिक साधारणतः रु.४० ते ४५ लाखावरुन इन्सेन्टीव्ह रु.१५ ते २० लाखापर्यंत आला म्हणजे साधारणतः रु.२० ते २५ लाखापर्यंत मासिक आर्थिक बोजा कमी झाला. इन्सेन्टीव्ह दर कमी झाल्याने व्हिजीटींग एकुण ०५ डॉक्टरांच्या पॅनेल पैकी दोन डॉक्टर दोन ते तीन महिन्यात व्हिजीट देण्याचे बंद झाले. उर्वरीत डॉक्टरांनीही इन्सेन्टीव्ह वाढीची मागणी केली आहे.

तथापी, सहा महिने कालावधी पुर्ण झाल्यानंतर आपल्या मागणीचा विचार केला जाईल असे त्यांना वेळोवेळी सांगण्यात येऊन पुर्वीच्या दोन कार्डीओलॉजीस्ट यांच्या सेवा निलंबनाच्या कालावधीत रुग्णाची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत त्यांना सांगण्यात आले होते.

4. मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडील सिव्हील ॲप्लीकेशन नं. २९०/२०१५ दि.१२.०१.२०१५ अन्वये, या कार्डीओलॉजीस्ट डॉक्टरांना पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात आली आहे व त्यास अनुसरुन त्यांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहे. तथापी, या डॉक्टरांची मागणीप्रमाणे इन्सेन्टीव्ह वाढ झालेली नसल्याने सदर कार्डीओलॉजीस्ट डॉक्टर सोडुन जाण्याची शक्याता निर्माण झाली आहे. पैकी व्हिजीटींग डॉक्टरांनी लेखी मागणी केली आहे तर मासिक फिक्स मानधनावरील कार्डीओलॉजीस्ट डॉ. मनोहर शिंदे व डॉ. प्रशांत पवार यांनी दि.०४.०२.२०१५ रोजी एक महिना नोटीस कालावधी नमुद करुन राजीनामा पत्रे दिली आहे.

5. व्हिजीटींग डॉक्टर नाशिक, औरंगाबाद येथुन व्हिजीट देण्यासाठी येत असतात, त्यांना किमान व्हिजीटची रक्कम मिळण्याच्या दृष्टीने त्यांनी इन्सेन्टीव्हमध्ये मोठया प्रमाणावर वाढ करण्याची मागणी केली आहे. तर पुर्णवेळ कार्डीयालॉजीस्ट यांनीही इन्सेन्टीव्हमध्ये वाढ होऊन मासिक फिक्स मानधनाऐवजी इतर डॉक्टरांप्रमाणे केलेल्या कामाच्या विशीष्ट प्रमाणात इन्सेन्टीव्हची मागणी केली आहे.

कॅथलॅब विभागाच्या कामाचा आढावा घेतला असता रुग्णाची संख्या दिवसे दिवस वाढत आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे, त्यास अनुसरुन कार्डीयालॉजीस्ट डॉक्टर यांची आवश्यकता टाळता येणार नाही. तथापी, कार्डीयालॉजीस्ट यांना इतरत्र ठिकाणी मिळत असलेल्या इन्सेन्टीव्हच्या प्रमाणात आपल्या रुग्णालयामध्ये सध्याच्या इन्सेन्टीव्ह दरामध्ये काही प्रमाणात वाढ करणे व्यवहार्य वाटते. त्यास अनुसरुन पुर्वीचे इन्सेन्टीव्ह दर व प्रस्तावीत केलेले दर आपले अवलोकनार्थ खालील प्रमाणे सादर केले आहेतः-

| **कॅथलॅब प्रोसिजर्स** | **मा.व्य.स. निर्णय क्रमांक १९६ दि.०८.०३.२००९ पुर्वीचा दर** | **मा.व्य.स. निर्णय क्रमांक ३४३ दि.०५.०६.२०१४ सध्याचा दर** | **प्रस्तावीत दर (रु.)** |
|---|---|---|---|
| ॲन्जीओग्राफी | १,०००/- | ३००/- | ७५०/- |
| ॲन्जीओप्लास्टी १ व २ स्टेन्ट करीता | ८,०००/- (Single Stent) व १०,०००/- (Double Stent) | ३,०००/- (Single & Double ) | ८,०००/- (Single Stent) व (Double Stent) |
| २ डी इको, टीएमटी | १८०/- | १८०/- | २५०/- |
| BMV, BPV/ BAV, POBA, COA Dilation, PDA Coil Closure | ७,५००/- | ३,०००/- | ४,०००/- |
| ASD, VSD, PDA, Device Closure, IVC Filter, Permanent Pacemaker | १०,०००/- | ३,०००/- | ७,०००/- |

प्रस्तावीत केलेल्या दरानुसार इन्सेन्टीव्ह लागु केल्यास चांगल्या प्रकारे कामाचा अनुभव असलेले, नावलौकीक झालेले असे व त्यांच्या कामाचा आढावा घेता आर्थिक गैर व्यवहार दिसुन येत नाही व त्यांचे कामकाज समाधानकारक आहे. सदर वाढीव दराचे अवलोकन होऊन लागु केल्यास कॅथलॅब विभागाचे कामकाज, सुरळीतपणे चालु राहण्यास मदत होईल, तज्ञ डॉक्टर टिकुन राहतील व रुग्णांना उत्तम प्रकारे वैद्यकिय सेवा देण्यास मदत होईल. पुर्वीच्या दराशी तुलना करता आर्थिक बोजा वाढणार नाही.

तरी सध्या कार्यरत असलेल्या कार्डीओलॉजीस्ट डॉक्टरांच्या मागणीस अनुसरुन इन्सेन्टीव्ह दरात काही प्रमाणात वाढ व डॉ. मनोहर शिंदे, कार्डीओलॉजीस्ट यांना मासिक फिक्स रुपये तीन लाख मानधन ऐवजी वेतनाचे प्रमाणात पण मासिक फिक्स मानधन रु.६०,०००/- अधिक इतर कार्डीओलॉजीस्ट प्रमाणे केलेल्या कामाचे प्रमाणात इन्सेन्टीव्ह लागु करणे व डॉ. प्रशांत पवार, यांना पुर्ण वेळ ऐवजी व्हिजीटींग कार्डीयालॉजीस्ट पॅनलमध्ये समावेश करुन सेवा घेण्यात मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कॅथलॅब मधील प्रोसिजर्सवरील यापुर्वी कपात केलेल्या इन्सेन्टीव्ह दरात काही प्रमाणात वाढ करण्यास व फिक्स मानधनावरील कार्डीओलॉजिस्ट यांनाही ते दर लागू करणेस तत्वतः मान्यता देण्यात आली.**

**मात्र तत्पुर्वी इन्सेंटीव्ह दर निश्चितीचे तत्व ठरविणेसाठी इतर धर्मदाय रुग्णालयांमध्ये इन्सेंटीव्ह देतात का व देत असल्यास किती प्रमाणात इन्सेंटीव्ह देण्यात येतो, याची माहिती घेण्यात येऊन, इन्सेंटीव्ह दरात किती वाढ करणे योग्य राहील याचा तौलानिक अभ्यास करुन प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२८ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वाहन पार्किंग व्यवस्थेबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कायम व कंत्राटी कर्मचा-यांची संख्या जवळपास सहाशेच्यावर आहे. श्री साईबाबा हॉस्पिटल लगत साईनगर मैदानावर कर्मचा-यांच्या वाहनांकरिता पार्किंग शेड उभारण्यात आले आहे. परंतु सदर पार्किंग शेडमध्ये वाहन संख्या अधिक असल्याने जागा अपुरी पडत आहे. तसेच सदर कर्मचारी पार्किंग शेडमध्ये कर्मचा-यांव्यतिरिक्त रुग्ण, रुग्णांचे नातेवाईक व इतर लोक वाहन पार्क करतात. परिणामी कर्मचा-यांना बाहेरील बाजुस रोडवर वाहन पार्क करावे लागते. वाहनांचे नुकसान व चोरी झालेबाबत वारंवार निदर्शनास येत आहे. श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सर्व कर्मचारी, रुग्ण/रुग्णांचे नातेवाईक व इतर लोकांकरिता स्वतंत्र सुरक्षित पार्किंगव्यवस्था असणे आवश्यक आहे.

उपरोक्त पार्किंग व्यवस्थेबाबत संस्थानचे बांधकाम विभागामार्फत समक्ष पाहणी होऊन जास्तीत-जास्त वाहन पार्क करता येतील अशा पध्दतीचे नवीन शेड उभारणीबाबत कार्यवाही चालु आहे. परंतु वाहन चोरीचे प्रमाण वाढले असुन याकरिता सदर पार्किंगवर सुरक्षित नियंत्रण आवश्यक आहे. सदर वाहन पार्किंग खाजगी इच्छुक उमेदवारास किंवा खाजगी कंपनीस पे अॅण्ड पार्क या तत्वावर चालविणेस देता येईल. दि. २४.१२.२०१४ रोजीच्या टिपणी अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावामध्ये मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी पार्किंगचे दर, वेळ इ. तपशिलासह सादर करणेबाबत शेरा दिला आहे. त्यानुसार शिर्डी व परिसरामध्ये अशा प्रकारच्या पार्किंग ठेकेदाराकडे चौकशी केली असता खालीलप्रमाणे अंदाजित दर व वेळेबाबत माहिती प्राप्त झाली आहे.

| अ.नं. | तपशिल | दर (सायं ६ पर्यंत) | दर (संपुर्ण दिवस व रात्र) |
|---|---|---|---|
| १. | सायकल | रु. २/- | रु. ५/- |
| २. | मोटार सायकल | रु. ५/- | रु. ८/- |
| ३. | तीन चाकी वाहने, कार, मोटार व जीप | रु. १०/- | रु. १५/- |

तरी उपरोक्त पार्किंग खाजगी इच्छुक उमेदवारास किंवा खाजगी कंपनीस पे अॅण्ड पार्क या तत्वावर चालविणेस देणेकामी संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत दैनिक वर्तमान पत्रामध्ये जाहीरात देणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी सदर प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.१०० यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कर्मचा-यांची वाहने उभी करण्यासाठी खाजगी इच्छुक उमेदवारास किंवा खाजगी कंपनीस पे अॅण्ड पार्क या तत्वावर पार्किंग चालविणेस देणेकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच कर्मचा-यांची वाहने पार्क करणेसाठी खालीलप्रमाणे मासिक शुल्क आकारणेत यावे, असे ठरले.**

| अ.नं. | तपशिल | मासिक दर रु. |
|---|---|---|
| १. | सायकल | मोफत |
| २. | मोटार सायकल | १५०/- |
| ३. | तीन चाकी वाहने, कार, मोटार व जीप | ३००/- |

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

## यानंतर पुरवणी विषयांवर चर्चा करणेत आली.

**पुरवणी**

**विषय नं.०१ पेपरकपच्या पुरवठ्याबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१४-१५ चे माहे ऑक्टो.२०१४ ते मार्च-२०१५ अखेर कॅन्टीन विभागास चहा, कॉफी, दुध या सेवा साईभक्तांना देणेकामी आवश्यक पेपरकप खरेदीकामी मा.व्य.समितीचे दि.०९.१०.२०१४ रोजीचे सभेतील निर्णयाप्रमाणे मे.सुरभि डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांना न्युनतम दराने २,००,००,००० नग पेपरकप (पॉली इथिनिल कोटेड, २०० जीएसएम (+-५) ) पुरविणेबाबत इकडील जा.क्र.३७९९/२०१४ दि.१२.११.२०१४ अन्वये पुरवठा आदेश देणेत आलेला आहे.

खरेदी विभागाकडील दि.२७.१२.२०१४ रोजीचे मंजुर टिपणीन्वये मे.सुरभि डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांचेकडून नवीन पेपरकप मागविणेबाबत मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार त्यांचेकडून दि.३०.१२.२०१४ रोजी ५,४६,००० नग पेपरकप प्राप्त झालेले आहेत. मे.सुरभि डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांचेकडून प्राप्त झालेले पेपरकप हे संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार खरेदी, भांडार व कॅन्टीन विभाग अधिक्षक यांचेमार्फत तपासून ते सकृतदर्शनी योग्य असल्यामुळे स्विकारण्यात आलेले आहेत.

प्राप्त पेपरकपांमधून १२,००० नग पेपरकप कॅन्टीन विभागास वापरावयास दिले असता, त्यांनी ते पेपरकप वापरुन योग्य असलेबाबत दुरध्वनीव्दारे अभिप्राय दिला. तसेच त्याबाबत माल तपासणी रजिस्टरला स्वाक्षरी केलेली आहे. त्यानंतर दक्षता पथकातील सदस्य श्री.झिरपे साहेब यांनी प्राप्त पेपरकपांमधून काही पेपरकप दि.३०.१२.२०१४ रोजी तपासणीसाठी नेले होते. त्यानुसार त्यांनी दि.०१.०१.२०१५ रोजी दुपारी ०४.०० वा. दुरध्वनीव्दारे पेपरकप हे पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणे नसल्याचे सांगितले आहे.

मे.सुरभि डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांनी त्यांचेकडील दि.०६.०१.२०१५ रोजीच्या पत्रान्वये मार्केटमध्ये कोणत्याही कंपनीचे २०० जीएसएम पेपरचे १०० मिली पेपरकप उपलब्ध नाही. आम्ही आपणास १८५ जीएसम (+-५) पेपरकप पुरवठा केलेला आहे. जो माल सगळीकडे उपलब्ध आहे, असे कळविलेले आहे.

तसेच आपल्या कमेटीमध्ये आपण ही बाब निदर्शनास आणून आता फक्त ३ महिण्यांचा कालावधी उरलेला असल्याने कृपया करुन, १८५ जीएसम (+-५) पेपरकप स्विकारावे. टेक्निकल बीड व फायनानशियल बीड यामध्ये जीएसएमची तफावत असल्याने ही चुक झालेली आहे. व २०० जीएसएम पेपरचे १०० मिली कप येत नसल्याने आम्ही पुरवठा करण्यास असमर्थ आहोत. तसेच आम्ही याबाबत संस्थानशी चांगले व्यवसायिक सबंध ठेवण्यासाठी व बाबांच्या सेवेसाठी आपणास पाच रुपये प्रति हजार कप कमी करण्यास तयार आहोत. तरी याबाबत कमिटीने विचार करावा, अशी विनंती केलेली आहे.

मे.सुरभि डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांनी पत्रामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे निविदेमध्ये टेक्निकल बीड व BOQ मध्ये पेपरकपच्या वर्णनाबाबत तफावत झालेली आहे. निविदेतील अटी व शर्तीमध्ये पेपरकप हे १८० (+-५) जीएसएम असा उल्लेख असून, BOQ मध्ये पेपरकप हे २०० (+-५) जीएसएम असा उल्लेख झालेला आहे. सदरची बाब ही अनावधानाने टायपिंगमधील चुकीमुळे झालेली आहे, याबाबत खरेदी विभागामार्फत प्रशासनाची व व्यवस्थापनाची (दि.०६.११.२०१४ रोजीचे मा.व्य.समितीचे सभेत) माफीही मागण्यात आलेली आहे. तसेच मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी खरेदी विभागाकडील दि.२०.१०.२०१४ रोजीच्या टिपणीवर दि.२३.१०.२०१४ रोजी भविष्यात अशा प्रकारच्या चुका पुन्हा होणार नाहीत, याची सबंधीतांनी काळजी घ्यावी असे निर्देश दिलेले आहेत.

तसेच खरेदी विभागाकडील दि.०२.०३.२०१५ रोजीचे टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी सदर कृतीमुळे पुरवठादाराने संस्थानची जाणीवपुर्वक कुचंबणा केली आहे, त्यामुळे त्याला १ वर्षासाठी Black List करावे. निविदेतील Typing ची चुक पुढील किती तरी स्तरावर दुरुस्त करणे शक्य असतांनाही याकडे दुर्लक्ष करणा-या सर्व सबंधीतां विरुद्ध जबाबदारी निश्चित करावी लागेल, असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

मात्र याबाबत सबंधीत विभागामार्फत यापुर्वी कामगार विभागाकडील जा.क्र.४७४७/२०१५ दि.१०.०१.२०१५ रोजीचे पत्रान्वये वर्णानाप्रमाणे नसलेले पेपरकप कोणी स्वीकारले, तपशिल द्यावा, सबंधीतांवर जबाबदारी निश्चित करावी याबाबत लेखी खुलासा मागविण्यात आलेला होता. त्याबाबत खरेदी विभागामार्फत दि.१४.०१.२०१५ रोजी खुलासा सादर केलेला आहे.

तसेच कामगार विभागाकडील जा.क्र.५२४९/२०१५ दि.१७.०२.२०१५ रोजीचे पत्रान्वये पेपरकप २०० जीएसएमचा उल्लेख चुकून टेंडरमध्ये झाल्याचे नमुद करण्यात आले होते. यास जबाबदार कोण ही नजरचुक होती अथवा जाणीवपुर्वक केलेली कृती होती याबाबत लेखी खुलासा मागविण्यात आलेला होता. त्याबाबत खरेदी विभागामार्फत खुलासा सादर केलेला आहे.

तसेच मे.सुरभी डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांचेकडून प्राप्त पेपरकप न वापरता भांडारमध्ये जमा आहेत. सदर पेपरकपचे बिल देखील प्रलंबित ठेवलेले आहे. त्याची सुरक्षा अनामत रक्कम देखील संस्थानकडे जमा आहे. त्यामुळे उपरोक्त पुर्ण प्रकरणात संस्थानचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही.

**विभागाचा अभिप्राय** – मे.सुरभि डिस्ट्रीबयुटर्स, औरंगाबाद यांनी पत्रात नमुद केलेल्या परिस्थितीनुसार निविदेमध्ये अनावधानाने टायपिंग चुकीमुळे पेपरकपच्या वर्णनामध्ये तफावत आहे. मात्र सबंधीत पुरवठाधारकाने निविदा भरतांना BOQ मध्ये २०० (+-५) जीएसएम असा उल्लेख असतांनाही त्यांचे दर दिलेले आहेत. तसेच त्यांना पुरवठा आदेश देतांना त्यामध्येही पेपरकप हे २०० (+-५) जीएसएम चे पुरविणेबाबत उल्लेख केलेला होता. अशा परिस्थितीमध्ये मे.सुरभि डिस्ट्रीबयुटर्स, औरंगाबाद यांनी पुरवठा आदेश स्विकारलेला आहे, मात्र आता पेपरकप पुरवितांना मात्र त्यांनी २०० (+-५) जीएसएमचे पेपरकप बाजारात उपलब्ध नसून, १८५ जीएसम (+-५) पेपरकप पुरविणेबाबत समर्थता दर्शविलेली आहे.

उपरोक्त परिस्थिती पाहाता दोन्ही बाजूने चुका झालेल्या असल्याने मे.सुरभि डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांना दिलेला पुरवठा आदेश/करारनामा रद्द करता येईल. तसेच त्यांनी दि.३०.१२.२०१४ रोजी पुरवठा केलेल्या पेपरकपपैकी उर्वरीत पेपरकप त्यांना परत करता येतील. तसेच संस्थानचे मागील पुरवठाधारक मे.सुयोग नेचर केअर, जयपुर यांचेकडून मागील मंजुर दर प्रति नग रु.०.३६८ (रु.३६८/- प्रति हजार) या दराने पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपोवेतो १८० जीएसम (+-५) चे पेपरकप खरेदी करता येतील. तसेच मे.सुयोग नेचर केअर, जयपुर यांनी पेपरकप पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविली तर त्यांचे मंजुर दरात (प्रति नग रु.०.३६८ (रु.३६८/- प्रति हजार) इतर पुरवठाधारक माल पुरविण्यास तयार असल्यास त्यांचेकडून पेपरकप खरेदी करता येतील.

तरी उपरोक्त नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, पेपरकप खरेदीसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**पुरवणी**

**विषय नं.०२** **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ चे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधांकरीता अपेक्षित खर्चाचे सुधारीत प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१०२** **उपरोक्त विषयाचा प्रस्ताव प्राप्त होऊ शकला नाही, त्यामुळे सदरहू विषय मागे घेण्यात आला.**

---

**<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.</u>**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **मा.विश्वस्तांच्या सूचनांबाबत.**

**निर्णय क्र.१०३** **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

**(१)** मा.श्री.लखमी गौतम, पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी त्यांचेकडील जिविशा/ निधी/ ११०९१/ २०१४, दि.२७/११/२०१४ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा मंदीर शिर्डी येथील दैनंदिन सुरक्षा व कुंभमेळा कालावधीत शिर्डी येथे येणा-या भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने करावयाचे उपाययोजनेसाठी अंदाजे रु.२८ कोटी मात्र खर्चाच्या विविध साहित्याची संस्थानकडून मागणी केलेली आहे. त्याबाबत चर्चा करणेसाठी आजचे सभेसमोर मा.श्रीमती सुनिता ठाकरे/ साळुंके, अतिरिक्त पोलिस अधिक्षक, अहमदनगर या उपस्थित होत्या. पत्रामध्ये नमूद केलेल्या सुरक्षा साहित्याची यादी ढोबळमानाने दिलेली आहे, अशी माहिती त्यांनी सभेस दिली.

सभेने त्यांचेबरोबर सदर कालावधीत भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून संभाव्य घटना टाळण्यासाठी व योग्य ती खबरदारीची उपाययोजना करणेबाबत चर्चा केली. आपण सदरहू कालावधीत करणा-या कामगिरीचा भारतभर प्रचार-प्रसार होणार असल्याने पोलिस विभागासाठी आवश्यक असणारे सुरक्षा साहित्य, संस्थान विहीत कार्यपध्दतीने मान्यता घेऊन, नाशिक येथे कुंभमेळयासाठी झालेल्या निविदाप्रक्रियेमधील दराने किंवा शासनाचे गृह विभागाकडील शासकीय दराने खरेदी करुन पोलिस विभागास देईल. परंतु त्याअगोदर सदरहू सुरक्षा साहित्य कसे, किती व कोठे वापरणार याचा परिपूर्ण आराखडा तयार करणेत येऊन, त्याचे पुढील सभेसमोर सादरीकरण करणेबाबत सभेने त्यांना निर्देश दिले. (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख/ कुंभमेळा व शताब्दी महोत्सव कक्षप्रमुख)

---

**(२)** मा.त्रीसदस्य समितीच्या दिनांक १७.०७.२०१४ रोजीचे सभेतील मुख्यलेखाधिकारी यांचे अधिकार व कर्तव्याबाबतच्या विषयावरील झालेला निर्णय क्र.६०९ वर कार्यवाही करणे उचित व योग्य नाही, याबाबत संस्थानचे सर्व प्रशासकीय अधिकारी यांनी मा.अध्यक्ष महोदय व मा.जिल्हाधिकारी तथा समिती सदस्य यांना लेखी पत्राद्वारे कळविलेले आहे.

या पत्रावर सविस्तर चर्चा होऊन, सदर पत्राबाबत संपूर्ण कागदपत्रांसह सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करावा, असे निर्देशीत करणेत आले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**(३)** श्री.गजेंद्र सुर्यकांत वाढोणकर, सिडको, औरंगाबाद यांचे नाव सुक्ष्म लिखानामुळे गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये समाविष्ट असून या साईभक्तांने श्री साईलिलामृतांच्या २१ अध्यायाचे तांदूळ व तीळाच्या सुमारे ५,४४,४५४ दाण्यांवर सुक्ष्म दाण्यांवर लिखाण करुन तो साईलिलामृत ग्रंथ श्री साईबाबांच्या वस्तू संग्रहालयामध्ये ठेवण्यासाठी दि.२१.०२.२०१५ रोजी विनंती अर्ज केलेला आहे.

सदरहू ग्रंथ पूर्ण करणेसाठी त्यांना ०३ वर्षाचा कालावधी लागलेला असून या ग्रंथाला लंडन येथील साईमंदिराकडून रु.२१ कोटीस मागणी आलेली आहे. परंतु हा ग्रंथ बाबांच्या वस्तू संग्रहालयामध्ये ठेवून लाखो साईभक्तांना त्याचे दर्शन व्हावे, हया इच्छेने ते संस्थानला विनामुल्य देत आहेत.

तरी श्री.गजेंद्र सुर्यकांत वाढोणकर, सिडको, औरंगाबाद या साईभक्तांने श्री साईलिलामृतांच्या २१ अध्यायाचे तांदूळ व तीळाच्या सुमारे ५,४४,४५४ दाण्यांवर सुक्ष्म दाण्यांवर लिखाण केलेला साईलिलामृत ग्रंथ संस्थानच्या पारायण कक्षामध्ये साईभक्तांच्या दर्शनासाठी ठेवणेत यावा.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग/ प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

वरील निर्णय क्र.७३ ते १०३ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर रात्री ०९.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/-**xxx** | स्वाक्षरित/- **xxx** | स्वाक्षरित/- **xxx** |
| (राजेंद्र जाधव) | (अनिल कवडे) | (विनय जोशी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी